नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ८९ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक २७ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## गुजरात, हिमाचलमध्ये पुरामुळे हाहाकार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :
गुजरातच्या अहमदाबादमध्ये मुसळधार पावसामुळे अहमदाबाद शहरात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पूर्वेकडील भागातील मणिनगर, वटवा, सिटीएम, हटकेश्वर, निकोल ओधव आणि विराट नगरसह अनेक भाग पाण्याखाली गेले.

हिमाचल प्रदेशातील दोन जिल्ह्यांमध्ये ढगफुटीच्या ४ घटना घडल्या. कुल्लूमधील जिवा नाला, गडसा खोऱ्यातील शिलागड आणि बंजरमधील होरंगध येथे ढगफुटी झाल्या. याशिवाय कांगडा जिल्ह्यातील धर्मशाळा येथे ढग फुटले. दरम्यान, राजस्थानमध्ये मान्सूनचा पाऊस सुरूच आहे. बांसवाडा येथे एका दिवसात सर्वाधिक ८ इंच पाऊस पडला.

अग्रलेख

## खरीखरी..

# आता महामंडळे

काल महायुतीच्या समन्वय समितीची बैठक झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी करण्यासाठी कार्यकर्त्यांना कामाला लावायचे आहे. ते अत्यंत गरजेचे असते. सरकार कोणाचेही असले. तरी सर्वांना आमदार खासदार करता येत नाही. मग काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना कसे सांभाळावे. हा प्रश्न असतोच. कार्यकर्त्यांना सांभाळून ठेवण्यासाठी महामंडळावरती नियुक्ती करणे. हा मार्ग सर्व सत्ताधारी स्वीकारत असतात. ज्याप्रमाणे मंत्रिमंडळात मलाईदार मंत्रालये किंवा मलाईदार खाती मिळवण्यासाठी मंत्र्यांची धडपड असते. त्याचप्रमाणे प्रतिष्ठेची किंवा मलाईदार महामंडळे मिळावी आणि त्यावर नियुक्ती व्हावी. यासाठी नेत्यांसाठी काम करणारे कार्यकर्ते तन, मन आणि धनाने धडपडत असतात. पक्षात कायम चैतन्य रहावे. म्हणून अशा कार्यकर्त्यांना सदैव आशेवर झुलवत ठेवणे गरजेचे असते. कालच्या सत्ताधारी असलेल्या तीनही पक्षांच्या समन्वय समितीच्या बैठकीत महामंडळावर नियुक्तीचे निकष ठरविल्याचे बोलले जात आहे. यात साधारणपणे दीड ते दोन महिन्याचा कालावधी निघून जाईल. त्यानंतर नियुक्त्या होतील, असे सांगितले जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय मिळवणे. सत्ताधारी पक्षासाठी अत्यावश्यक असते. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे तळागाळात काम करणा?या म्हणजेच मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी हक्काचे सत्ता केंद्र असते. कार्यकर्त्यांना अशा प्रकारे चॉकलेट वाटपाची परंपरा सर्वच पक्ष पार पाडत असतात. राज्यात अनेक महामंडळे असली. तरी आता या महामंडळात पूर्वीसारखी सत्ता मिळत नाही. सध्या अनेक महामंडळे केवळ नावालाच अस्तित्वामध्ये आहेत. जनतेच्या भल्यासाठी विशेष असे उपक्रम त्यातून राबवले जात नाहीत. अशी टीका नेहमीच केली जाते. पण तरीही महामंडळाचे आकर्षण कायम आहे. सर्वच कार्यकर्त्यांना सरकारमध्ये महत्त्वाची पदे देता येत नाहीत. हे खरे असले तरी अजूनही कार्यकर्त्यांना महामंडळाचे आकर्षण असतेच. महाराष्ट्र राज्याच्या वीज मंडळावर नियुक्तीसाठी पूर्वी चांगलाच वशिला लावला जात असे. आता वीज बोर्ड संपून महाजनको, महावितरण आणि महाट्रान्स्को अशा कंपन्या अस्तित्वात आल्या आहेत. त्यामुळे या कंपन्यांवर अनेकांचा डोळा असतो. पूर्वी मरापम म्हणजेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळावर अनेकांचा बारीक डोळा असे. हे एसटी महामंडळ दिवसेंदिवस आता खड्ड्यात जात आहे. तिकीट विक्रीतून जेमतेम कर्मचाऱ्यांचा पगार निघतो आणि एसटी प्रवासात ज्या सवलती दिल्या जातात. त्या पैशातून जेमतेम खर्च भागतो. तोटा काही कमी होत नाही. अशी अनेक महामंडळे अस्तित्वात असली. तरी त्यांची नावेही अनेकांना माहीत नाहीत. पण तरीही कोणत्या ना कोणत्या महामंडळावर नियुक्ती व्हावी. त्यासाठी अनेक कार्यकर्ते उत्साहाने वाट बघत असतात. युतीतील तिन्ही पक्षांना सांभाळून घेण्यासाठी आता नेतृत्वाचा चांगलाच कस लागणार आहे. नेहमीप्रमाणे मुख्यमंत्री यामध्ये स्वतः लक्ष घालून या सर्व कार्यकर्त्यांची नाराजी दूर करतील. किंबहुना करावी अशी अनेकांची इच्छा असावी. या महामंडळांवर ज्यांची ज्यांची वर्णी लागेल. त्यांना त्यांना आमच्या शुभेच्छा. आतापासून सर्वच महामंडळेच्छुक कार्यकर्त्यांनी जोरदारपणे कामाला लागावे आणि आपले हक्काचे पद मिळवावे. यासाठी त्यांना वेगळे काही करण्याची गरज नाही. प्रत्येक कार्यकर्त्याचे गॉडफादर आहेत. ते आपले वर्चस्व दाखवून कर्तव्य पार पाडत असतात. कारण या कार्यकर्त्यांच्या बळावरच त्यांना पुढील निवडणूक जिंकायची आहे. राजकारणातील हा प्रयोग अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. पुढेही तो तसाच सुरू राहील यात शंका नाही. आता फक्त मुहूर्ताची वाट पाहायची. तो मुहूर्त निघाला रे निघाला की, कार्यकर्त्यांचे चांगभले होईल, यात अजिबात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## शक्तिपीठ महामार्गामुळे महाराष्ट्र
# कर्जबाजारी होणार!

■ अजित पवारांच्या अर्थ खात्याचा अभिप्राय ■

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शक्तिपीठ महामार्ग या महत्वकाक्षी प्रकल्पाला आता चौफेर विरोध होत आहे. त्यात आता राज्य सरकारच्याच अर्थ खात्याची भर पडली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या नेतृत्वातील या खात्याने शक्तिपीठ महामागार्मुळे महाराष्ट्र कर्जबाजारी होण्याची भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे या महामार्गाच्या कामाला ब्रेक लागणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

राज्य मंत्रिमंडळाने शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंजुरी दिली आहे. यासाठी सुमारे २० हजार कोटींचा निधीही मंजूर केला आहे. यामुळे या महामार्गाच्या भूसंपादनाला वेग येण्याची शक्यता असतानाच आता अर्थ खात्याने आपल्या अभिप्रायात या महामार्गामुळे राज्यावरील कर्जाचा बोझा प्रचंड प्रमाणात वाढण्याचा दावा केला आहे.

शक्तिपीठ महामार्गामुळे राज्यावरील कर्जात वाढ होईल. या प्रकल्पासाठी राज्याचे २०,७८७ कोटी रुपयांचे उच्च आर्थिक दायित्व आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय अंदाजानुसार मार्च २०२६ पर्यंत राज्य सरकारवर ९.३२ लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा बोजा पडणार आहे, असा महत्वपूर्ण अभिप्राय अर्थ विभागाने आपल्या अहवालात नोंदवला आहे.

विशेषतः या प्रकल्पावर होणाऱ्या खर्चामुळे राज्यावर आर्थिक भार तर पडेलच, शिवाय बजेटबाह्य कर्जाचा राज्याच्या कर्ज घेण्याच्या क्षमतेवरही प्रतिकूल परिणाम पडेल, असेही नियोजन विभागाने आपल्या नोटमध्ये म्हटले आहे.

शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पासाठी वाढीव दराने कर्ज घेण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अर्थ मंत्रालयाने आपल्या नोटमध्ये राज्याच्या आर्थिक स्थितीकडेही लक्ष वेधले आहे.

या प्रकरणी मंत्रालयाने मेगा प्रकल्पांसाठी राज्य सरकारच्या (बीओटी) धोराचा फेरविचार करण्याचा व उपलब्ध आर्थिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा सल्ला दिला आहे.

# वित्त विभागाचा आक्षेप नाही

मुख्यमंत्री फडणवीस यांची स्पष्टोक्ती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील अर्थ खात्याने महत्वकांक्षी शक्तिपीठ महामार्गावर कोणताही आक्षेप घेतला नसल्याची स्पष्टोक्ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली.



वित्त विभागाने शक्तिपीठावर कोणताही आक्षेप घेतला नाही. वित्त विभागाचे कामच या सर्व गोष्टी पॉइंट आऊट करण्याचे असते. त्यामुळे वित्त विभागाने आक्षेप नोंदवला असे म्हणता येत नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सरकारला टोमणे मारण्यापेक्षा मराठी भाषेतील चांगल्या अलंकारांचा वापर करण्याचा उपरोधिक सल्लाही दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एक महामार्ग बनतो तेव्हा तो अर्थव्यवस्थेची दालने उघडतो. १२ हजार कोटींची गुंतवणूक आपण पायाभूत सुविधांमध्ये करतो तेव्हा त्यातला परतावा १२ हजार कोटींहून कितीतरी कोटी जास्त असतो. तो आपल्या अर्थव्यवस्थेला विस्तारित करतो आणि ते कर्ज परत करण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमता निर्माण करतो. त्यामुळे जगातले सर्वच देश हे कर्जातून पायाभूत सुविधा निर्माण करतात. कारण, अर्थव्यवस्थेचा नियम आहे की, तुम्ही इन्फ्रास्ट्रक्चरवर कर्ज घेतले तर ते उत्तम कर्ज मानले जाते. त्यातून अर्थव्यवस्थेचा विस्तार होतो, अर्थव्यवस्था बळकट होते. रोजगार निर्मिती होते.

पण काही लोकांना प्रत्येक गोष्टीला विरोध करण्याची सवय आहे. या लोकांनी असाच समृद्धी महामार्गाला विरोध केला होता. पण आज समृद्धीने अनेक जिल्ह्यांचे चित्र बदलले आहे.

मराठवाडा व दुष्काळी पट्ट्याचे चित्र बदलायचे असेल तर शक्तिपीठ महामार्ग हे त्याचे उत्तर आहे. याचा वापर करून मोठ्या प्रमाणात ग्रिन एनर्जी तयार करण्याचाही आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे मराठवाडा व दुष्काळी भागाचे पूर्ण चित्र बदलणारा हा महामार्ग आहे, असे फडणवीस म्हणाले.

## चीनमध्ये जाऊन राजनाथ सिंह यांनी दहशतवादावरून काढली खरडपट्टी

■ वृत्तसंस्था
शांघाय, दि. २६ :
चीनमधील किंगदाओ शहरात होत असलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करणारे राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांसमोरच दहशतवादाबद्दल खडे बोल सुनावले.



काही देश सीमेपलीकडील दहशतवादाला प्रोत्साहन देत असून दहशतवाद्यांना थारा देत आहेत, असा आरोप राजनाथ सिंह यांनी केला. यावेळी पाकिस्तानचे संरक्षण मंत्रीही या बैठकीला उपस्थित होते.

काही देश सीमेपलीकडील दहशतवादाचा वापर धोरण म्हणून करत असून दहशतवाद्यांना आश्रय देत आहेत. अशा दुटप्पी भूमिका ठेवणाऱ्यांना कोणतेही स्थान देण्यात येऊ नये. एससीओने अशा राष्ट्रांवर टीका करण्यास मागेपुढे पाहू नये, असे विधान राजनाथ सिंह यांनी गुरुवारी शिखर परिषदेला संबोधित करताना म्हटले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह पुढे म्हणाले, भारत आपल्या कृतीमधून दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेत असल्याचे आज तुम्हाला दिसेल.

दहशतवाद्यांपासून आमच्या देशाचे संरक्षण करणे, हा आमचा अधिकार आहे. दहशतवाद्यांचे तळ आता सुरक्षित नाहीत आणि त्याला उध्वस्त करण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नाहीत, हे आम्ही दाखवून दिले आहे. भारताकडे अध्यक्षपद असताना आम्ही दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेकीपणाकडे नेणाऱ्या कट्टरतावादाचा मुकाबला या विषयावर एससीओ राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेचे संयुक्त निवेदन दिले होते.

## ब्लॅक बॉक्स डेटा रिकव्हर





■ वृत्तसंस्था,अहमदाबाद, दि. २६ :

अहमदाबाद विमान अपघात

१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या ब्लॅक बॉक्समधील डेटा रिकव्हर करण्यात आला आहे. गुरुवारी एका सरकारी निवेदनात म्हटले आहे की, डेटा डाउनलोड करण्यात आला आहे. मेमरी मॉड्यूलचा ॲक्सेस देखील मिळवण्यात आला आहे.

आता तपास यंत्रणा ब्लॅक बॉक्समधून मिळालेल्या डेटाचे विश्लेषण करेल. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, अपघातग्रस्त विमानातून दोन ब्लॅक बॉक्स संच सापडले आहेत. यामध्ये अपघाताच्या वेळी वैमानिकांच्या संभाषणाचा रेकॉर्ड आणि विमानाची तांत्रिक माहिती असेल. पहिला संच १३ जून रोजी आणि दुसरा १६ जून रोजी सापडला. १२ जून रोजी लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान लगेचच कोसळले. या घटनेत २४१ जणांचा मृत्यू झाला, तर एक प्रवासी बचावला.

## ३० जून ते १८ जुलै दरम्यान विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै या कालावधीत मुंबईत पार पडणार असल्याची घोषणा विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आली.

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर इतक्या दिवस चालणारे हे पहिलेच अधिवेशन असेल. हिंदी सक्ती, शक्तिपीठ महामार्ग, शेतकरी कर्जमाफी, निवडणूक मतदारांवर होणारे आरोप अशा अनेक मुद्द्यांमुळे हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे.

विधानभवन येथे आयोजित विधानमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अनेक मंत्री, आमदार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली.

**सरकारला घेरण्याची शक्यता**

अधिवेशनात हिंदी सक्ती, शक्तिपीठ महामार्ग प्रकल्प, शेतकरी कर्जमाफी, आणि निवडणूक मतदारांवर असणारे आरोप यासारख्या प्रश्नांवर विरोधक सरकारला घेरण्याची शक्यता आहे. सरकारमधील काही मंत्र्यांचे वक्तव्य, त्यातून वाद, यामुळे हे अधिवेशन वादांनी भरलेले राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## हिंदी सक्तीविरोधात ७ जुलैला उद्धव ठाकरेंचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात ठाकरे बंधू आक्रमक झाले आहेत. निर्णयाविरोधात राज ठाकरे यांनी ५ तारखेला मुंबईत मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली आहे. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांनी ७ तारखेला आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. काहीही झाले तरी हिंदीची सक्ती आम्ही लादू देणार नाही, असे उबाठाने म्हटले आहे.

## मनसेच्या मोर्चावर आमचा ॲप्रोच निगेटिव्ह नाही

शरद पवारांची स्पष्टोक्ती

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मराठीच्या मुद्यावर ठाकरे बंधूंनी घेतलेली भूमिका चुकीची नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच मनसेने मराठीच्या मुद्यावर मोर्चा काढण्याच्या घोषणेवर आपल्या पक्षाची भूमिका नकारात्मक नसल्याचेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे शरद पवार ५ जुलैच्या मोर्चात सहभागी होणार का? याविषयी उत्कंठा आहे.



शरद पवारांनी गुरूवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी ठाकरे बंधूंनी मराठीच्या मुद्यावर घेतलेली भूमिका चुकीची नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, प्राथमिक शिक्षणात हिंदीची सक्ती करू नये असा सर्वांचा आग्रह आहे.

इयत्ता पाचवीनंतर हिंदी शिकण्यास काहीही हरकत नाही. देशातील एक मोठा वर्ग हिंदी भाषा बोलतो. त्यामुळे हिंदी भाषेला एकदमच साईडची भाषा समजण्याचे कारण नाही. दुसऱ्या भाषेचा लोड टाकला आणि मातृभाषा बाजूला पडली तर ते योग्य ठरणार नाही. त्यामुळे सरकारने इयत्ता पाचवीपर्यंत हिंदी भाषेचा हट्ट सोडावा, असे शरद पवार म्हणाले.

## वैश्विक दर्जाच्या आरोग्यसेवेसाठी
# मेघे व अदानी गृप एकत्र

वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आरोग्य क्षेत्रात संयुक्त वाटचाल




■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २६ :
दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेने अहमदाबाद येथील अदानी फाउंडेशनसोबत सामाजिक बांधिलकी जोपासत जागतिक दर्जाची आरोग्यसेवा, शिक्षण आणि पायाभूत सुविधा देशांतर्गत अधिक कार्यक्षमतेने विकसित करण्याच्या उद्देशाने एकत्रित वाटचाल करण्याचा निर्णय घेतला आहे.




याबाबतची संयुक्त घोषणा दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेचे विश्वस्त व अभिमत विद्यापीठाचे प्रधान सल्लागार सागर मेघे आणि अदानी समूहाचे संचालक डॉ. मलय महादेविया यांनी केली.

सावंगी मेघे येथे झालेल्या या संयुक्त बैठकीला कुलपती दत्ता मेघे, प्रकुलपती डॉ. वेदप्रकाश मिश्रा, मेघे समूहाचे संचालक राघव समीर मेघे, कुलगुरू डॉ. ललित वाघमारे तसेच मेघे व अदानी समूहाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मेघे समूह व अदानी फाउंडेशनमध्ये झालेल्या या करारानुसार दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेच्या ध्येयधोरणांना कायम ठेवत दर्जेदार, नाविन्यपूर्ण आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा समावेश असलेले जागतिक दर्जाचे केंद्र विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. विशेषतः प्रगत शिक्षण, संशोधन आणि सर्वसामान्यांसाठी दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी हा सामाजिक करार असण्याचे यावेळी सांगण्यात आले.

मेघे समूहासोबत आमची शैक्षणिक व आरोग्य सुविधांसाठी सहभागिता असून कुलपती दत्ता मेघे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रगत वाटचाल पुढेही सुरू राहील, असे डॉ. मलय महादेविया यांनी सांगितले. तर, मेघे शिक्षण व आरोग्य समूहातील सर्व कर्मचारी माझ्या परिवाराचे सदस्य असून मी कायम त्यांच्या सोबत असल्याचा विश्वास यावेळी सागर मेघे यांनी दिला.

३५ वर्षांहून अधिक काळ आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात कार्य करणारी आमची संस्था अदानी फाउंडेशनसोबत कार्यरत होते आहे, हे प्रादेशिक आणि राष्ट्रीय विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

ही युती आगामी काळात सामाजिक दायित्वाच्या भावनेतून सर्वसमावेशक आणि शाश्वत प्रगतीसाठी कार्यरत राहील, अशी आशा कुलपती दत्ता मेघे यांनी व्यक्त केली. या संयुक्त करारप्रसंगी ऑनलाईन पद्धतीने सहभागी होत अदानी फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. प्रीती अदानी यांनीही संवाद साधला.

मेघे संस्थेसोबत सहकार्याच्या भावनेतून एकत्रित कार्य करताना दर्जेदार आरोग्यसेवा आणि शिक्षण हा एक मूलभूत अधिकार आम्ही मानतो. सर्वांना सन्मानपूर्वक सेवा देणारे एक स्केलेबल मॉडेल तयार करीत विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करण्याचा उद्देश असल्याचे असल्याचे प्रीती अदानी यांनी सांगितले.

## कान उपटल्यावर बबनराव लोणीकरांना उपरती

■ वृत्तसंस्था, जालना, दि. २६ :
'अनेकांच्या आईचे पगार आम्ही केले. त्यांच्या बापाला पेरणीला पैसेही आम्हीच दिले', असे वादग्रस्त विधान करणाऱ्या भाजप आमदार बबनराव लोणीकर यांना आता उपरती झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी समज देण्याची भाषा केल्यानंतर लगेचच लोणीकरांनी यापुढे आपल्या अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत शेतकऱ्यांविरोधात काहीही बोलणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

भाजप आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी एका कार्यक्रमात बोलताना उपरोक्त शब्दांत भाजपवर टीका करणाऱ्या ट्रोलर्सना धमकावले होते. बबनराव लोणीकरांच्या विधानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी लोणीकरांचे विधान पूर्णपणे चुकीचे असल्याचे नमूद करत त्यांना समज दिली होती. काही वेळातच लोणीकरांनी यापुढे आपण अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत शेतकऱ्यांविरोधात केव्हाच बोलणार नसल्याचे स्पष्ट केले.



लोणीकर म्हणाले, राजकीय पक्षांचे गाव पातळीवरील काही कार्यकर्ते आहेत. ते पंतप्रधान मोदी व फडणवीस यांना ट्रोल करतात. मी त्यांच्यावर बोललो. आमची भाषा खेड्यातील आहे. आम्ही वडिलांना बाप म्हणतो. आईला माय म्हणतो. एखाद्या मुलाने काम केले नाही, तो नीट शिकला नाही, तर आम्ही त्याला कार्ट म्हणतो, असे सांगत त्यांनी सारवासारव केली.

# शिक्षण मंत्र्यांची राज ठाकरेंसोबतची बैठक निष्फळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
हिंदीच्या सक्तीच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दूत म्हणून राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही.



उलट राज ठाकरे यांनी 'एक घाव दोन तुकडे' करत हा विषयच निकाली काढला. त्यामुळे भुसे यांना आल्यापावली परत फिरावे लागले. त्यानंतर बोलताना भुसे यांनी या क्षणाला राज ठाकरे यांना सरकारचा तिसऱ्या भाषेचा निर्णय मान्य नाही असे स्पष्ट केले.

इयत्ता पहिलीपासूनच तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्यात आली होती. पण विरोधामुळे या निर्णयात फेरबदल करत तिसरी भाषा ही पूर्णतः ऐच्छिक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पण त्यानंतरही राज ठाकरे यांच्या विरोधाची धार कमी झाली नाही. या पार्श्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आज राज ठाकरे यांची भेट घेऊन त्यांना त्रिसुत्री भाषा धोरण समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरला.

तिसऱ्या भाषेच्या संदर्भात आज मी राज ठाकरे यांची भेट घेतली. पण त्यांच्यासोबतच्या बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही.

या क्षणाला तिसऱ्या भाषेसंबंधीचा सरकारचा निर्णय राज ठाकरे यांना मान्य नाही. राज यांनी या प्रकरणी आम्हाला काही चांगल्या सूचना केल्या आहेत. त्या नक्कीच स्वागतार्ह आहेत. आज त्यांच्यासोबत जी चर्चा झाली ती मी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर घालीन, असे दादा भुसे म्हणाले.

## हिंदीच्या सक्तीविरोधात मनसेचा ५ जुलैला मोर्चा

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुती सरकारच्या हिंदीच्या सक्तीच्या निर्णयाविरोधात येत्या ५ जुलै रोजी मुंबईत भव्य मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चात सर्वांनी पक्षीय राजकारणाचे जोडे बाजुला ठेवून सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या प्रकरणी सरकारवर कडाडून हल्ला चढवत मनसे कोणत्याही स्थितीत हिंदीची सक्ती करू देणार नाही असे ठणकावून सांगितले आहे.

राज ठाकरे म्हणाले, शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी माझी भेट घेतली. त्यांनी त्यांची भूमिका सांगण्याचा प्रयत्न केला. पण मी त्यांची भूमिका फेटाळून लावली. हिंदीची सक्ती आम्हाला मान्य नाही हे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले. खरेतर कोणत्याही भाषेची सक्ती करण्याचा निर्णय इयत्ता पाचवीनंतरच यावा. सरकार हिंदीची सक्ती का करत आहे हे अनाकलनीय आहे. बीएसई किंवा तत्सम बोर्डाच्या शाळा ह्या आयएसआय अधिकाऱ्यांच्या मुलांसाठी काढण्यात आल्या होत्या. पण आता त्याच शाळांचे वर्चस्व राज्यांच्या शाळांवर गाजवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या दलालांवर कठोर कारवाई : आकाश फुंडकर



**मुंबई :** राज्यातील बांधकाम कामगारांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करून त्यांच्याकडून आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील विविध भागातून लोकप्रतिनिधी व बांधकाम कामगारांकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नोंदणी, कीट वाटप व अन्य बाबतीत गैरप्रकार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून आता राज्यभरात जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करून प्रभावी तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा कार्यालय प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र जिल्हास्तरीय दक्षता पथक गठीत करण्यात येणार आहे. या पथकांचे कार्यक्षेत्र मात्र त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्याऐवजी दुसऱ्या जिल्ह्यावर असेल, जेणेकरून कारवाई अधिक निष्पक्ष आणि प्रभावी राहील. दक्षता पथकांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे होणारी नोंदणी, नोंदणीसाठी पैसे मागण्याचे प्रकार तसेच खोटे दाखले सादर करून मिळविले जाणारे लाभ या बाबींवर लक्ष केंद्रित करून तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. संबंधित दलालांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल. या मोहिमेसाठी क्षेत्रीय कार्यालयांना वाहन भाडेतत्वावर घेण्याची परवानगी देण्यात आली असून, तपासणीसाठी आवश्यक इतर खर्चही प्रशासकीय निधीतून नियमानुसार करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय दक्षता पथक प्रमुखांनी त्यांच्या कारवाईचा सविस्तर अहवाल विभागीय प्रमुखांना सादर करावयाचा आहे. विभागीय प्रमुख सर्व जिल्ह्यांचे अहवाल एकत्र करून आपल्या अभिप्रायासह मंडळ मुख्यालयास सादर करतील.

## पवई व तुळशी तलावातील गाळ काढण्यासंदर्भात कृती आराखडा सादर करा : आशिष शेलार



**मुंबई :** पवई तलाव व तुळशी आणि विहार तलावातील गाळ काढण्यासंदर्भात येत्या तीन महिन्यात कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले. पवई तलावातील गाळ काढण्यासंदर्भात मंत्रालयात श्री. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनसंरक्षक अनिता पाटील यांच्यासह पर्यावरण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दरवर्षी जुलैमध्ये पवई तलाव भरून वाहत असतो. मात्र, यंदा जून महिन्यातच पवई तलाव भरून वाहू लागला आहे. त्यामुळे गाळ न काढल्यामुळे हा तलाव लवकर भरला का, तसेच तलावातील गाळ काढण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनासंदर्भात यावेळी चर्चा झाली. पवई तलावातील प्रदुषणासंदर्भात मेरी संस्थेने सर्वेक्षण केले आहे, असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पवई तलावचा परिसर हा ५५७ एकरावर आहे. जलपर्णी वाढल्याने तलाव परिसरातील सांडपाणी रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने कार्यवाही सुरू केली आहे. पवई व तुळशीविहार तलावातील गाळ काढल्यानंतर त्याची वाहतूक व साठवणुकीसंदर्भात अभ्यास अहवाल तयार करून कृती आराखडा तयार करावा. गाळ काढण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीतून मदत घेण्यात यावी, अशा सूचना श्री. शेलार यांनी यावेळी दिल्या.

## अजित पवारांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध करावा : संजय राऊत



**मुंबई :** शक्तिपीठ महामार्गाला वीस हजार कोटी रुपये मंजूर केले गेले आहेत. यातील दहा हजार कोटी हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वळवले जातील. त्यामुळे आता अजित पवार यांनी अशा योजनेला विरोध करायला हवा, अशी मागणी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. या योजनेमुळे राज्याचा तिजोरीवर ताण येणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यावरुन राऊत यांनी अजित पवारांकडे ही मागणी केली आहे. या वेळी राऊत यांनी शक्तिपीठ महामार्गाला जोरदार विरोध केला. अशा योजनांमध्ये किमान 50% दलाली ही सरकारच्या लोकांकडे येत असल्याचा आरोप देखील राऊत यांनी केला आहे. या ठेकेदारांकडून आधीच उचल घेतलेली आहे. यातील ठेकेदारांना आधीच कामाचे शब्द दिलेले असल्याचा आरोपही राऊत यांनी केला आहे. हाच पैसा नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये वापरला जाणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला. शक्तिपीठ महामार्ग हा देवेंद्र फडणवीस यांना ड्रीम प्रोजेक्ट आहे. मात्र, या महाराष्ट्रातून अदानीला हाकलून देणे हाच महाराष्ट्राचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. ज्या पद्धतीने महाराष्ट्रासह मुंबईतील सर्व योजना अदानी आणि गुजराती व्यापाऱ्यांच्या हातात दिल्या जात आहेत. यात अगदी वीज वितरण पासून वीज कलेक्शन पर्यंत गुजराती व्यापाऱ्यांना दिला जातोय. महाराष्ट्रात कोणी नाही का? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. अदानीला हाकलून देणे हाच महाराष्ट्रासाठी ड्रीम प्रोजेक्ट असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

### "शक्तीपीठ महामार्गामुळे आर्थिक दिवाळखोरीची वाट?
## सुप्रिया सुळेंचा राज्य सरकारवर घणाघात



**मुंबई:** शेतकऱ्यांचा विरोध, अर्थ खात्याची नोट, आणि हजारो कोटींचा कर्जभार - शक्तीपीठ महामार्गावरून राज्य सरकार अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त करत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज राज्य सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडलं. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, "रस्ता झाला तरी महाराष्ट्राचा आर्थिक रस्ता बंद होईल!" मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सुळे म्हणाल्या, शेतकरी विचारत आहेत की आधीच रस्ते असताना, आणखी एक द्रुतगती महामार्ग कशासाठी? त्यांच्या जमिनी जाणार, पर्यावरणाचा ऱ्हास होणार आणि उपयोग मात्र अपुरा! मग हे कुणासाठी? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सुळे यांनी जोरदार आरोप करत सांगितलं की, "वित्त विभागाने या प्रकल्पासाठी ६.७५ टक्के व्याजदराने २० हजार कोटी रुपये कर्ज घेण्यास विरोध नोंदवला आहे." शाळा, आरोग्य, जल जीवन मिशन यासाठी पैसे उपलब्ध नाहीत, पण असा भव्य रस्ता मात्र बांधला जातोय – यावर सुळे यांनी राज्य सरकारला "प्राधान्य क्रमाचा विसर" पडल्याचा टोला लगावला. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पातील २२ टक्के रक्कम जर केवळ व्याज भरण्यात खर्च होत असेल, तर इतर विकासकामांचे काय? असा ज्वलंत सवाल त्यांनी उपस्थित केला. "हे सरकार भविष्यात महाराष्ट्राला कर्जाच्या दलदलीत लोटणार आहे," असा इशाराही त्यांनी दिला. सुप्रिया सुळे यांनी समृद्धी महामार्गावरील खड्डेप्रकरणी तत्काळ एसआयटी नेमण्याची मागणी केली. "नितीन गडकरी ब्लॅकलिस्टेड कंपन्यांवर कारवाई करतात, मग राज्य सरकार कशासाठी गप्प आहे?" असा प्रश्न विचारत त्यांनी अटल सेतूवरील खड्ड्यांकडेही लक्ष वेधले आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. वाढवण बंदर प्रकरणावरही सुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना उद्देशून थेट बोललं "लोकांचं म्हणणं ऐका, आणि त्यांच्या भावना समजून घ्या. प्रकल्पांचं राजकारण करताना सामान्य जनतेचा आवाज दुर्लक्षित होऊ नये.

# अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेच्या कामाला गती द्या : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

राज्यातील सर्व शासकीय कार्यालये स्वमालकीच्या इमारतींमध्ये स्थलांतरित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी, यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून इमारतींच्या बांधकामाला प्राधान्य देण्यात यावे. राज्यात ज्या ठिकाणी विकासकामे सुरु आहेत त्याठिकाणी नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, याद्दष्टीने कामांचे, वाहतुकीचे नियोजन करून ठरलेल्या वेळेत गतीने कामे पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच मराठवाड्याच्या विकासासाठी महत्त्वाची असणाऱ्या अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात, उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. या बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपरमुख्य सचिव मनीषा म्हैसकर, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जैसवाल, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंग, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे विभागाचे मुख्य अभियंते अतुल चव्हाण उपस्थित होते.

तर दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील, महानगर आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे यांच्यासह पुणे मेट्रो, पीएमआरडीए, संबंधित जिल्ह्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीचे संचालन उपमुख्यमंत्री कार्यालयाचे उपसचिव विकास ढाकणे यांनी केले.

पुणे शहराच्या विकासाच्यादृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो, पुणे मेट्रो 1 व 2 मार्गिकेच्या कामाचा आढावा घेत, कोकणाच्या पर्यटनाला चालना देणाऱ्या रेवस ते रेडी किनारा महामार्गाच्या कामाला गती देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. यावेळी त्यांनी लोणावळा येथील स्कायवॉक आणि टायगर पॉईंट विकास, सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालय, अलिबागच्या उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे बाह्यवळण रस्ता, वडाळा येथील जीएसटी भवन, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे, सारथीसंस्थेचे छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, खारघर, अमरावतीतील सारथीच्या विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम, औंध-पुणे येथील नियोजित एम्स हॉस्पिटल, रत्नागिरी येथील मिरकरवाडा बंदर विकास, मुंबई येथील रेडीओ क्लब जेट्टी, नेरळ-शिरुर-कर्जत रस्ता, सातारा सैनिक स्कूल, परळी (जि. बीड) येथील शासकीय पशूवैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील शासकीय पशूवैद्यकीय महाविद्यालय, पुरंदर विमानतळ, बारामती विमानतळ, बीड विमानतळ, पुणे येथील कृषीभवन, ऑलिम्पिक भवन, कामगार कल्याण भवन, नगररचना भवन, सहकार भवन, नोंदणीभवन, पुणे येथील वीर लहूजी वस्ताद स्मारक, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे वढू आणि तुळापूर येथील स्मारक, फुलेवाडा स्मारक आदी प्रकल्पांच्या प्रगतीचा देखील आढावा घेतला.

# ई-चलनातील जाचक अटींना लगाम
## समिती गठीत करण्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

वाहतूक व्यावसायिकांच्या ई-चलन प्रक्रियेतील तक्रारी व अडचणी दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत संबंधित विभागांना एका महिन्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. यासाठी परिवहन विभाग, पोलीस, वाहतूक तज्ज्ञ आणि संघटनांचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त समितीची स्थापना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीत उद्योग मंत्री उदय सामंत, अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह विविध वाहतूक



संघटनांचे प्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की ई-चलन प्रणालीत सुधारणा करताना वाहनचालक व मालकांना प्रोत्साहन मिळेल अशा निकषांचा समावेश असावा. एकाच चुकीसाठी एकाच दिवशी अनेक चलने नकोत, त्यासाठी ग्राह्यता कालावधी निश्चित करावा, असेही त्यांनी सूचित केले.

मुंबईत जड वाहतुकीसाठी पार्किंगची विशेष सोय व्हावी, व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय पार्किंगची योजना तयार व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी चलन प्रक्रियेतील जाचक अटी त्वरित बदलण्याची गरज व्यक्त केली. जुने फोटो वापरून दंडात्मक कारवाई करणाऱ्या पोलीस पद्धतीवरही त्यांनी गंभीर आक्षेप घेतला. पार्किंग माफियांच्या वाढत्या त्रासावर प्रतिबंधात्मक उपाय करण्याचे सूचित करत त्यांनी मुख्यमंत्री रोजगार योजनेत वाहतूक व्यवसायाचा समावेश करण्याचे आश्वासन दिले.

संघटनांच्या प्रतिनिधींनी कारवाईच्या वेळी रिअल टाइम फोटो अपलोड अनिवार्य करावा, अशा मागण्या मांडल्या. अनावश्यक आणि अन्यायकारक चलन वसुलीमुळे व्यावसायिक अडचणीत येतात, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले की शासनाची भूमिका समस्यांचे निराकरण आणि सहिष्णू अंमलबजावणी यावर केंद्रित आहे. एक महिन्यात समिती अहवाल सादर करेल आणि त्यानंतर सुधारित धोरण लागू करण्यात येईल.

वाहतूक व्यावसायिकांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी राज्य सरकार गंभीर असल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे. ई-चलनाच्या नावाखाली होणाऱ्या अन्यायाला आता लगाम बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## हिंदी सक्तीला शिवसेनेचा जोरदार विरोध!
### ७ जुलैच्या आंदोलनाला दिला पाठिंबा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २६ :**



महाराष्ट्रात हिंदी सक्तीविरोधात जनआक्रोश वाढत असतानाच आता या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. मराठी अभ्यास केंद्राच्या वतीने ७ जुलै रोजी आझाद मैदानात होणाऱ्या आंदोलनाला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पाठींबा देत सर्व मराठी बांधव, कलाकार, साहित्यिक आणि खेळाडूंना आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. आम्ही कोणत्याही भाषेचा द्वेष करत नाही, पण हिंदीची सक्ती म्हणजे भाषिक आणीबाणीचा प्रकार आहे, असं सांगत ठाकरे यांनी भाजपा सरकारवर सडकून टीका केली.

हे सगळं मुद्दामून चाललंय, एकाधिकारशाहीकडे वाटचाल करणारा छुपा अजेंडा आहे. सगळं सुरळीत असताना विषाचा खडा टाकणं हे भाजपचं धोरण आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. मी मुख्यमंत्री असताना मराठी भाषेची सक्ती केली होती, त्याचं पुढं काय झालं? असा सवाल करत त्यांनी राज्य सरकारच्या ढिसाळ अंमलबजावणीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. उद्धव ठाकरे यांनी त्रिभाषा सूत्रालाही विरोध करत विचारलं - देशात एवढ्या भाषा असताना केवळ हिंदीलाच प्राधान्य का? त्रिसुत्री नको, वीस सूत्री आणा.

# राज्यातील वीज ग्राहकांना सरसकट दिलासा
## घरगुती ग्राहकांसोबत औद्योगिक आणि व्यावसायिक वीजदरात कपात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.

राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपातीचा प्रस्ताव महावितरणकडून सादर झाला आणि आयोगाने आगामी पाचही वर्षात वीजदर कमी करण्याचा आदेश दिला. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये आहेत. राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे.

वीजदर कमी करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महत्त्वाकांक्षी योजना उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अंमलात येणाऱ्या या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जेद्वारे वीज तयार करून त्यावर पंप चालविण्यात येणार आहेत. या योजनेची क्षमता सोळा हजार मेगावॅट इतकी असेल व त्या माध्यमातून सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच महावितरणच्या वीजखरेदी खर्चात कपात करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

महावितरणने नजिकच्या भविष्यातील विजेची गरज ध्यानात घेऊन रिसोर्स ॲडेक्वसी प्लॅन तयार केला असून त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या याचिकेनुसार प्रथमच वीजदर कपातीचा आदेश दिला आहे. वीजदर कपातीमुळे घरगुती ग्राहकांना दिलासा मिळतानाच उद्योग व्यवसायांना चालना मिळणार आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्य घरगुती ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्याचे आश्वासन दिले होते व त्याचे पालन झाले आहे. दरवर्षी औद्योगिक व व्यावसायिक वीजदरात दहा टक्के वाढ होत होती.

त्याऐवजी आता पुढील पाच वर्षात या घटकांच्या वीजदरात कपात होणार आहे. मा. पंतप्रधानांच्या स्वप्नाला अनुसरून मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्याला एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याला वीजदर कपातीमुळे महत्त्वाचे योगदान मिळणार आहे. ग्राहकांना किफायतशीर दरात दर्जेदार वीज पुरवठा करण्यास महावितरण वचनबद्ध आहे.

## धुडगूस घालत नऊ वाहनांच्या काचा फोडल्या

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २६ :**

शहरातील वाल्हेकरवाडी परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात टोळक्याने रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांची तोडफोड केली आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं आहे.

चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाल्हेकरवाडी परिसरात सहा चारचाकी आणि तीन रिक्षांना लक्ष करत काचा फोडल्या आहेत. सिमेंटच्या गट्टूने वाहनांची तोडफोड करण्यात आली. ही घटना मध्यरात्री अडीचच्या सुमारास घडली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे यांनी दिली आहे. वाहन तोडफोडीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पाच जणांच्या टोळक्याने ही तोडफोड केल्याची माहिती त्यांनी दिली आहे. पाच जणांपैकी दोघांना अटक करण्यात पोलिसांना यश आल आहे. इतर तिघांचा शोध पोलीस घेत आहेत.

सर्वसामान्य नागरिक रस्त्याच्या कडेला आपली वाहने पार्क करतात. परंतु, अशा पद्धतीने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती वाहनांना लक्ष करत सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान करत आहे. या आधीदेखील पिंपरी-चिंचवडमध्ये अनेकदा असे प्रकार घडलेले आहेत. पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्यादेखील आवळल्या आहेत.

# ११ वर्षापासून सुरु असलेल्या अघोषित आणीबाणीचे काय?
## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २६ :**

देशातील तत्कालीन परिस्थितीमुळे इंदिरा गांधी यांना आणीबाणीचा निर्णय घ्यावा लागला होता. त्यावेळी झालेल्या काही घटनांवर इंदिरा गांधी, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी प्रशासनाकडून काही चुका झाल्याचे मान्य केले. पण भाजप आणीबाणीवर फक्त कांगावा करत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी आणीबाणीचे समर्थन केले होते. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाशी संघाचा संबंध नाही, असेही जाहीर केले होते. त्यामुळे भाजपला बाळासाहेब देवरसांची भूमिका मान्य नाही का? गेल्या ११ वर्ष[पासून देशात सुरु असलेल्या अघोषित आणीबाणीचे काय? असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी केला.

भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने आज आणीबाणीला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्त आज राजभवन येथे एका शासकीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमात ' भारतीय इतिहासातील काळाकुट्ट अध्याय, संविधान हत्या दिवस २०२५' निमित्ताने



लोकतंत्र सेनानींच्या सत्कार करण्यात आला. यावरून काँग्रेसने आज भाजपवर जोरदार टीका केली.

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू करण्याचा जो निर्णय घेतला होता तो संविधानिक होता. देशात काही शक्ती अराजक निर्माण करू पहात होत्या. नंतर आणीबाणी उठवून निवडणुका घेतल्या आणि लोकशाही प्रक्रिया पार पाडली. इंदिरा गांधी यांनी आणीबाणीवेळी देशाची संपत्ती विकली नाही.

सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या उद्योगपतींच्या घशात घातल्या नाहीत. पण देशात मागील ११ वर्षांपासून विमानतळ, बंदरे, खाणी, बँका, सरकारी जमिनी लाडक्या उद्योगपतीला विकल्या जात आहेत. धारावीची जमीन विकली आहे. देशात आज हुकूमशाही असून भाजपचा भस्मासूर लोकशाही गिळू पहात आहे,

# विविध महामंडळामार्फत सुरू असलेल्या योजनांमध्ये बदल करावेत : माधुरी मिसाळ

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

विविध महामंडळामार्फत संबंधित प्रवर्गाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास करण्याच्या दृष्टीने विविध योजना राबविण्यात येतात. काळानुरूप या योजनांमध्ये सुधारणा करण्यात यावी व कर्जाची रक्कम वाढविण्यासंदर्भात कार्यवाही करावी, असे निर्देश सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळ तसेच सामाजिक न्याय विभागाअंतर्गत येणाऱ्या महामंडळाच्या कामाचा आढावा मंत्रालयात राज्यमंत्री मिसाळ यांनी घेतला.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, काळानुरूप योजनांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात, कर्जाची रक्कम आणि वार्षिक उत्पन्नाची



मर्यादा वाढविण्यात यावी. तसेच विविध योजनांमार्फत लाभार्थ्यांना व्यवसाय व उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो, यामध्ये शासन अनुदान देते. हे कर्ज बँकमार्फत देण्यात येत असल्याने कर्ज वसुलीची सर्वस्व जबाबदारी बँकेला देण्यासंदर्भात कार्यवाही करावी. चर्मोद्योग संदर्भातले प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास विभागाशी समन्वय साधून नव तरूणांना त्याचे प्रशिक्षण द्यावे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. चर्मोद्योगातील तंत्रज्ञान विकसीत करून, चर्मवस्तूंसाठी बाजारपेठ निर्माण करण्यात यावी.

बैठकीत महात्मा फुले मागासवर्ग महामंडळातील सुविधा कर्ज, उत्कर्ष कर्ज, सुक्ष्म पतपुरवठा योजना, महिला समृद्धी, उच्च शैक्षणिक कर्ज योजना, सॅनेटरी मार्ट, स्कीम फॉर रिहॅबलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना, स्वच्छता उद्यमी योजनेसदंर्भात आढावा घेण्यात आला.

ऊसतोड कामगारांची नोंदणी घेण्यासंदर्भात संबंधित साखर कारखान्याशी समन्वय साधून कार्यवाही करता येईल का, त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी काही उपाययोजना आखण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करा, आरोग्यासंदर्भातील प्रबोधनाबाबत विशेष योजना राबवाव्यात. सुरू असलेल्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांची संख्या, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा व अनुदानाबाबत सविस्तर अहवाल सादर करावा, असेही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

सर्व महामंडळांच्या योजनांची एकाच व्यासपीठावर माहिती उपलब्ध व्हावी यासाठी पोर्टलची निर्मिती करावी. जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत कार्यान्वित योजनांची माहिती पोहोचावी यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने सोशल मीडियाचा वापर करावा. सुरू असलेल्या योजनांमध्ये सुधारणा करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवाव्यात, असेही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले. यावेळी महात्मा फुले महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब बेलदार, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार, उपसचिव वर्षा देशमुख, महाव्यवस्थापक प्रशांत गेडाम, उपमहाव्यवस्थापक दत्तराज शिंदे उपस्थित होते.

## सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्हीसंदर्भात नवे धोरण आणणार : योगेश कदम

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यासंदर्भात सर्व शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधून, पोलीस विभागाच्या माध्यमातून सचिव पातळीवर एक समिती स्थापन करून धोरण तयार करण्यात येणार असल्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंह यांच्यासह नगर विकास व गृह विभागाचे मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यात वेगवेगळ्या शासकीय यंत्रणांनी आपापल्या स्तरावर उउळश कॅमेरे बसवलेले असले तरी यामध्ये एकसंधपणा नसल्यामुळे सर्व शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधून, पोलीस विभागाच्या माध्यमातून सचिव पातळीवर समिती स्थापन करून सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्याचे धोरण मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येईल, असे गृह राज्यमंत्री कदम यांनी सांगितले.

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा स्तर उंचावण्यासाठी



तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यात सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरत असून, त्यांचा वापर गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी ठरत आहे. त्यामुळे यापुढे सर्व सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही लावणे बंधनकारक करण्यासाठी नियोजन केले जात असल्याचे श्री. कदम यांनी स्पष्ट केले. नवीन धोरणानुसार कोणती यंत्रणा कोणत्या प्रकारचे सीसीटीव्ही बसवेल, त्यांचा देखभाल खर्च, फुटेज, यासारखे अनेक महत्त्वाचे मुद्दे निश्चित केले जाणार आहेत. सार्वजनिक ठिकाणची सुरक्षा ही संपूर्ण प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे, असेही नमूद केले.

# १५ दिवसांपासून पावसाची दडी शेतकऱ्यांची खरीप पेरणी संकटात

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. २६ :** यंदाच्या पावसाळ्यात मान्सून नेहमीपेक्षा सुमारे आठ दिवस आधी हजेरी लावणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज यंदा पावसाने खोटा ठरवला आहे. जुनच्या सुरूवातीस जिल्हा व्यापणाऱ्या पावसाने यंदा जून संपत आला येईस्तोवर दडी मारली असल्याने शेतकऱ्यांचे खरीपाचे गणीत बीघडत चालले आहे. आतापर्यंत जून महिन्याच्या सरासरीपेक्षा केवळ ५१ टक्के पाऊस जिल्ह्यात झाला आहे. त्यामुळे पेरण्या खोळंबून पडल्या असून शेतकऱ्यांच्या नजरा मात्र चातकाप्रमाणे आभाळाकडे लागल्या आहेत.



यंदाचा पावसाळा दरवर्षीपेक्षा चांगला राहून सरासरीपेक्षा जास्त पाऊस प्रत्येक महिन्यात येणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी जुनपुर्वीच खरीपाच्या लागवडीची पूर्ण तयारी केली होती. पाऊस वेळेवर येणार असल्याचे सांगण्यात आल्याने काहींनी मृगाच्या मुहूर्तावर पेरण्या आटोपल्या. असे असताना जून महिन्याचे शेवटचे सात दिवस शिल्लक असताना अद्यापपर्यंत दमदार पाऊस जिल्ह्यात झालेला नाही. महागाव, उमरखेड, आर्णी, मारेगाव, वणी असे काही तालुके वगळता उर्वरीत सर्व तालुक्यांकडे पावसाने पाठ फिरवलेली आहे. जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी १३६ मिलीमीटर पाऊस होतो. मात्र २५ तारखेपर्यंत जिल्ह्यात केवळ ७० मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. या पावसाची टक्केवारी सरासरीच्या तुलनेत केवळ ५१ टक्के इतकी असल्याने शेतकऱ्यांची चिंता चांगलीच वाढली आहे. यंदा जिल्ह्यात ९ लाख हेक्टरवर खरीपाच्या पेरणीचे नियोजन आहे. मात्र पावसाने दडी मारली असल्याने निम्म्या क्षेत्रावर पेरण्या आटोपल्या आहेत. उर्वरीत क्षेत्र अद्याप पेरण्यांची वाट पाहत असुन आता मेघराजा कधी बरसणार याकडे लक्ष लागले आहे. केवळ ५१ टक्के झाल्या पेरण्या; चिंता वाढली जिल्ह्यात यंदा ९ लाख १९ हजार हेक्टरवर खरीपाच्या लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र पाऊस रखडून पडल्याने त्याचा फटका पेरण्यांना बसत आहे. आतापर्यंत केवळ ४ लाख ७० हजार हेक्टरवर पेरण्या आटोपल्या असून त्या एकूण नियोजनाच्या ५१ टक्के इतक्या आहेत. यामध्ये ३ लाख २ हजार हेक्टरवर कापूस, १ लाख १२ हजार हेक्टरवर सोयाबीन तर ५३ हजार हेक्टरवर तुरीची लागवड करण्यात आली आहे. पाऊस न आल्यास पुढील पेरण्या खोळंबण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात अद्यापपर्यंत चांगला दमदार पाऊस सर्वत्र बरसलेला नाही. असे असताना जिल्ह्यात मोठ्या प्रकल्पांमध्ये गेल्यावर्षी या वेळेस असलेल्या पाणीसाठ्याच्या तुलनेत चांगला पाणीसाठा उपलब्ध झाला असल्याचे दिसत आहे. त्यात बेंबळा धरणामध्ये गेल्या वर्षी याचवेळी ३८.३३ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. यंदा मात्र सध्या ५१.८९ टक्के पाण्याचा साठा शिल्लक आहे. याचप्रमाणे सध्या पुस धरणात २५ टक्के तर अरुणावती प्रकल्पामध्ये ३९.४९ टक्के पाण्याचा साठा सध्या उपलब्ध आहे. याऊलट मध्यम प्रकल्पामध्ये मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा कमी उपलब्ध आहे.

आठ दिवसात हवा दमदार पाऊस; उत्पादन घटणार जुन महिना लोटत आला असताना आतापर्यंत जुनच्या सरासरीच्या ५१ टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे पेरण्या खोळंबुन शेतकऱ्यांची चिंता वाढलेली आहे. जिल्ह्यात खरीपाच्या हंगामात सर्वाधीक पेरा कपाशीचा असतो. मात्र कपाशीची लागवड जुन महिन्यात झाल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना होतो. त्यापेक्षा उशीर झाल्यास कपाशीचे उत्पन्न घटण्याची शक्यता असते. त्यामुळे आता जुन महिन्याच्या या शेवटच्या आठ दिवसात दमदार पाऊस होणे सध्यातरी आवश्यक आहे.

## महायुतीने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले

### खा. प्रतिभा धानोरकर : काँग्रेस पक्षाची आढावा बैठक



■ महासागर प्रतिनिधी,

**घाटंजी , दि. २५ :** विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात महायुतीने शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचे ठोस आश्वासन दिले होते. मात्र, सरकार स्थापन झाल्यानंतर हे आश्वासन पूर्ण करण्याऐवजी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले, अशा शब्दांत चंद्रपूर-आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सरकारवर टीका केली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक बाळकृष्ण मंगलम येथे नुकतीच काँग्रेस पक्षाच्या आढावा बैठक पार पडली. जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीसंदर्भात झालेल्या या बैठकीत तालुका काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस यांसह विविध विभागातील पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. पुढे त्या म्हणाल्या, कर्जमाफीचा हा विसर नसून ही त्यांची ठरवून केलेली खेळी आहे. जनतेला काहीतरी सांगायचे आणि प्रत्यक्षात काही वेगळेच करायचे हेच त्यांच्या राजकारणाचे मूळ आहे. सध्या अनेकजण निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. त्यांनी आपली तयारी करावी. मात्र पक्ष ज्या उमेदवाराला अधिकृत तिकीट देईल, त्या उमेदवाराच्या विजयासाठी सर्वांनी ताकदीने काम करावे. पक्ष त्यांच्यानंतर योग्य विचार करेल, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. माजी मंत्री अॅड. शिवाजीराव मोघे, वसंतराव पुरके, आमदार बाळासाहेब मांगुळकर, मोहम्मद नदीम, रमेश लोणकर, एकलाख पटेल, जितेंद्र मोघे, माणिक मेश्राम, स्वामीबाबू काटपेल्लीवार, जाफर खान आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. काँग्रेस पक्ष संघटनात्मक बळकटीसह जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष करत जनाधार वाढवण्याचा निर्धार केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र मोघे यांनी केले. संचालन जितेंद्र जुनगरे यांनी तर आभार सागर डंभारे यांनी मानले. या वेळी रुपेश कल्लमवार, आशिष लोणकर, परेश कारिया, किशोर भगत, डॉ. विजय कडू, अभिषेक ठाकरे, वैजयंती ठाकरे, संगीता भुरे, शोभा ठाकरे, सुभाष गोडे, सुनील देठे, अरविंद चौधरी, सुनील हुड, अक्षय पवार, सागर डंभारे, गणेश उन्नरकर, राजू मुनेश्वर आदी उपस्थित होते. महायुती सरकारकडून जनतेचा विश्वासघात या बैठकीत माजी मंत्री माणिकराव ठाकरे यांनीही महायुती सरकारवर कठोर टीका केली. महायुतीचे सरकार फसव्या आश्वासनांवर सत्तेवर आले आहे. काँग्रेसने सत्तेत असताना देशातील सर्वात मोठी शेतकरी कर्जमाफी केली होती. मात्र, महायुतीने केवळ खोटे बोलून जनतेचा विश्वासघात केला आहे, असा आरोप त्यांनी केला.

## पशुधन चोरणारी टोळी सक्रिय सीसीटीव्हीमुळे घटना उघड

■ महासागर प्रतिनिधी,

**दिग्रस , दि. २६:** दिग्रस शहरात अनेक दिवसांपासून पशुधन चोरी होत असल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्या आहेत. परंतु, याबाबत पोलिसांना कोणताच सुगावा लागत नसल्याने पशुधन चोरट्यांचे मनसुबे वाढत आहे. अनेक गायी दिग्रस शहरातून चोरी गेल्याच्या घटना असताना यावर पोलिसांनी आतापर्यंत लगाम लावला नाही.



अशातच मंगळवार दि. २४ जूनच्या मध्यरात्री दिग्रस वडवाला जीन समोरील साई हॉस्पिटल समोरून रात्रीच्या वेळी एका चारचाकी वाहनात गायीला टाकतांनाचा सीसीटीव्ही फुटेज मिळाल्याने त्या अज्ञात चोरट्यांना पकडण्याचे आव्हान पोलिसांपुढे उभे ठाकले आहे. दिग्रस शहरात गाय चोरतानाचा सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्याने नागरिकांनी पोलीस ठाणे गाठून हा सर्व प्रकार सांगितला.

त्या पशुधन चोरी करणाऱ्या अज्ञात आरोपीचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी पोलिस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्याकडे राहुल देशपांडे, प्रज्योत अरगडे, सुरेश झोळ, अफजल खान, निखिल गुप्ता यांनी केली आहे.

## भाजीपाल्याचे दर वाढल्यामुळे बजेट बिघडले

■ महासागर प्रतिनिधी,

**मारेगाव, दि. २६ :** गेल्या काही दिवसांपासून उष्णतेच्या झळा वाढल्या होत्या, आता पावसाळा सुरु झाला. त्यात रोहिणी मृग नक्षत्राने दगा दिला. आता आद्र नक्षत्राचा काही पाऊस होईल याची प्रतीक्षा आहे. त्यामुळे त्याचा थेट परिणाम भाजीपाला उत्पादनाला बसला असून फळभाज्या त्याचबरोबर पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. त्यामुळे गृहिणीचे बजेट बिघडले आहे. जून महिन्यात बहुतांश ठिकाणी पावसाला सुरुवात झाली आहे. मात्र, जून महिन्यात वाढलेले तापमान आणि कमी, जास्त प्रमाणात होत असलेल्या पावसामुळे त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या पिकावर होत आहे. भाजीपाल्याचे भाव सध्या कडाडले आहेत. पुढील काही दिवसात भाजीपाल्याचे दर अजून वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या ताटातून भाजी कमी होणार की काय, हा प्रश्न पडला आहे. भाजीपाल्यांचे दर सध्या वाढले असून सध्या बाजारात हिरवी मिरची प्रती किलो १०० ते १२० रुपये दराने विकली जात आहे. कोथिंबीर २०० रुपये किलो दराने विकली जात आहे.



कांदे प्रती किलो ५० रुपये, भेंडी ८० रुपये, बटाटे ४० रुपये, ढोबळी मिरची ८० रुपये, कोबी १०० रुपये, टोमॅटो ७० ते ८० रुपये किलोने विक्री होत आहे. दुसरीकडे कमी, जास्त तापमानामुळे पालेभाज्या शेतातच खराब होत आहेत. जिल्ह्यामध्ये यावर्षी जून महिना संपत आला तरी पुरेसा पाऊस पडलेला नाही. तालुक्यात नदी, नाले अजूनही कोरडे आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम भाजीपाला पिकांवर झालेला आहे. भाजीपाला पिके वेळेवर न निघाल्यामुळे दर वाढले आहेत. गेल्या पंधरवड्यात सर्वच भाजीपाल्याच्या दरामध्ये पंधरा ते वीस टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचा विक्रेते सांगत आहेत. महागडा भाजीपाला हा गृहिणींचे बजेट बिघडवणारा ठरत आहे.

## रिमझिम पावसातही रस्त्यावर डबके

### रस्ते खाली गेल्याने दरवर्षी उद्भवते समस्या



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला , दि. २६:**

मंगळवारी दुपारी झालेल्या पावसाने शहरातील तोष्णीवाल ले-आऊट, जवाहर चौक बारा ज्योर्तिलिंग मंदिर, जुने शहरातील रमेशनगर, वाशीम रोडवरील रुपचंदनगर आणि सहकार नगरातील ब्लेसिंग टॉवरलगतच्या रस्त्याला अक्षरश: तलावाचे स्वरूप आले होते. तासाभराच्या रिमझिम पावसाने गुडघ्यापेक्षा जास्त पाणी या रस्त्यांवर साचल्याने अनेक वाहने बंद पडली. काहीजण घसरून पडून जखमीदेखील झाले. शहरातील अशी काही विशिष्ट ठिकाणे आहेत की तेथे किरकोळ पाऊस जरी झाला की तेथे काही वेळातच गुडघाभर पाणी साचते, अशा काही निवडक ठिकाणी 'दिव्य मराठी'च्या प्रतिनिधीने बुधवारी भेट देऊन पाहणी केली असता अनेकांच्या घरांचे बांधकाम उंच झाले आणि रस्ते खाली गेल्याने उदभवतेय समस्या उद्धवत असल्याचे दिसून आले. तसेच या रस्त्यांवर पाण्याचे डबके साचणाऱ्या ठिकाणी पाण्याच्या निचरा होण्यासाठी गटारींचा अभाव असल्या चे दिसून आले. लवकरच समस्या सुटेल: घराचे बांधकाम करताना प्रत्येकजण उंच ओटा करत आहे.

तसेच सांडपाणी रस्त्यावर काढले आहे. अनेक ठिकाणी पावसाचे सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटारीच नसल्याने ही समस्या उद्धवत आहे. शहरात भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झाले की रस्त्यांचे काम करताना नाल्यांचे बांधकाम करुन ही समस्या कायमची सोडवली जाईल, असे महापालिकेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर यांनी सांगितले. उपाय : पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी महापालिकेच्या वतीने नालीचे बांधकाम केलेले नाही.

## संकलन रथाद्वारे शहरात करणार प्लास्टिक, ईकचऱ्याचे संकलन

### ज्ञानदर्पण शाळेसमोर शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला , दि. २६:** शहरी भागात दिवसेंदिवस वाढणारा प्लास्टिक व ई-कचरा आणि हरवत चाललेली हरित संपदा या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिका, अहिल्यादेवी महिला शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ आणि पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. 'प्लास्टिक व ई-कचरा संकलन आणि वृक्षारोपण अभियान' या शीर्षकाखाली ज्ञानदर्पण इंग्रजी शाळेसमोरील मैदानावर या उपक्रमाचा शुभारंभ झाला. अभियानात अकोल्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवला. घरोघरी साठवलेले प्लास्टिक, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपात्रे, फुटलेले इलेक्ट्रॉनिक उपकरणे जसे की मोबाईल, चार्जर, माऊस, रिमोट आदी संकलित करण्यात येत आहे. तसेच कार्यक्रमात परिसरात वृक्षारोपण करून हरित क्रांतीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. यावेळी उपस्थित नागरिकांना कचऱ्याचे वर्गीकरण,



पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि प्लास्टिक टाळण्याचे महत्व पटवून देण्यात आले.

यावेळी शाळेच्या प्रमुख पल्लवी कुलकर्णी, मनपाचे अनिल बिडवे, डॉ. अजय उपाध्याय, पर्यावरण संरक्षक डॉ. योगेश व डॉ. मनीषा पालीवाल, निशिकांत बडगे, गणेश पावसाळे, देविदास निकाळजे, दिलीप जाधव, संजय कुलकर्णी, रूपेश कामले आदी उपस्थित होते.

भविष्यात अशा उपक्रमांची आवश्यकता : नागरिकांनी घरचा प्लास्टिक व ई-कचरासोबत आणून देणे, पर्यावरण रक्षणावर आधारित मार्गदर्शन सत्र, वृक्षारोपणाचा सहभाग, विद्यार्थी आणि बालकांसाठी माहितीपर उपक्रम असे या उपक्रमाचे स्वरूप आहे. कार्यक्रमाच्या वेळी 'प्लास्टिक आणि ई-कचऱ्याचेकरूया दान, पर्यावरणाची वाढवूया शान!', अशा घोषवाक्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

हा उपक्रम पर्यावरण स्नेही जीवनशैलीकडे एक सकारात्मक पाऊल म्हणून ओळखला जात आहे. भविष्यात अशा अधिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सर्वच मान्यवरांनी यावेळी अधोरेखित केले.

'प्लास्टिक व ई-कचरासंकलन रथ' शहरात पुढील १५ दिवस फिरणार आहे. कौलखेड, केशवनगर, गोरक्षण रोडसह शहरातील विविध भागात रथामध्ये नागरिकांनी कचऱ्याचे संकलन करून टाकण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग आहे. तसेच शहरातील शाळांमध्ये संपर्क करून 'प्रत्येक विद्यार्थी एक प्लास्टिक ब्रिक' या उपक्रमात १ लाख ईको ब्रिकचे संकलन देखील करण्यात येत आहे.

## नोटीस न बजावता धडकले पथक

### शेतकऱ्यांकडून विरोध : उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली धाव

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. २६ :** तालुक्यातील साकूर येथे काही शेतजमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. हे अतिक्रमण काढण्यासाठी अतिक्रमण धारकांना कुठलीही नोटीस न बजावता सोनर कंपनीचे अधिकारी, पोलिस पथकासह आले असता अतिक्रमण धारकांनी त्यांना विरोध केला. बुधवारी दि. २५ जून रोजी दुपारी घडलेल्या या घटनेची माहिती मिळाल्याने शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी धाव घेतली. त्यानंतर मात्र काही काळ तनावाचे वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यातील मांगूळ गावापासून काही अंतरावर असलेल्या साकूर हेटभ या गावामध्ये महसुल विभागाच्या जमिनीवर सौरउर्जा प्रकल्प मंजूर झाला आहे. या प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या जमिनीवर या परिसरातील ११ शेतकऱ्यांचे गेल्या ५० वर्षांपासून अतिक्रमण आहे.



हे शेतकऱ्यांचे अतिक्रमण काढण्यासाठी संबंधीत कंपनीचे अधिकारी मोठा पोलिस फौज फाटा घेवुन त्या ठिकाणी गेले होते.

मात्र हे अतिक्रमण काढण्यासंदर्भात कुठलीही नोटीस मिळाली नाही असे सांगत शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला. यावेळी शेतकऱ्यांवर दबाव टाकण्यात येत असल्याची माहिती मिळताच शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख किशोर इंगळे आणि प्रवीण शिंदे यांनी त्या ठिकाणी धाव घेतली.

साकूर हेटी येथे जावुन त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून प्रशासनाच्या या कारवाईला विरोध केला. कुठल्याही नोटीसविना जमीन खाली करता येणार नाही, असे ठणकावून सांगितले.

## जागतिक योगा दिन उत्साहात साजरा

### आमदार राजेश वानखडे यांची प्रमुख उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी,

**तिवसा, दि. २६ :** येथील आरोग्यम नेचर क्युअर सेंटर अँड योगाच्या वतीने श्री जीत मंगल कार्यालयात योगा दिनाचा कार्यक्रम झाला. योगा दिनाच्या कार्यक्रमाला आमदारासह अधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शविली होती. तिवसा येथील प्राकृतिक चिकित्सक, योग प्रशिक्षक म्हणून काम पाहणाऱ्या डॉ. मनीषा संदीप अमृतकर ह्या जागतिक योग दिनाचा कार्यक्रम आयोजित करीत असतात. या वर्षी सुद्धा त्यांनी श्रीजीत मंगल कार्यालयात योग दिनाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती तिवसा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे, तहसीलदार मयुर कळसे, या.द. व. देशमुख कॉलेजचे प्राचार्य डॉ हेमंत देशमुख, नगरसेवक अनिल थुल, प्रदीप गौरखेडे, विनोद पटेल, नगरसेविका अर्चना भोंबे, गुणवंत देवतारे, हेमंत निखाडे, शशिकांत फुलझेले, डॉ. संदीप अमृतकर, डॉ शिल्पा पाटील उपस्थित होते.

या वेळी आ. राजेश वानखडे यांनी सांगितले की, दैनंदिन जीवनात



योग प्राणायाम हे महत्त्वाचे आहे. प्रत्येकाला आरोग्य जर चांगले ठेवायचे असेल, तर योगा हा करायलाच पाहिजे, असे आवाहन त्यांनी यानिमित्त केले. त्यानंतर मान्यवरांनी योगा प्रात्यक्षिकात सहभाग घेऊन योगा केला. कार्यक्रमाचे संचालन विवेक गौरखेडे यांनी केले तर आभार डॉ संदीप अमृतकर यांनी मानले.


**मध्य रेल्वे**

**ई-टेंडर सूचना क्रमांक NGP/L/2025/T/12 तारीख: 24.06.2025**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य) मध्य रेल्वे, दुसरा मजला, डीआरएम इमारत, किंग्सवे रोड, नागपूर-४४०००१ हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने www.ireps.gov.in या वेबसाइटद्वारे खालील कामांसाठी ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नाव: एनजीपी स्टेशनवरील प्लॅटफॉर्म (पीएफ क्रमांक १ ते ८) दरम्यानच्या सीसी मार्गासाठी प्रकाश व्यवस्था करण्याची तरतूद. कामाची निविदा किंमत रु. १९,४०,२६९.८०/- (रूपये एकोणीस लाख चाळीस हजार दोनशे एकोणसत्तर पैसे फक्त.) बोली सुरक्षा रु.: ३८,८००/- निविदा फॉर्मची किंमत रु.: शून्य. पूर्ण कालावधी: ६ महिने. ही ऑफर ६० दिवसांसाठी खुली राहील. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: २२.०७.२०२५ रोजी ११.०० वाजेपर्यंत. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: २२.०७.२०२५ रोजी ११.१५ वाजेपर्यंत. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in सविस्तर निविदा सूचना वरिष्ठ डीईई (जी) एनजीपी दुसरा मजला, डीआरएम कार्यालय इमारत, नागपूर यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात आली आहे. शिवाय, इतर कोणत्याही सुधारणा आणि शुद्धिपत्रक, जर असतील तर, ते फक्त वेबसाइटवरच पाहता येतील.

वरिष्ठ डी.ई.ई (जनरल)
मध्य रेल्वे, नागपूर

Apex-98

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे



**कार्यालय**

**ग्रामपंचायत सुकळी (गुपचूप)**

पंचायत समिती हिंगणा ,जिल्हा परिषद नागपूर

ग्रा.पं. सुकळी (गुपचूप) अंतर्गत सन २०२५/२६ मध्ये विविध योजणे अंतर्गत होणाऱ्या बांधकामा करिता लागणारे बांधकाम साहित्य व विविध प्रकारचे लागणारे साहित्य तसेच पाणीपुरवठा साहित्य .दिवाबत्ती साहित्य व इतर किरकोळ साहित्य ई -निविदा द्वारे सन २०२५/२६ करिता मांगविण्यात येत आहे

सूचना क्रमांक - ०१-२०२५/२६ (ई -निविदा)/(पहिली वेळ)

जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.in या संकत स्थळावर ई -निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) दरपत्रकविक्रीचा दिनांक:- २५/०६/२०२५ ला दु. ४.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

२) दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक :०२/०७/२०२५ ला सां. ४.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .

३) दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-०३/०७/२०२५ ला सां. ४.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-
सरपंच /उपसरपंच / ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत सुकळी (गुपचूप)
पं.स.हिंगणा जि.पं.नागपूर



MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Online tender is invited in two bids as detailed below.

| Sr. No. | Tender No. | Name of Work | EMD / Est. Value In Rs. | Sale Period / Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | T-06 / 3000059070/ 2025-26 | **Name of Work :-** Koradi TPS- Work of providing and fixing Mild Steel Grill work in Jyot Bhawan in temple premises at Koradi. | EMD Rs. 16,150.00/- ---------------- Rs. 16,10,496.00 | 27.06.2025 TO 05.07.2025 upto 17.30 hrs. / 07.07.2025 upto 12.00 hrs. |

*E-Tender Cost will be Rs.1180/-*


1. For further details pertaining to the above tender is available on website www.e-procurement.mahagenco.in
2. Any amendment to this notice and or notification of amendment in bidding document shall be notified on website www.e-procurement.mahagenco.in only. Potential bidders are requested to take note of the same.
3. Agencies are requested to register themselves for E-Tenders.

Note : Vendors are advised to submit the bids well in advance of last date of submission. The E - Tender sale date and submission date will not be extended in any case.

Dy. Chief Engineer (Civil),
Civil Construction Circle, M.S.P.G.C.L., KORADI

'नीट' परीक्षेत कमी मार्क पडल्याने मुख्याधापक पित्याने मुलीला बेदम मारहाण केली अन् लेकीने जीव सोडला. सांगलीतील हा धक्कादायक प्रकार पाहून पुरोगामी महाराष्ट्राला 'अरे कुठे नेऊन सोडला महाराष्ट्र माझा' असे म्हणावेसे वाटते. शिक्षक म्हणून कवडीचाही लौकिक नसलेल्या बापाची हुशार लेक आज जगात राहिली नाही. दहावीला ९५ टक्के मार्क मिळालेल्या साधनाला म्हणावेसे वाटते की, साधना तू पास झाली आहे, पण तुझा बाप जीवनात नापास झाला. बारावीत शिकणाऱ्या मुलीला नीटला कमी मार्क पडल्याच्या रागातून माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक असणाऱ्या पित्याने आपल्या पोटच्या मुलीला लाकडी खुंट्यानं बेदम मारहाण केली. सांगलीतील आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी येथे ही घटना घडली. याप्रकरणी धोंडीराम भोसले या 'राक्षस' मुख्याध्यापक पित्यास अटक करण्यात आली. परीक्षेत कमी गुण कसे पडले? म्हणत रागाच्या भरात हा प्रकार घडला. साधना भोसले ही विज्ञान शाखेत शिकत होती. बारावीच्या चाचणी परीक्षेत साधनाला कमी गुण मिळाले. हे समजल्यावर हे महाशय प्रचंड संतापले. मुलीची आई प्रीती भोसले यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली ही महत्वाची बाब समजावी लागेल. एका बाजूला नराधम पती तर दुसऱ्या बाजूला जीव गमावलेली लेक. काय वाटले असेल त्या माऊलीला. साधना भोसले ही बारावीमध्ये शिक्षण घेत होती. डॉक्टर बनण्याचे तिचे स्वप्न होते. तिला नीटच्या चाचणी परिक्षेत कमी गुण मिळाले होते. दोन दिवसांपूर्वी ती घरी नेलकरंजी येथे गेली होती. कमी मार्क मिळाल्यानंतर ती प्रथमच घरी आली व तिला गंभीर मारहाण झाली. त्यामध्ये ती गंभीर जखमी झाली होती. विशेष म्हणजे तिला रुग्णालयात उपचारासाठी न नेता दुस?या दिवशी सकाळी राक्षस जातीचा हा पिता 'योग दिन' साजरा करण्यासाठी शाळेत निघून गेला. ज्या मुलीला दहावीमध्ये ९५ टक्के गुण मिळाले होते, ती मठ्ठ असू शकते का? डॉक्टर बनण्याचे तिचे स्वप्न होते. परंतु केवळ नीटच्या चाचणी परिक्षेत कमी गुण मिळाले म्हणून तिचा हकनाक बळी गेला. रात्रभर वेदनांनी विव्हळणारी साधना कधी कायमची झोपी गेली हे कुणालाच कळले नाही. आईने हालवून पाहिलं, ती निष्प्राण होती. दवाखान्यात दाखल करण्यात आले. उपचार सुरू झाले. डॉक्टर होऊन इतरांच्या वेदनेवर औषधोपचार करून त्यांना बरे करण्याचे तिचे स्वप्न होते. मात्र तिच्या देहाचे व स्वप्नाचंही शवविच्छेदन झाले होते. स्वतः शिक्षक असलेले वडील आता जेलमध्ये जाऊन बसले. स्वतःच्या मुलीला मारून बसले. शिकवण्याच्या नावाखाली गुण, शिस्त आणि गुन्हा या घटनेने एक प्रश्न आपल्या सर्वांसमोर ठेवला आहे, गुण हेच यशाचं मोजमाप का? अपेक्षा इतक्या कठोर असतात का? शिकवण्याचा अधिकार असलेल्यांना, प्रेम करण्याची जबाबदारी नाही का? साधना गेली. एक मुलगी, एक स्वप्न, एक विश्वास सगळं हरवलं. आता उरले आहेत काही पेपर क्लिप्स, वह्यांच्या शेवटी लिहिलेलं मी डॉक्टर होईन पप्पा, फक्त थोडा वेळ द्या... एक मूक साद बापाला व समाजाला. ही घटना केवळ एक गुन्हा नाही, ही एक साद आहे पालकांना. मुलांच्या गुणांपेक्षा त्यांचं मन वाचा. शिक्षकांनी शिस्त द्या, पण दडपण नाही. समाजाने यशची परिभाषा परत लिहावी. कारण पुन्हा एखादी साधना मारली जाऊ नये!






# साधना तू पास.... पण, तुझा बाप नापास!

थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

संबंधित नराधम शिक्षक स्वतःच्या लेकीला इतकी अमानुषपणे मारहाण करुन जिव घेत असेल, तर शाळेतील विद्यार्थ्यांसोबत तो काय वर्तन करत असेल? याची केवळ कल्पनाच केलेली बरी.

हा रानटी शिक्षकच असा बिघडला तर समाजानं कुणाकडं आशेने बघायचं? अशा माथेफीरू शिक्षकांमुळे चांगल्या शिक्षकांना तोंड दाखवायचीच नव्हे; तर ताठ मानेने फिरायची चोरी झाली आहे. पण साधनाच्या मृत्यूमुळे अनेक घटकांविषयी आता विचार करायची वेळ आली आहे. मुलांना काय वाटतं? त्यांना कोणत्या शाळेत जायचं आहे? त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या? यांचा साकल्याने विचार न करता मुलांच्या आयुष्याचं सगळं काही जणू आपल्याला कळतं, अशा गुर्मीत असलेले पालक मुलांच्या आयुष्याचे जवळपास सगळे निर्णय मुलांच्या परस्पर घेतात.

मुलांच्या आवडीनिवडी काय आहेत? हे अनेक पालकांच्या गावी नसते. वास्तविक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मुलांचा आदर पालकांनी करायला हवा. मात्र अलीकडे पालक मुलांचे मालक झाल्यासारखे वागताना दिसतात. मातापित्यांच्या लैंगिक सुखाच्या प्रेरणेतून, नैसर्गिक गरजेतून मुलांचा जन्म होतो.

पालकत्व ही जबाबदारी आहे. ती समजून उमजून विचारपूर्वक करायची कृती आहे हे किती पालक लक्षात घेतात? पालक व्हायच्या आधी हे सगळं लग्न झालेल्या दाम्पत्याला नीट समजून सांगितले पाहिजे. मुलांचं करिअर निवडताना पालक प्रचंड गोंधळलेले आहेत. संभ्रमात आहेत. ते इतरांचे कोणाचे तरी अनुकरण करताना दिसतात. यातून मुलांचे त्रास आणखी वाढत आहेत.

पालकांकडे पैसे आहेत म्हणून नीट किंवा जेईईसारख्या परीक्षांच्या तयारीसाठी शिकवणी लावली जाते. दहावीत मिळालेले भरमसाट मार्क्स अकरावी-बारावी विज्ञान आणि त्यापुढील प्रवेश परीक्षेत फारसे कामाला येत नाहीत. आपली मुलं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किंवा आयआयटीमध्ये जाण्याची स्वप्नं त्यांनी उराशी बाळगलेली असतात. आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा आकांक्षा मुलांकडून पूर्ण करून घेण्याच्या उद्देशाने महागडे क्लास लावले जातात.

'गुंतवणूक आणि परतावा' अशी मार्केटची भाषा पालक मुलांसाठी वापरताना दिसतात. पैसे खर्च केले तर मार्क्स मिळायला हवे असा आग्रह असतो. अनेक मुलांना गुंतागुंतीचे किचकट प्रश्न सोडवता येत नाहीत. संकल्पना स्पष्ट नसतात. शिकवलेलं समजलेलं नसलं तरी परीक्षा कठोर वातावरणात होतात. अशा वेळी मुलांच्या नाकी नऊ येतात.

तीव्र स्पर्धा असल्याने आई-बाबांनी पैसे खर्च केलेले असतात. तरी देखील अपेक्षित मार्क्स मिळत नाहीयेत. आई-वडिलांना मार्क्स पाहिजेत. मुलांमध्ये असणारा कोंडमारा त्यांना असह्य होतो आहे. अभ्यासात मन लागत नाही. तीव्र चिंता सतावत असते. मनात भीती घर करून बसलेली असते. आतल्या आत प्रचंड खळबळ सुरू असते. रेसच्या घोड्यावर लावतात तसे पालकांनी मुलांवर पैसे लावलेले असतात! त्यांना केवळ यश हवं असतं!

मूल म्हणजे मार्क्स मशीन नाहीयेत याचं भान हरपून गेले आहे. परिणामी मुलं त्रासात व ताणात आहेत. त्यांची विचित्र कोंडी झाली आहे. सांगता येत नाही आणि सहनही होत नाही, अशी मनोवस्था मुलं अनुभवत आहेत.

वरवर पाहता सगळं काही ठीक चाललं आहे असं वाटत असतं तरी पालकांना मुलांच्या अंतरंगातला कल्लोळ आणि त्रास यांचा अंदाज येत नाही.

प्रेशर कुकरला शिटी असते. मुलांच्या डोक्याला तशी सोय नाही. न झेपणाऱ्या विचारांची कोंडलेली वाफ धडका देत असते याची पुसटशी जाणीव पालकांना असते का? सांगलीत मुख्याध्यापक असलेल्या बापाला लेकीपेक्षा तिच्या शिक्षणावर खर्च केलेले पैसे महत्त्वाचे वाटत होते!

गुंतवणूक करूनही अपेक्षित रिटर्न्स मिळाले नाहीत म्हणजे आपलं नुकसान झाल्यासारखं पालकांना वाटत असेल तर हा आजार किती गंभीर स्वरूपाचा आहे याचा आपल्याला अंदाज येतो. हा बाप माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होता. अशा मानसिकतेचा मुख्याध्यापक म्हणजे तिथल्या मुलांचीदेखील चिंता वाटते. आपण इतका खर्च करतो तर मुलांनी टॉपर म्हणून मार्क मिळवत राहावे, असे पालकांना वाटते.

इतकं सोपं असतं का खरेच हे सगळं? आपल्या मुलांची क्षमता किती आहे? याचा विचार मागे पडलेला आहे. गोष्टी लादल्या गेल्याने त्यातला आनंद संपलेला असतो. मुलं दुबळी आणि पालक सबळ असतात. निमूटपणे सहन करण्याशिवाय मुलांपुढे अन्य पर्याय नसतो. गुमान गप्प बसून बिचारी मुलं सगळं काही सहन करतात.

आतली खळबळ न सांगता. अनेकदा या मानसिक ताणतणावातून मुलं नैराश्याच्या फेऱ्यात सापडतात. नीट आणि जेईई या परीक्षांच्या तयारीसाठी राजस्थानमधल्या कोटा येथे गेलेल्या मुलांपैकी अनेक मुलं कमी मार्क्स घेऊन येतात. तेव्हा त्यांना आपण जणू काय आपल्या पालकांचे गुन्हेगार आहोत, असा अपराधगंड छळत असतो.

कोटा शहरात मुलांच्या होणाऱ्या आत्महत्या गंभीर चिंतेचा विषय असूनही अनेक मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय पालक मुलांना या चरकात आपणहून ढकलताहेत. या चरकात अडकलेल्या अनेक मुलांमधला जीवनरस संपून त्यांचं पार चिपाड होऊन जातं. दिवसेंदिवस ही समस्या आणखीन उग्ररूप धारण करते आहे.

मुलांच्या यशात स्वतःचे यश शोधणारे पालक आपल्या पोटच्या पोरांशी क्रूर वागू लागलेत. आयआयटीमधून शिक्षण लाखांचे पॅकेज किंवा डॉक्टर होऊन दवाखाना थाटणार आणि मग सोंगाढोंगात लग्न कार्य, कथित सामाजिक प्रतिष्ठेपायी आईवडील कसे बहकत चाललेत, याचं प्रत्यंतर सांगलीसारख्या मन विदीर्ण करणाऱ्या विदारक घटनांनी येतं.

खलिल जिब्रान म्हणतो तुमची मुलं तुमच्या पोटी जन्माला आलेली असली तरी ती काळ प्रवाहाची अपत्ये आहेत. तुमचे विचार तुमच्या अपेक्षा मुलांवर लादू नयेत. अन् अंतिम सत्य तेच आहे.

## पालकांचं ताळतंत्र सुटत चाललं आहे

आपल्या समाजात पालकत्वाचे कोणतेही शिक्षण नाही. पहिल्या वर्गात प्रवेश घेताना शाळा आणि माध्यम निवडण्यापासून करिअरच्या निर्णायक टप्प्यावर पोहोचेपर्यंत निर्णय पालक घेतात. पालकांच्या मनातला गोंधळ, संभ्रम नजरेस पडत राहतो. मुलांच्या भविष्याची प्रामाणिक काळजी पालकांना वाटते हे वास्तव नजरेआड करता येत नाही. आपल्या मुलांचं काय होईल? अशी असुरक्षितता पालकांच्या मनात असते. काहीशी ती स्वाभाविकही आहे. अलीकडे मात्र पालकांचं ताळतंत्र सुटत चाललं आहे. या गोंधळाचे वाईट परिणाम मुलांवर होताहेत. याबाबत समाजात जाणीवजागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शासकीय पातळीवर काही होईल अशा अपेक्षा करणे गैर आहे. वाढत चाललेला स्क्रीन टाईम, अकॅडमीक ओव्हरलोड, आकर्षणातून निर्माण होणाऱ्या लैंगिक समस्या, हिंसा आणि व्यसनांचे आकर्षण अशा अनेक गोष्टी आहेत. मुलं ताणात आणि त्रासात आहेत. प्रत्येक माध्यमिक शाळेत आणि महाविद्यालयात समुपदेशकाची नेमणूक करण्याची मागणी करूनही सरकार दुर्लक्ष करत आले आहे. कारण अकरावी बारावीचे वर्ग ओस पडलेले आहेत आणि क्लासेस ओसंडून वाहत आहेत. प्रवेश परीक्षांना सामोरे जाताना मुलांच्या मनावर मेंदूवर किती ताण येतो, त्यांची मनःस्थिती कशी असते? एकूण शिक्षण, करियर आणि एकूण मानसिक आरोग्याबाबत एखादा अभ्यास केल्यास यातलं भीषण वास्तव समोर येईल.

## पप्पा, तुम्ही कुठे कलेक्टर झालात?

पप्पा, तुम्ही कुठे कलेक्टर झालात तुम्हालाही कमीच मार्क पडले होते ना? असं उलट उत्तर साधनाने दिल्याने संतापलेल्या बापाने साधनाला अमानुष मारहाण केली. या घटनेत तिचा मृत्यू झाला आहे. तिला लाकडी दांड्याने मारहाण सुरू असतांना पप्पा, मी खूप अभ्यास केला. पण एवढेच गुण आले, असे सांगतांना साधनाचे डोळे पाणावले होते, आवाज थरथरत होता. वडील धोंडीराम भोसले मात्र तळतळत होते. ते शिक्षक होते तसेच मुख्याध्यापकही होते. पण त्या रात्री ते फक्त 'अपयश पेलू न शकणारे वडील' होते. त्या रात्री घरात फक्त गुणांची चर्चा नव्हती, तर स्वप्नांची परीक्षा होती. अपेक्षांचा भार आणि एका मुलीच्या जीवाची किंमत सारखीच होती.? साधना बारावीची विद्यार्थिनी होती. डोळ्यांत डॉक्टर होण्याचं स्वप्न, मनात अभ्यासाचं वेड. वडील स्वतः शिक्षक असल्याने घरात शिक्षणाचं वातावरण. पण तेच वातावरण कधी दडपणात बदललं, हे साधनालाही कळलं नाही. नीटच्या सराव परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले आणि तिचं जगच बदलून गेलं. रकाय होणार तुझं? डॉक्टर म्हणतेस स्वतःला? एवढेच गुण मिळाले? पोटात लाथ बसली. डोक्यावर आघात झाला. आईने आड येण्याचा प्रयत्न केला, पण राग आंधळा असतो, तो कुणाचं ऐकत नाही. गुण म्हणजेच माझं मोल आहे का? रात्री ती झोपी गेली वेदनांनी कासावीस होऊन. सकाळ झाली, पण ती उठलीच नाही. पण साधनाच्या मृत्यूने समाजापुढे अनेक प्रश्न निर्माण केले हे मात्र खरं!

# ज्ञान मार्गाचे प्रभावी माध्यम भाषा

सरकारने इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करणारा अद्यादेश काढला आहे. त्या विरुद्ध अनेक विरोधी प्रतिक्रिया विविध समाज माध्यमातून समोर आल्या आहेत. अभिवक्ता असीम सरोदे यांनी हिंदी भाषा सक्तीच्या सरकारी नियमांविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रतिक्रिया पाहिल्यानंतर विरोधासाठी विरोध होत असल्याचे लक्षात येते.

१. काहींच्या मते इतक्या लहान वयापासून तिसऱ्या भाषेची सक्ती करणे चुकीचे आहे. मला त्या लोकांना प्रश्न विचारायचा आहे की त्यांचा विरोध तिसरी भाषेची सक्ती आहे की हिंदी भाषेची सक्ती आहे. जर तिसऱ्या भाषेची सक्ती असेल तर सरकारने नवीन अध्यादेश काढून महाराष्ट्रातील सर्व शाळा मग ती कॉन्व्हेंट असो, इंग्रजी माध्यमाची असो, मराठी माध्यमाची असो, हिंदी असो वा अन्य माध्यमांची शाळा असो, सर्वांनी प्रथम भाषा म्हणून मराठी व द्वितीय भाषा म्हणून हिंदी शिकवावी व त्या नंतर त्यांना हवी असलेली भाषा शिकवावी.

सरकारने असा अध्यादेश काढला तर सर्वजण त्याला समर्थन देतील का? हिंदीची सक्ती हा विषय असेल किंवा मुद्दा असेल तर इंग्रजीपेक्षा हिंदी भाषा समजायला, लिहायला व वाचायला सोपी आहे. मग त्याचा उपयोग शालेय शिक्षणाच्या प्रथम वर्गापासून केला तर काय हरकत आहे. देश स्वतंत्र होऊन सात दशकापेक्षा जास्त काळ लोटला आहेण असे असूनही आपण भाषिक गुलामगिरीतून कधी मुक्त होणार?

याचा अर्थ असा नाही की माझा इंग्रजी विषयाला विरोध आहे. भाषा ही ज्ञान प्राप्त करण्याचे एक महत्त्वाचे माध्यम असल्याने अनेक भाषा शिकणे काही गैर नाही.

२. काही जणांनी त्याचा संबंध बिहार निवडणुकीशी लावला आहे. बिहार राज्यातील हिंदी भाषिकांना खुश करण्यासाठी हा निर्णय घेतला गेला आहे. दर पाच वर्षांनी कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणूक होते. मग एका राज्याचा निर्णयाचा परिणाम दुसऱ्या राज्याच्या निवडणुकीवर होऊ शकत नाही. निवडणुकीत मुद्दे हे त्या त्या राज्याचे असतात.

३. काहींच्या मते हिंदी भाषा शिकविण्यासाठी एक लाखापेक्षा जास्त उत्तर भारतीय शिक्षकांची गरज असल्याचे सांगितले. त्यांच्या वेतन व इतर सवलतीवर सुमारे ८७० करोड रुपये खर्च होईल. तो खर्च सरकार आमच्याच कडून वसूल करून घेईल.

मी जेव्हा शाळेत होते तेव्हा मराठी, हिंदी,संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच व जर्मन भाषा तसेच गणित व विज्ञान हे विषय शिकविण्यासाठी मराठी शिक्षक होते व त्यांनी खूप छान पद्धतीने आम्हाला शिकविले. माझे वडील स्वतः उत्तम शिक्षक होते व त्यांनी जवळजवळ 25 ते 30 वर्ष इंग्रजी, गणित, विज्ञान हे विषय शिकविले.

वरील नियम अन्य भाषेच्या संदर्भात लावला तर आपल्याला विदेशी भाषा शिकविण्यासाठी अनेक शिक्षक आयात करावे लागतील व त्यांच्यावर होणारा खर्च हा कितीतरी मोठा असेल व तेवढी माणसांची उपलब्धता असण्याची शक्यता किती आहे.

भाषा ही संवाद, विकास व प्रगतीचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे त्यामुळे बहुभाषिक रहिवाशी संकुलात राहणारे लहान मुले सर्वात जलद सर्व भाषा शिकतात व बोलतात. आपण मोठ्या अभिमानाने माझ्या मुलाला किंवा मुलीला चार भाषा येतात हे सांगतो. आपण त्यांना हिंदी भाषा शिकू नको, बोलू नको असे सांगत नाही आणि सांगितले तरी ती मुले ऐकणार नाही. त्यांना इतर मुलांबरोबर खेळायचे असते. बोलीभाषा ही सदोष असते. जेव्हा आपण एखादी भाषा शाळेत शिकतो तेव्हा ती दोषमुक्त असते. आपण भाषेचे सर्व नियम, व्याकरण समजून घेऊन शिकतो.

नसेल हिंदी भाषा राष्ट्र भाषा किंवा राज्यभाषा पण ती आपली भाषा आहे. आपण विदेशी भाषा शिकतो मग आपली भाषा शिकायला काय हरकत आहे? विदेशी भाषांना अतिरिक्त गुण दिले जात असल्याने, गुणांच्या शर्यतीत ते निर्णयक ठरत असल्याने लोक विदेशी भाषा शिकतात. उद्या जर हे अतिरिक्त गुण काढून टाकले तर कोणी ही विदेशी भाषा शिकणार नाही. विरोधासाठी विरोध करणे हे चुकीचे आहे. आपल्याला जर ज्ञान मिळवायचे असेल तर जास्तीत जास्त भाषा शिकणे आवश्यक आहे.

आपण ज्या प्रदेशात राहतो तिथल्या राज्यभाषेला दुय्यम स्थान देणे हे चुकीचे आहे. सर्वांनी सर्व भाषेचा मानसन्मान ठेवलाच पाहिजे. सरकारच्या ह्या निर्णयाला पाठींबा द्यायचा नसेल तर सारासार विचार करून सुयोग्य व सर्व सामान्य मंजूर होईल असा पर्याय देणे गरजेचे आहे. मला सरस्काराच्या ह्या निर्णयात काही वावगे वाटत नाही. प्रत्येक बाबतीत राजकारण करणे चुकीचे आहे.

■ लीना गाडगीळ, पनवेल.

■ ■ ■

# दोन वेळा फसवणूक झालेली पिढी, आता प्रतिष्ठेवर घाव

शालार्थ घोटाळा



अरूण सोपानराव कराळे
सेवानिवृत्त पदाविधर शिक्षक
एम.ए. (मराठी ), एम.ए. (समाजशास्त्र ), डी.एड. बी.एड., डी.एस.एम
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

सायबर फसवणुकीनंतर आता ज्येष्ठ शिक्षकांवर शिक्षण खात्याच्या डिजिटल अपयशाचा अन्यायकारक ठपका. मागील काही वर्षांत सायबर फसवणुकीच्या अनेक घटनांमध्ये देशभरातील लाखो ज्येष्ठ नागरिकांनी आपली आयुष्यभराची पुंजी गमावली. एनसीआरबी आणि आरबीआय च्या अहवालांनुसार, २०२० ते २०२४ या कालावधीत भारतात सायबर गुन्ह्यांमुळे तब्बल १० हजार कोटींपेक्षा अधिक आर्थिक नुकसान झाले असून, महाराष्ट्र यात सातत्याने आघाडीवर राहिला.

फसवणुकीची पद्धत साधी होती, ओटीपी सांगणे, फेक लिंकवर क्लिक करणे, ॲप डाऊनलोड करणे झ आणि गुन्हेगारांनी डिजिटल अनभिज्ञतेचा फायदा घेतला. परंतु आता फक्त आर्थिक नुकसान न पुरेसं वाटल्यासारखं वाटतंय झ कारण आता त्या पिढीच्या प्रतिष्ठेलाही सुरुंग लावला जातोय.

**शालार्थ आयडी घोटाळ्यात ज्येष्ठ शिक्षकांचं नाव गोत्यात**

नागपूर जिल्ह्यातील शालार्थ पोर्टलवर बनावट आयडी तयार करून बोगस पगार काढल्याचा प्रकार उघड झाला आहे. यासंदर्भात विशेष तपास पथक ( एसआयटी ) स्थापन करण्यात आलं. मात्र तपासाच्या दिशेबाबत अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. डिजिटल यंत्रणेमधील दोष शोधण्याऐवजी, ६०-७० वयाचे मुख्याध्यापक, संस्थाचालक हेच गुन्हेगार ठरतायेत.

शाळेच्या नियामक कागदपत्रांत नाव असल्याच्या केवळ आधारावर ज्येष्ठ शिक्षकांना पोलिस कोठडीची भीती दाखवली जाते आहे. काही महिला शिक्षक, विधवा, वृद्ध शैक्षणिक कार्यकर्ते, ज्यांनी संगणक हातातही घेतलेला नाही यांच्यावर एसआयटी कायद्याखाली कारवाईचा बडगा उगारला जातोय. ज्यांना आयडी कसे तयार होतात? किंवा लॉगिन म्हणजे काय? याचंही ज्ञान नाही, तेच शासकीय यंत्रणेच्या चुकीमुळे आता गुन्हेगार ठरवले जात आहेत.

**तपासाचा रोख चुकीच्या दिशेने?**

शालार्थ ही पूर्णतः डिजिटल प्रणाली आहे झ जिचं नियंत्रण शिक्षण विभागाकडे आहे. आयडी तयार करणं, ते सक्रिय करणं, वेतन प्रणालीत नोंद करणं हे सर्व सरकारी यंत्रणेकडूनच होतं.

मग तपासाचा केंद्रबिंदू तिथे का नाही?

लॉग तपासले गेले का? कोणी प्रवेश केला हे सिद्ध झालं का? प्रणालीमध्ये कोणत्याही स्तरावर पडताळणीचा अभाव का होता? सरकारने योग्य प्रशिक्षण न देता शिक्षण संस्थांना डिजिटल यंत्रणेत ढकललं, आणि गैरप्रकार घडल्यावर जबाबदारी त्यांच्यावरच ढकलली. ही मोठी शासकीय चूक आहे.

**सन्मानाने वागवा...**

ज्यांनी आपलं आयुष्य शिक्षणसेवेसाठी झिजवलं, त्यांचं नाव आता गुन्हेगारांच्या यादीत टाकणं हे न्याय व्यवस्थेचा पराभव आहे. चुकीचं कोण करतंय, ते शोधा. कारवाई करा. पण ज्येष्ठ शिक्षकांच्या मान-सन्मानावर गदा आणणं थांबवा. त्यांचा पैसा हरवला... आता प्रतिष्ठा तरी वाचवा!

■ ■ ■

वाचक लिहितात

## वारीची परंपरा आणि पुरोगामी प्रवृत्तींचा डाव

आषाढी एकादशी म्हटली की, अवघ्या महाराष्ट्राला पंढरपूरची आणि पांडुरंगाची आठवण येते. पृथ्वीतलावरील एक अत्यंत प्राचीन तीर्थक्षेत्र म्हणजे पंढरपूर. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी असे याचे वर्णन केले जाते. कलियुगात विष्णूचे सगुण रूप म्हणजे साक्षात पंढरपूरची विठ्ठल मूर्ती या विठ्ठलाच्या दर्शनाला भाविक श्रद्धेने पायी वारी करतात कारण पायी वारी केल्याने शारीरिक तप घडते, हे मानले जाते.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजात भागवत धर्माची स्थापना केली. समाजात भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी नामदींडी, म्हणजेच पंढरपूरच्या वारीची परंपरा सुरू झाली जी आजतागायत अखंडपणे सुरू आहे.

परंतु, या पवित्र वारीमध्ये आज काही दुष्ट प्रवृत्ती, तथाकथित पुरोगामी आणि साम्यवादी मंडळी सामील होत आहेत. संविधान समता दिंडी या नावाखाली हे लोक म्हणे वारकऱ्यांमध्ये राज्यघटनेविषयी जागृती करत आहेत. प्रत्यक्षात हे वारकऱ्यांना भ्रमित करण्याचा प्रयत्न आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी रेड्यामुखी वेद बोलवले, भिंत चालवली; संत तुकाराम महाराजांचे अभंग इंद्रायणीच्या पाण्यावर तरंगले; तसेच त्यांचे सदेह वैकुंठगमन या दिव्य घटना 'काल्पनिक रम्य कथा' आहेत असे सांगण्यात या मंडळींनी आयुष्य घालवले.

आता मात्र हेच लोक संतांच्या पालख्यांमध्ये सहभागी होत आहेत. संत ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्याबाबत पूर्वी निंदानालस्ती करणाऱ्यांना संतांचे श्रेष्ठत्व उमगून ते भक्त बनलेत, असे समजणे भाबडेपणाचे ठरेल. या तथाकथित पुरोगामी-साम्यवादी मंडळींनी भक्तीमार्ग स्वीकारलेला नाही; ते वारीचा वापर स्वतःच्या राष्ट्रघातकी अजेंडासाठी करत आहेत. म्हणूनच, अशा मंडळींपासून खऱ्या वारकऱ्यांनी सावध राहायला हवे!

■ सौ. रमा देशमुख
नागपूर.



## मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी रामबाण ठरतील हे ६ सुपरफूड

डायबिटीस म्हणजेच मधुमेह हा आजार सध्या जगभर झपाट्याने वाढतो आहे. एकदा हा आजार झाला की, तो पूर्णपणे बरा होणं शक्य नसतं, मात्र योग्य आहार आणि जीवनशैलीच्या मदतीने त्यावर नियंत्रण ठेवता येऊ शकतं. विशेषतः उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होतं आणि ब्लड शुगर लेव्हल झपाट्याने वाढण्याची शक्यता असते. अशा वेळी डाएटमध्ये योग्य अन्नपदार्थांचा समावेश केल्यास मधुमेह नियंत्रणात राहतो आणि शरीरही ताजंतवानं राहतं.

**साखर नियंत्रणासाठी कोणते फूड्स फायदेशीर?**

**१. ओट्स :** ओट्स हा एक लो-ग्लायसेमिक इंडेक्स फूड आहे, म्हणजेच यामुळे रक्तातील साखर झपाट्याने वाढत नाही. ओट्समध्ये असणारा फायबर शरीरात साखरेचे शोषण हळूहळू करतो. यामुळे शुगर नियंत्रणात राहते. शिवाय, ओट्समुळे वजन कमी होण्यास मदत होते आणि हृदयाच्या आरोग्यासाठीही ते फायदेशीर ठरतं.

**२. कारले :** कारले हा मधुमेहींसाठी सुपरफूड मानला जातो. यामध्ये ॲक्टिव्ह कंपाऊंड्स असतात जे शरीरात इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवतात. हे ब्लड शुगर कमी करण्यास मदत करतं. कारले पचनक्रिया सुधारण्यातही उपयुक्त आहे.

**३. दुधी :** उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी आणि हायड्रेटेड राहण्यासाठी लौकी एक चांगला पर्याय आहे. यामध्ये भरपूर पाणी असतं आणि फारच कमी कॅलोरी. मधुमेहींसाठी दुधी खाणं फायदेशीर ठरते. ते वजन घटवण्यास उपयुक्त ठरते आणि पचनतंत्रही सुधारते.

**४. बेरी :** स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, रास्पबेरी यासारख्या बेरीज अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरने भरलेल्या असतात. यामुळे शरीरात इन्सुलिन रेजिस्टन्स कमी होतं आणि रक्तातील साखर नियंत्रणात राहते. बेरीज इम्युनिटी सुधारतात आणि हृदयासाठीही फायदेशीर असतात.

**५. काकडी :** काकडी हा उन्हाळ्यातील सर्वात उपयुक्त आणि सहज उपलब्ध होणारा पदार्थ आहे. यामध्ये सुमारे ९५% पाण्याचं प्रमाण असतं, जे शरीराला डिहायड्रेट होण्यापासून वाचवतो. डायबिटीसवरही नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

**६. भरपूर फायबरयुक्त आहार :** डायबिटीस असणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या रोजच्या आहारात फायबरयुक्त गोष्टींचा समावेश आवर्जून करावा. फायबर पचनक्रिया सुधारते आणि रक्तातील साखरेची पातळी हळूहळू वाढवते. फळं, भाज्या, संपूर्ण धान्य यामध्ये फायबर अधिक प्रमाणात असतो. ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## आनंदी आनंद गडे ..

बळीच्या चेहऱ्यावरील
हास्य घेतलं नाही हिरावून
निसर्ग एवढा निर्दयी नाही
पाऊसाला देलं पाठवून ..

निसर्गा, तुच आमचा दाता
आम्ही तुझी स्वार्थी लेकरे
पर्यावरणाची करतो हानी
तरी तू बरसला ना गडे ..!

दे आम्हाला सुबुद्धी
कृतज्ञतेने वागण्याची
आमचे गुन्हे अक्षम्य
कृती आहे मुर्खपणाची ..!

# गुडघा, कंबर, खांदा आणि कोपर यांची जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी हे जीवन बदलणारे आणि दीर्घकाळ टिकणारे उपाय आहेत!



**यवतमाळ, २६ जून :** पूर्वीच्या पिढीतील अनेक वृद्ध लोक सांध्यांच्या वेदनांसाठी डॉक्टरांकडे जाणे टाळायचे, पण आजचे सक्रिय प्रौढ व्यक्तीं संपूर्ण जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेमुळे मोठा दिलासा मिळवत आहेत. वय वाढल्यामुळे सांध्यांवर झीज होणे ही नैसर्गिक गोष्ट आहे आणि त्यासोबत येणाऱ्या वेदना सुद्धा अपरिहार्य असतात. भारतात वृद्ध व्यक्तींमध्ये सर्वाधिक आढळणारा संधिवाताचा प्रकार म्हणजे ऑस्टियोआर्थरायटिस. आपल्या सांध्यांमधील हाडांच्या टोकांवर झीजप्रतिरोधक उपयुक्त अशा कूर्चा (कार्टिलेज) थर असतो, जो झटका व कंपन शोषून घेतो आणि हाडांना सुरळीत हालचालीस मदत करतो. संधिवातामुळे ही कार्टिलेज हळूहळू झिजते आणि त्यामुळे हाडं एकमेकांवर घासू लागतात, ज्यामुळे तीव्र वेदना होतात. ऑस्टियोआर्थरायटिस सर्व सांध्यांना होऊ शकतो, परंतु कंबर आणि गुडघ्यासारखे वजन सहन करणारे सांधे सर्वाधिक वेदनादायक ठरतात. जे लोक दीर्घकाळ वेदनांमुळे दैनंदिन जीवन जगू शकत नाहीत, विश्रांती दरम्यान किंवा रात्री वेदना होतात, आणि हालचालींमध्ये मर्यादा येतात, अशा रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असते.

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेचा मुख्य उद्देश म्हणजे झिजलेल्या किंवा दुखापत झालेल्या सांध्यांच्या पृष्ठभागाला मेटल, प्लास्टिक, पॉलीइथिलीन, सिरॅमिक्स किंवा अशा अनेक सामग्रींच्या साहाय्याने बदलणे. आजच्या काळात कृत्रिम सांध्यांचे अधिक प्रकार उपलब्ध झाले आहेत, आणि हाडांच्या आजारांमध्ये तज्ज्ञ असलेले ऑर्थोपेडिक सर्जन्स रुग्णाच्या गरजेनुसार कोणता पर्याय सर्वोत्तम आहे हे ठरवण्यास मदत करतात.

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेनंतर मिळणारे परिणाम पूर्वीपेक्षा अधिक अधिक स्थिर आणि यशस्वी होत आहेत, याचे श्रेय आधुनिक तंत्रज्ञान, नव्या शस्त्रक्रिया पद्धती आणि प्रगत साहित्याला जाते. काही निवडक रुग्णांमध्ये सबव्हॅस्टस पद्धतीने मिनिमली इनवेसिव्ह गुडघ्याच्या शस्त्रक्रिया करता येते, ज्यामुळे वेदना कमी होतात, रुग्णालयात राहण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्ण लवकर बरा होतो. या शस्त्रक्रियेसाठी वयोमर्यादेचे बंधन नाही बहुतांश रुग्ण ५० ते ८० वयोगटातील असतात. योग्य पूर्वतयारी केल्यास जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया अधिक सुलभ ठरते जसे की वजन कमी करणे, शस्त्रक्रियेपूर्व व्यायामाचे नियोजन आणि ऑपरेशननंतर स्वतंत्रपणे चालण्यासाठी घरातील वातावरण सुरक्षित आणि आरामदायक बनवणे.

एका रुग्णाने जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेनंतर स्वतंत्रपणे चालायला सुरुवात केली आणि सांगितले की त्यांनी ही शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी विनाकारण खूप वेळ वाट पाहिली. खांदा आणि कंबरेचे प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांमध्ये शस्त्रक्रियेनंतर मोठ्या प्रमाणात सुधारणा दिसून येते. रुग्णांची जागरूकता, आरोग्यशिक्षण, वैद्यकीय सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, प्रत्यारोपणासाठी लागणाऱ्या उपकरणांची उपलब्धता, वेदनानियंत्रण आणि अॅनेस्थेशिया देण्याच्या आधुनिक पद्धती यामध्ये झालेली प्रगती यामुळेच संधिवाताने त्रस्त रुग्णांसाठी जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया हे एक वरदान ठरले आहे.

# फोनपे आणि एचडीएफसी बँकेने भागीदारी करत सादर केले को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड



**नागपूर, २६ जून :** फोनपे आणि एचडीएफसी बँकेने आज 'फोनपे एचडीएफसी बँक को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड'च्या लॉंचची घोषणा केली. या निमित्ताने फोनपेने को-ब्रँडेड कार्ड क्षेत्रात प्रवेश केला आहे. भारतीय ग्राहकांच्या बदलत्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन एचडीएफसी बँकच्या भागीदारीने सादर करण्यात आलेली रुपे को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड्सची ही नवी श्रेणी तयार करण्यात आली आहे. विशेषत: फोनपे प्लॅटफॉर्मवरून करण्यात आलेल्या युपीआय पेमेंट्सवर लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या लॉंचविषयी फोनपेच्या कन्झ्युमर पेमेंट्स विभागाच्या चीफ बिझनेस ऑफिसर श्रीमती सोनिका चंद्रा म्हणाल्या, एचडीएफसी बँकेच्या भागीदारीने आमचे पहिले को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सादर करत असल्याचा आम्हाला आनंद आहे. ही भागीदारी म्हणजे आमच्या व्यापक युजर बेससाठी नावीन्यपूर्ण आर्थिक सेवा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. हे कार्ड बिल पेमेंट्स, रिचार्जेस आणि ट्रॅव्हल बुकिंग्ज यांसारख्या निवडक खर्चांवर १०% रिवॉर्ड पॉइंट्स देत असल्यामुळे फोनपेच्या ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारांवरही फायदे मिळतील. या शिवाय युपीआयच्या माध्यमातून पेमेंट स्वीकारणाऱ्या लाखो व्यापाऱ्यांकडे हे कार्ड सहज वापरता येते. एचडीएफसी बँकेशी झालेली ही धोरणात्मक भागीदारी आणि या कार्डमधील फायद्यांच्या जोरावर कोट्यवधी भारतीयांसाठी क्रेडिट कार्ड वापरण्याच्या अनुभवात अमूलाग्र बदल होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

एचडीएफसी बँकेच्या पेमेंट्स, लायेबिलिटी प्रॉडक्ट्स, कन्झ्युमर फायनान्स आणि मार्केटिंग, पराग राव म्हणाले, भारतातील कार्ड जारी करणारा आघाडीची कंपनी म्हणून, ग्राहकांसाठी प्रभावी आणि त्यांच्यासाठी उपयुक्त असलेल्या सेवा सादर करण्याचा आणि क्रेडिट सुविधा अर्थपूर्ण पद्धतीने अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो. फोनपेसोबतच्या भागीदारीमुळे आम्हाला डिजिटल व्यवहारांशी सख्य असलेल्या ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी प्राप्त झाली आहे. युपीआयसारख्या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड्स अधिक फायदेशीर ठरतील आणि सहज वापरता येतील. कारण युपीआय हे आज भारताच्या डिजिटल पेमेंट्स इकोसिस्टीममध्ये केंद्रस्थानी आले आहे. या को-ब्रँडेड कार्डच्या माध्यमातून ग्राहकांना एचडीएफसी बँकेच्या विश्वासार्ह क्रेडिट कार्ड प्लॅटफॉर्मचा आणि फोनपेच्या ग्राहककेंद्री डिजिटल अनुभवाचा दुहेरी लाभ मिळतो.

योग्य पात्रता असलेले फोनपे वापरकर्ते फोनपे मोबाईल अॅपवरून या को-ब्रँडेड क्रेडिट कार्डसाठी अर्ज करू शकतात. अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आहे. एचडीएफसी बँकेकडून जारी एकदा कार्ड झाले की, युजर ते फोनपेवरून लिंक करू शकतात आणि युपीआय द्वारे व्यापाऱ्यांना पेमेंट करू शकतात. तसेच, वापरकर्ते फोनपे अॅपवरूनच हे कार्ड मॅनेज करू शकतात आणि आपल्या क्रेडिट कार्डचे मासिक बिलही भरू शकतात.

हे कार्ड पात्र फोनपे युजरसाठी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येईल.

## उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत आपल्या भावंडांचा ताबा मिळवण्यासाठी, आपण सक्षम पालक असल्याचे सिद्ध करण्याचा कैरीचा प्रयत्न

**मुंबई, २६ जून :** सोनी सबवर अलीकडेच सुरू झालेली उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका त्यातील लोभस व्यक्तिरेखा आणि नव्या प्रकारच्या कथानकामुळे लगेच लोकांची आवडती झाली आहे. मालिकेची नायिका कैरी शर्मा (आशी सिंह) एक होतकरू वकील आहे आणि खूप परिश्रमानंतर स्वतःसाठी आणि आपल्या भावंडांसाठी एक स्थिर भविष्य निर्माण करण्याची धडपड करत आहे. पण तिला सतत आयुष्यात धक्के मिळत असतात. कैरीच्या प्रवासात युग (शब्बीर अहलूवालिया)ची मोठी भूमिका आहे. युग एक हुशार आणि गंभीर प्रकृतीचा वकील आहे. त्याचा एक भूतकाळ आहे, ज्यातून त्याचे व्यक्तिमत्व घडले आहे. त्यामुळे या दोघांचा संबंध तितकाच गुंतागुंतीचा आणि तरीही आकर्षक आहे.

आगामी भागांमध्ये, कैरीला मनाविरुद्ध युगच्या हाताखाली इंटर्न म्हणून काम करावे लागणार आहे. त्यांच्यात इतका तणाव असल्यामुळे त्याच्या हाताखाली काम करण्याबाबत कैरी साशंक आहे. या नाजुक परिस्थितीतून मार्ग काढत असतानाच तिला ज्याची भीती वाटत असते, ते घडते. त्यांना सोडून गेलेले तिचे वडील कुंदन (मधुवेंद्र झा) परत येतात आणि तिच्या लहान भावंडांचा ताबा मिळवण्यासाठी दावा करतात. आपल्या भावंडांचे भवितव्य असे अधांतरी असताना, आपण त्यांचा सांभाळ करण्यासाठी सक्षम आणि विश्वास ठेवण्याजोगे पालक आहोत हे कैरीला सिद्ध करावे लागेल. याच वादळात युगचा जुना शत्रू विकी मल्होत्रा (रजत दहिया) देखील अचानक परततो. विकी कैरीला नोकरी आणि नवी सुरुवात करण्याची संधी देऊ करतो. तिने ही नोकरी स्वीकारली तर तिची स्वतःची केस कोर्टात सबळ होणार आहे. युगचा अनियमित पण मनापासून मिळणारा आधार आणि विकीकडून आलेला सुरक्षित नोकरीचा प्रस्ताव यापैकी काय स्वीकारावे या संभ्रमात कैरी आहे. तिने सुरक्षित मार्ग स्वीकारावा की आपल्या मनाचे ऐकावे?

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, आपल्या वडिलांशी आपल्या भावंडांच्या ताब्यासाठीचा लढा, भावंडांबाबतची तिची जबाबदारी आणि तिच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात युगने उभी केलेली आव्हाने अशा चौफेर समस्येत कैरी अडकली आहे. मला या कथानकात कैरी जी शांतपणाची ताकद दाखवते, प्रश्न सोडवण्याची वृत्ती दाखवते ते मला फार आवडले आहे. याचे कारण म्हणजे योग्य विचार करण्याची ताकद तिच्यात आहे. बाकी सगळे अनिश्चित असले तरी जे आपल्याकडे आहे ते मनोभावे सांभाळले पाहिजे हे या कथेतून सांगितले आहे. प्रेक्षकांना भावनिक कलाटण्या आणि अनपेक्षित निर्णय बघायला मिळतील.

# डीएस ग्रूपचा पल्स कँडी बनला ७५० कोटी रुपयांचा कन्झ्युमर ब्रँड



**नवी दिल्ली, २६ जून :** धरमपाल सत्यपाल ग्रूप (डीएस ग्रूप) या आघाडीच्या एफएमसीजी बहूउद्योग समुहाने पल्स या त्यांच्या लोकप्रिय ब्रँडच्या यशोगाथेतील महत्त्वाच्या टप्प्याची घोषणा केली आहे. पल्स कँडीने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ७५० कोटींहून अधिक ग्राहक किमतीचा टप्पा नोंदवला आहे. म्हणजे या एका वर्षात ७५० कोटी पल्स कँडीज विकल्या गेल्या. यामुळे ही भारतातील सर्वाधिक वितरित झालेली हार्ड बॉइल कँडी ठरली आहे. हार्ड बॉइल कँडी विभागात मागील ९ वर्षांपासून असलेले पल्सचे अबाधित स्थान आणि ग्राहकांमधील शाश्वत लोकप्रियता या यशामुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. भारतातील पारंपरिक कन्फेक्शनरी ब्रँड म्हणून पल्सला विविध पद्धतीने आणि विविध पातळ्यांवर उत्क्रांत करणे हा डीएस ग्रूपचा उद्देश आहे. संबंधित उत्पादन विभागांमधील प्रवेश, नाविन्यपपूर्ण नव्या पद्धतीने हाताळणी आणि प्रादेशिक चवींच्या समृद्ध वारशाचा लाभ घेणे अशा धोरणात्मक पद्धतीने आम्ही ही वाटचाल करत आहोत. ब्रँडची ओळख निर्माण करणे, ग्राहकांचा सहभाग वृद्धिंगत करणे आणि बाजारपेठेत अधिक सखोल अस्तित्व निर्माण करणे यावर सतत भर दिल्याने आम्हाला नेतृत्व स्थान टिकवून ठेवण्यात साह्य लाभले. आम्ही व्यवसायवृद्धीसाठी देशातील आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही बाजारपेठांमध्ये प्रचंड सक्रिय आहोत. देशात आमच्या दमदार वितरण जाळ्याचा वापर आम्ही करत आहोत. आजघडीला भारतभरात आम्ही ३५ लाखांहून अधिक आऊटलेट्सपर्यंत पोहोचलो आहोत, असे डीएस ग्रूपचे उपाध्यक्ष राजीव कुमार म्हणाले.

फळांची चव आणि गमतीशीर झटका देणारी आंबटगोड चव असा मेळ असणाऱ्या पल्समुळे ग्राहकांना अतुलनीय चवींचा आनंद मिळतो, विशेषत: कैरीची आंबटगोड चव असणाऱ्या पल्समुळे. काही काळापूर्वी कँडींचे स्वरूप काहीसे पाश्चिमात्य पद्धतीचे होते. त्यामुळेच, भारतातील आंबटगोड चवींच्या प्राधान्यक्रमाला ही अनोखी चव साजेशी ठरली. आता वस्तूंच्या मुल्यासंबंधी अधिक सजग झालेल्या भारतीय ग्राहकाच्या आवडीनिवडीचे प्रतिक म्हणून पल्स कँडीने ओळख निर्माण केली. आता या बदलेल्या परिस्थितीला समजून घेत डीएस ग्रूपने आपले किमतींचे धोरणही विचारपूर्वक राबवले. जेव्हा ८६ टक्के हार्ड बॉइल कँडी ५० पैशांना मिळत होती तेव्हा पल्सने अत्यंत धाडसाने रुपया किमतीवर पदार्पण केले. ही फक्त अधिक किंमत नव्हती हे अधिक मूल्य होते, जे आपल्या चवींच्या संवेदना आणि आपली क्रयशक्ती या दोन्ही बाबींना साजेशी ठरली, असे कुमार पुढे म्हणाले.

## माझे पात्र क्वचितच बोलते पण नेहमीच बाजी मारून जाते : निखिल आर्या

**मुंबई, २६ जून :** सोनी सबवरील तेनाली रामा ही एक ऐतिहासिक मालिका आहे. या मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) रामाच्या चातुर्याच्या आणि सुजाणतेच्या रोचक कथांची मांडणी केली आहे. ही मालिका सर्व वयोगटातील लोकांच्या पसंतीस उतरली आहे. या मालिकेतील एक अत्यंत मनोरंजक पात्र आहे, विजयनगर साम्राज्यातील कोतवालाचे. हा शांत स्वभावाचा कोतवाल निखिल आर्य या अभिनेत्याने खूप ताकदीने आणि गांभीर्याने साकारला आहे. अत्यंत तीव्र, उत्कट प्रसंगांमध्ये देखील त्याचा शांत, अबोल परफॉर्मन्स उठून दिसतो. या मनमोकळ्या संभाषणात निखिल आर्यने या मालिकेविषयी, आपल्या प्रभावी व्यक्तिरेखेविषयी आणि आपल्या सह-कलाकारांशी असलेल्या नात्याविषयी सांगितले आहे.

१. तेनाली रामा मालिकेत इतिहास आणि जीवनोपयोगी धडे यांची सांगड घालून ते मिश्रण मनोरंजक पद्धतीने सादर केले आहे. एक अभिनेता म्हणून या मालिकेतील कोणत्या गोष्टीने तुला आकर्षित केले?

मला या मालिकेचे स्वरूप, त्याचा फॉरमॅट फार आवडला. देव, भव्य दिव्य युद्ध यांनी भरलेल्या सर्वसामान्य ऐतिहासिक मालिकांपेक्षा ही मालिका वेगळी आहे. यामध्ये गंभीर रहस्ये हलक्या-फुलक्या, मजेदार आणि उपरोधाच्या शैलीत सोडवली जातात.

२. तुझी व्यक्तिरेखा खूपच बदलली, मोठी झाली आहे. तुला समाधान देणारे (किंवा आव्हानात्मक वाटलेले) क्षण कोणते? तुझ्या व्यक्तिरेखेच्या प्रवासाशी तुझे स्वतःचे किती साधर्म्य आहे?

मला आनंद वाटतो की, माझी व्यक्तिरेखा खूप बदलत गेली आहे. मी राज्याच्या कोतवालाची भूमिका करत आहे. हा एक अत्यंत गंभीर माणूस आहे, जो क्वचितच हसतो किंवा बोलतो. पण उत्कट आणि गंभीर परिस्थितीत त्याचे निर्विकार चेहऱ्याने वावरणे काम करून जाते. शांत दृश्यांपासून भावनिक गहिरेपण असलेल्या दृश्यांपर्यंतचा प्रवास समाधानकारक आहे.

३. संवादांवर फारसे विसंबून न राहता तुझी व्यक्तिरेखा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेते. अशा प्रकारे शब्दांपेक्षा हालचालींवर आधार ठेवणाऱ्या या परफॉर्मन्सबाबत तुझा काय दृष्टिकोन आहे?

खरं तर तीच या भूमिकेतील सगळ्यात आव्हानात्मक आणि गंमतीशीर गोष्ट आहे. तुम्हाला फार अंगविक्षेप करावे लागत नाहीत, विनोद करण्यासाठी आवाजी व्हावे लागत नाही- सगळा भर टायमिंग, हावभाव आणि निर्विकारपणावर आहे. असे करून लक्ष वेधून घेता येणे तसे कठीण असते, पण ते एकदा क्लिक झाले की, ते खूपच मजेदार होते आणि उठून दिसते. ही या भूमिकेतली मजा आहे.

४. इमानदारी, बुद्धीचातुर्य आणि न्यायप्रियता हे तुझ्या व्यक्तिरेखेचे मुख्य गुण आहेत. व्यक्तिरेखा साधी आणि चारचौघांसारखी ठेवून हे गुण पडद्यावर आणण्यासाठी तू काय तयारी केलीस?

हे गुण व्यक्तिशः माझ्याशी खूप मिळतेजुळते आहेत. फक्त फरक इतकाच आहे की ही व्यक्तिरेखा अगदी वेगळ्या काळातील आहे. त्यामुळे त्यादृष्टीने पात्र जिवंत करण्यासाठी देहबोली आणि भाषा यावर मला जास्त काम करावे लागले.

५. तुझे काम प्रामुख्याने कुणाल, आदित्य आणि कृष्ण यांच्यासोबत असते. पडद्याच्या मागे तुमच्यातील सख्याचा पडद्यावरील परफॉर्मन्सवर किती प्रभाव पडला आहे? पडद्यामागचा एखादा प्रसंग सांगता येईल का, ज्यामधून तुमच्यातील खेळकर संबंध दिसून येतील?

पडद्याच्या मागे आमच्यात जे सख्य आहे ते अर्थातच पडद्यावर प्रतिबिंबित होते. आमच्या चौघांचे खरोखरच खूप छान जमते. त्या मोकळेपणामुळे आमची दृश्ये सहज उतरतात. एक गंमतीशीर आठवण अशी आहे की, एकदा मला एका दृश्यासाठी खूप कौतुक मिळाले पण नंतर समजले की मी विग घालायला विसरूनच गेलो होतो! मेकअप करणारा मला कोतवालच्या केसांचा विग घालायला विसरला होता.

## जेव्हा सानंद वर्मा यांना समजले, 'आय लाइक इट' हे वाक्य घराघरामध्ये लोकप्रिय ठरले आहे!

**मुंबई, २६ जून :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है' भारतीय टेलिव्हिजनवरील दीर्घकाळपासून सुरू असलेली मालिका आहे, तसेच ही मालिका प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय ठरली आहे. मालिकेमधील विनोदी एपिसोड्स प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहेत, तसेच विलक्षण पात्र आणि त्यांच्या संस्मरणीय संवादांनी प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. यापैकी एक भूमिका आहे अनोखे लाल सक्सेना, जी प्रतिभावान अभिनेते सानंद वर्मा साकारत आहेत. त्यांचा ट्रेडमार्क संवाद 'आय लाइक इट'ने सोशल मीडियावर धुमाकूळ निर्माण केला आहे, ज्यावर अनेक मीम्स व व्हिडिओज बनवण्यात आले आहेत. या संवादाच्या लोकप्रियतेबाबत सांगताना सानंद वर्मा ऊर्फ अनोखे लाल सक्सेना म्हणाले, ''प्रेक्षक माझ्या भूमिकेचे, विशेषत: संवादाचे कौतुक करत असल्याचे पाहून मला खूप आनंद होत आहे. मला मिळणारे प्रेम व प्रतिक्रिया उत्साहवर्धक आहेत आणि मी त्यांचा खूप आनंद घेतो. यामधून मालिकेवरील प्रेक्षकांचे प्रेम दिसून येते.''

या संवादाच्या लोकप्रिय प्रभावाबाबत समजलेल्या पहिल्या क्षणाबाबत सांगताना सानंद म्हणाले, ''एकदा मी मुंबईत होतो, तेव्हा माझी भेट एका शेजाऱ्याशी झाली, जो व्यावसायाने पोलिस अधिकारी आहे. गप्पागोष्टी करताना त्याने एक घटना सांगितली, ज्याबाबत तो गोंधळून गेला. त्याने सांगितले की तो त्याच्या मुलाला ओरडत होता आणि मुलगा शांतपणे म्हणाला 'आय लाइक इट'. माझा शेजारी गोंधळून गेला आणि मुलाला तसे का म्हणाला याबाबत विचारले. तेव्हा त्याच्या पत्नीने स्पष्टीकरण केले हा मालिका 'भाबीजी घर पर है'मधील लोकप्रिय संवाद आहे, सक्सेना त्यांची भूमिका साकारताना म्हणतात. त्यानंतर त्याने स्वत: मालिका पाहायला सुरूवात केली. आज, ही त्याची आवडती मालिका आहे आणि मला वाटते की त्याला देखील ही भूमिका आवडते.'' सानंद पुढे म्हणाले, दैनंदिन जीवनात असो किंवा कोणत्याही संमेलनामध्ये असो चाहत्यांसोबत संवाद साधताना मी नेहमी भावूक होतो. बॉलिवुड पार्टी व सामाजिक कार्यक्रमांमध्ये देखील लोक हा संवाद म्हणत माझ्या भूमिकेचे कौतुक करतात.

# बजाज फिन्सर्व्ह एएमसीचा स्मॉल कॅप फंड लॉन्च: गुणवत्ता, वाढ आणि मूल्य या ३ इन १ फायद्यासह

**नागपूर, २६ जून :** बजाज फिन्सर्व्ह एएमसीने बजाज फिन्सर्व्ह स्मॉल कॅप फंडच्या सुरूवातीची घोषणा केली आहे. हा एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून, प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करतो आणि गुणवत्ता, वाढ व मूल्य यांचा लाभ देतो. या फंडासाठी सदस्यता २७ जून २०२५ पासून सुरू होणार असून, ११ जुलै २०२५ रोजी बंद होणार आहे.

BAJAJ FINSERV

सध्या स्मॉल कॅप शेअर्समध्ये नुकत्याच झालेल्या घसरणीमुळे दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी आकर्षक प्रवेश बिंदू उपलब्ध झाला आहे. जरी ८०% हून अधिक स्मॉल कॅप कंपन्यांनी ३८% इतक्या मजबूत नफ्याच्या वाढीबरोबरच चांगले रिटर्न रेशो नोंदवले असले, तरी बहुतांश कंपन्यांचे व्यवहार अजूनही त्यांच्या ५२ आठवड्यांच्या उच्चांकाच्या १५% ते ४५% खाली सुरू आहेत. या अलीकडील बाजार घसरणीमुळे या कंपन्यांच्या वास्तविक मूल्यात आणि सध्याच्या बाजार किमतीत एक स्पष्ट फरक निर्माण झाला आहे.

मेक इन इंडिया उपक्रमाचा जोर, वाढती औपचारिकता आणि विविध क्षेत्रातील डिजिटल रूपांतरण यासारख्या संरचनात्मक सकारात्मक प्रवाहांमुळे स्मॉल कॅप कंपन्या आगामी विकास चक्रात अतिरिक्त प्रमाणात लाभ घेण्याच्या उत्कृष्ट स्थितीत आहेत, ज्यामुळे ही गुंतवणुकीसाठी एक आकर्षक संधी ठरते.

या लॉंचविषयी बोलताना, बजाज फिन्सर्व्ह एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक गणेश मोहन म्हणाले, स्मॉल कॅप फंड चा लॉंच हा भारतातील गतिशील स्मॉल कॅप शेअरविश्वाच्या दीर्घकालीन संभाव्यतेवरील आमच्या ठाम विश्वासाचे प्रतीक आहे. स्मॉल कॅप शेअर्समध्ये सामान्यत: व्यापक निर्देशांकांच्या तुलनेत अधिक अस्थिरता दिसून येते, त्यामुळे बाजारातील चढ-उतारांमधून मार्ग काढण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण संधी ओळखण्यासाठी सक्रिय व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित होते. ही रणनीती अशा उच्च-गुणवत्तेच्या कंपन्यांना ओळखण्यावर आधारित आहे, ज्या त्यांच्या वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यात आहेत आणि काळानुसार अधिक चांगले प्रदर्शन करु शकतात. अलीकडील स्मॉल कॅप घसरण लक्षात घेता, हा नवीन फंड ऑफर (एनएफओ) या सुवर्णसंधीचा फायदा घेण्याच्या योग्य स्थितीत आहे आणि गुंतवणूकदारांना अशा व्यवसायांमध्ये भाग घेण्याची संधी मिळवून देतो, जे दीर्घकाळात प्रगती करतील आणि अर्थव्यवस्थेत प्रभावी आणि सार्थक योगदान देतील.

फंडामध्ये किमान अर्ज रक्कम रुपये ५०० (त्यापुढील रु. १च्या पटीत) असून, किमान अतिरिक्त अर्ज रक्कम रुपये १०० (त्यापुढील रु. १ च्या पटीत) आहे. वाटपाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत गुंतवणूक रिडीम केल्यास १% एक्झिट लोड लागू होईल. या फंडामध्ये वाढ आणि आयडीसीडब्ल्यू (इन्कम डिस्ट्रीब्युशन कम कॅपिटल विदड्रॉवल) असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.

## आज का अंदाज

शुक्रवार २७ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| २३६ | १५६ | १६८ | २६० | १५८ | १४० | ६०० | २३४ |
| ४७० | २३७ | ३४८ | ४५९ | ६८० | २६७ | १२३ | ४५० |
| १२८ | ५७० | २३० | ३५० | ३५६ | ७८० | ३३० | ३६० |
| १० | २० | ५४ | ८४ | ४० | ५० | ६७ | ९७ |
| १९ | २९ | ५३ | ८३ | ४१ | ५१ | ६८ | ९८ |
| १७ | २७ | ५६ | ८६ | ४२ | ५२ | ६३ | ९३ |

२७ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ६२ | ७३ | ०३ |
| ३४ | ६४ | ७५ | ०५ |
| ३० | ६० | ७८ | ०९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## गौतम अदानी यांच्या ६३व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



**अहमदाबाद, २६ जून :** २४ जून रोजी अदानी समूहाचे चेअरमन श्री गौतम अदानी यांचा ६३वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने, अदानी ग्रुपची सामाजिक कल्याण आणि विकास शाखा असलेल्या अदानी फाउंडेशनने देशभरातील २१ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील २०६ शहरांमध्ये भव्य रक्तदान मोहीम आयोजित केली. ही मोहीम मागील वर्षीच्या २५,२८२ युनिट्सच्या विक्रमावर मात करत विक्रमी ठरली आहे. अदानी हेल्थकेअर टीमच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या या मोहिमेत अदानी समूहाचे कर्मचारी आणि भागीदार यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. या मोहिमेत २७,६६१ युनिट्स (सुमारे ११,१०० लिटर) रक्त संकलित झाले असून, यामुळे ८३,००० हून अधिक रुग्णांना लाभ होणार आहे. या संकलित रक्तामधून पूर्ण रक्त, पीसीव्ही, प्लेटलेट कॉन्सेंट्रेट्स, प्लाझ्मा, एफएफपी, क्रायोप्रेसिपिटेट आणि अल्ब्युमिन असे विविध रक्तघटक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, जे रुग्णांना जीवनदायी उपचारासाठी उपयुक्त ठरतील. अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी म्हणाल्या, या सेवाभावी उपक्रमात पुढे येऊन सहभाग नोंदविलेल्या आपल्या अदाणी परिवाराचे मी मन:पूर्वक आभार मानते. आपल्या उदारतेमुळे असंख्य जिवांचे आयुष्य उजळणार आहे. ही मोहीम रेड क्रॉस ब्लड बँक आणि शासकीय रुग्णालयांच्या सहकार्याने राबवली गेली. या मोहिमेला अदानी समूहातील ३,००० हून अधिक डॉक्टर, पॅरामेडिक्स, डेटा ऑपरेटर्स आणि प्रशासनिक कर्मचारी यांनी पाठिंबा दिला.

## राशीभविष्य

**मेष :** आज जमिनीशी संबंधित कामात अडथळे येऊ शकतात. दुसजया कोणाकडे नवीन व्यवसायाची जबाबदारी देण्याऐवजी, तुम्ही ते स्वत: घ्यावे. अन्यथा नुकसान होऊ शकते.

**वृषभ :** आज तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अन्यथा भांडण होऊ शकते. कामाच्या ठिकाणी अतिरिक्त जबाबदाजयांमुळे त्रास होईल. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते.

**मिथुन :** आज व्यवसायात अनावश्यक धावपळ होईल. महत्त्वाचे काम पूर्ण होत असताना अडथळे येऊ शकतात. आयात-निर्यात या कामात गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर लक्षणीय यश मिळेल.

**कर्क :** आजचा दिवस सामान्य राहील. तुमचे आरोग्य उत्तम राहील. आज तुम्ही एखाद्या लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. वाहन जपून चालवा. मित्रांकडून आर्थिक मदत मिळेल. व्यवसायात फायदा होईल.

**सिंह :** आज तुमचे मनोबल वाढेल. नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. तुमचा विश्वास अचानक एखाद्या विशिष्ट विषयात ऋची वाढेल. व्यवसायात सुसंवाद राखा. यामुळे तुमचे संपर्क वाढतील.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी नोकरांच्या वाईट वागण्यामुळे तुमच्या मनात असंतोष निर्माण होईल. कधीकधी संघर्षाची परिस्थिती निर्माण होईल. महत्वाचं काम झाल्याने आज तुमची चिंता मिटेल.

**तुळ :** व्यवसायातील तुमच्या समजूतदारपणामुळे मोठ्या नुकसानापासून वाचाल. आज आर्थिक क्षेत्रात, अडकलेले पैसे उशिरा मिळतील. जमिनीशी संबंधित कामातून नफा होईल. घर बांधणीत अडथळे येतील.

**वृश्चिक :** आज तुमची तब्येत काहीशी नरम असेल. जर तुम्ही कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असाल तर तुमचे आरोग्य सुधारेल. प्रवासात असताना आरोग्याकडे अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे.


**धनु :** आज सुख-सुविधांमध्ये अडथळा येईल. घरगुती जीवनात तुम्हाला तुमच्या जोडीदारापासून दूर जावे लागू शकते. वाटेत अचानक तुमचे वाहन बिघडल्याने तुम्ही अस्वस्थ व्हाल. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका.

**मकर :** व्यवसायात गुंतलेल्या लोकांना नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने यश मिळेल. आयात-निर्यात क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना फायदा होईल. सरकारी क्षेत्रात काम करणाजयांना संघर्ष करावा लागेल.

**कुंभ :** काही वाद होण्याची शक्यता आहे. नफ्याचा एक नवीन मार्ग उघडेल. वाईट संगत टाळा. अन्यथा, मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. कुटुंबासोबतचे संबंध सुधारतील.

**मीन :** आजचा दिवस आनंदाचा आणि नफ्याचा असेल. लोकांना नोकरीत त्यांच्या सहकाजयांशी अधिक समन्वय निर्माण करावा लागेल. व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना व्यवसायात नफा मिळण्याचे संकेत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक २१४७



**आडवे शब्द :-**
१) जुना, प्राचीन
५) धोकादायक
९) वाळवी
११) गरजू नडलेला
१३) जागर, झोपेचे खोबरे
१५) किंमत
१६) दंत
१७) नर्तक (चेष्टेत)
१८) चौकशी, विचारपूस
२०) आश्रय
२२) पुरुष
२४) कॅल्क्युलेटरला मराठी शब्द
२५) एक भटकी जमात
२६) शिकारीचा प्राणी
२७) कुचेष्टा, उनाडपणा
३१) वेळ, मृत्यू
३२) रचलेले कारस्थान
३५) उंटाच्या पाठीवरील उंचवटा, भिस्त
३६) तारणपत्र
३९) चकचकीत
४२) निमग्न, रममाण
४३) मान्य करणे
४४) मार्गक्रमण
४६) हालचाल
४९) गोजी, पाडी,
५१) प्लॅटफॉर्मला मराठी शब्द
५२) बंदी
५३) गुरे राखणारा
५४) मैत्रीण
५५) पशू, श्वापद
५७) वनबाला, एका जुन्या नटीचे नाव
६०) शल्य, मनाला टोचणारी रुखरुख
६१) युद्धासाठी उतावीळ झालेला
६३) कामाची गर्दी
६५) थेट
६७) कप्पा, चोळीचे कापड
६८) मनाने घेतलेली भीती
७०) सोने
७२) भारतभर प्रवास
७४) उत्तराधिकारी
७६) मासे पकडणारी जमात
७७) नग, उंच डोंगर
७८) गोष्ट

**उभे शब्द :-**
२) रंगढंग करण्याचे विलासमंदिर
३) होडी
४) दृष्टी
५) झाडाचे टॉनिक
६) एखादी गोष्ट फुगवून सांगणे
७) साप
८) जे करावयास पाहिजे ते न करता नको ते करणाऱ्या वृत्तीचा
१०) सर्व, एकूणएक
१२) नमस्कार
१४) योग्य, उचित
१५) सेवक
१८) चावट
१९) अनेकवेळा
२१) श्रीरामाची चरित्रगाथा
२३) रसदार
२८) डावा
२९) खेकडा
३०) रत्नाकर
३१) सापाने सोडलेली त्वचा
३३) एकाग्र नजर
३४) नवऱ्याचा भाऊ
३७) जादू, हस्तलाघव
३८) खोदकाम
३९) जन्ममृत्यू
४०) पालट
४१) दरवाजा
४३) सामान
४५) चावणारा
४७) केसांची बट
४८) बढाई, बडबड
४९) कावळ्याचे ओरडणे
५०) मुख, चेहरा
५१) फसणे
५३) फुलांचा राजा
५५) पाणी
५६) जेवणातील दोन पदार्थ
५८) दुष्ट माणूस
५९) छोटा, लहान
६०) च्या सह
६२) च्या - - बद्दल
६४) इमारतीच्या पायात भरण्याचा दगडी प्रकार
६६) कोवळी फांदी
६९) हुक्की, लहर
७१) बशीचा जोडीदार
७३) भास
७४) वाचा, किराणा व्यापारी
७५) पडसे

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## प्रत्यक्ष पाहणी करुनच तयार करावा : आ. संजय देरकर यांची मागणी

# शेतीपिकांच्या नुकसानीचा अहवाल



■ महासागर प्रतिनिधी,

**वणी , दि. २६ :** वेकोलिच्या कोळसा उत्पादन व वाहतुकीमुळे उडणाऱ्या कोळशाच्या धुळीने शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेत पिकांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी व अहवाल तयार करण्यासाठी शासनाकडून गठीत करण्यात आली आहे. अभ्यास समितीचे व वेकोलिच्या कोळसाखाणग्रस्त समितीचे अध्यक्ष विकास खरगे यांची वणी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय देरकर यांनी भेट घेतली. या संदर्भात त्यांना धूळ प्रदूषणीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केल्यानंतरच अहवाल तयार करण्यासंदर्भात निवेदन दिले आहे. वेकोलिच्या वणी नॉर्थ क्षेत्रांतर्गत येणाऱ्या कोळसा खाणीतील कोळसा उत्पादन व वाहतुकीमुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कोळसा खाणीतील कोळसा उत्पादन व वाहतुकीमुळे कोळशाची प्रचंड धूळ उडत आहे. त्यामुळे कोळसा खाण परिसर व रस्त्यालगत असलेल्या शेतातील पिके पूर्णपणे नष्ट झाली आहेत. त्यामुळे शेतकरी कमालीचे संकटात सापडले आहे. शेतीच्या मशागतीवर व पिकांच्या लागवडीवर होणारा खर्च पूर्णतः व्यर्थ जात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात आला आहे. वेकोलीच्या धूळ प्रदूषणामुळे शेत पिकांबरोबरच शेतीच्या उत्पादन क्षमतेतही प्रचंड घट झाली आहे. कोळशाच्या रसायन मिश्रित धुळीमुळे शेतीची सुपीकताही घटली आहे. त्यामुळे खाणबाधित क्षेत्रातील शेतकरी विवंचनेत आले आहेत. या अभ्यास समितीचे अध्यक्ष, वेकोलिच्या कोळसाखाणग्रस्त समितीचे अध्यक्ष विकास खरगे यांची आमदार संजय देरकर यांनी प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांनी वेकोलिच्या धूळ प्रदूषणामुळे नुकसान झालेल्या शेतपिकांचे अहवाल तयार करताना प्रत्यक्ष शेतीच्या बांधावर जाऊन पाहणी करावी, अशी ठाम भूमिका मांडली. वस्तुनिष्ठ व पारदर्शकपणे शेतीचे निरीक्षण करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, केवळ कागदोपत्री नोंद घेऊन शेत पिकांच्या नुकसानीचे अहवाल तयार करू नये, अशी भूमिका मांडतानाच आमदार संजय देरकर यांनी विकास खरगे यांना यासंदर्भात निवेदनही दिले.

### आक्रमक भूमिकेनंतर समिती गठीत

वेकोलीच्या कोळसा उत्पादन व वाहतुकीमुळे शेत पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांनी वेकोली विरोधात आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी धूळ प्रदूषणाने नुकसान झालेल्या शेतपिकांची नुकसान भरपाई मिळावी म्हणून वेकोली व प्रशासनाकडे सतत पाठपुरावा केला. वेकोली प्रशासन, तालुका प्रशासन व जिल्हा प्रशासनाला वेळोवेळी निवेदने दिली. एवढेच नाही तर लोकप्रतिनिधींनाही साकडे घातले. त्यामुळे शासनाने रविवार दि. ८ जूनला आदेश काढून वेकोलीच्या धूळ प्रदूषणामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतांची पाहणी करण्याकरिता समिती गठीत केली.

# तीन नगर पालिकांना मिळाल्या शववाहिका



■ महासागर प्रतिनिधी,

**मलकापूर , दि. २६ :** मलकापूर दुर्गम भागातील मृतदेहाची ने-आणकरण्यासाठी बुलडाणा जिल्ह्यास एकूण ३ वातानुकुलीत शववाहिका प्राप्त झाल्या होत्या. जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या आदेशान्वये त्या आरोग्य विभाग जिल्हा परिषद बुलडाणा यांना प्राप्त झाल्या होत्या. नंतर त्या खामगाव, सिंदखेडराजा, मलकापूर या तीन नगर परिषदेला हस्तांतरित करण्याचा आदेश जिल्हाधिकारी यांनी दिला होता. त्या अनुषंगाने ३ शववाहिका जिल्ह्यातील ३ नगर परिषदेला दिल्या आहेत. जिल्हा नियोजन समिती व जिल्हा परिषद बुलडाणा यांच्याकडून हस्तांतरित करण्यात आलेल्या वातानुकुलीत शववाहिनी व २ घंटा गाड्यांचे २३ जून रोजी आमदार चैनसुख संचेती यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. आरोग्य विभाग जिल्हा परिषद बुलडाणा यांच्याकडील शववाहिका हस्तांतरण करुन त्या खामगाव, सिंदखेडराजा व मलकापूर नगर परिषदेला देण्यात आल्या. तर जिल्हा नियोजन समितीमधून मलकापूर नगर परिषदेला २ घंटागाड्या मंजूर करण्यात आल्या होत्या. त्या वातानुकुलीत शववाहिका व २ घंटा गाड्यांचे काल सोमवारी आ.चैनसुख संचेती यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, न.प. प्रशासक तथा तहसीलदार राहुल तायडे, उपमुख्याधिकारी विठ्ठल भुसारी, कार्यालयीन अधीक्षक पुजा खरात, मोहन शर्मा, यश संचेती, संजय काजळे पाटील, किशोर नवले, संतोष बोंबटकर, मिलिंद डवले, प्रसाद जाधव, योगेश पटणी, उमेश हिरुळकर, संजय गावंडे, आशिष माहूरकर, विशाल मधवानी, दुर्गेश राजापुरे, यांच्यासह पालिकेचे आरोग्य निरीक्षक अजय बैस, बांधकाम अभियंता धीरज ठोंबरे, कर निरीक्षक नंदकिशोर आंधळे, रूपेश बळी, प्रणव पाटील, मनोज राजपूत, प्रकल्प अधिकारी खोंडे उपस्थित होते.

### रूग्णालयातील शववाहिकेची अडचण झाली दूर

जिल्ह्यात प्रत्येक ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालयाचे ठिकाण रुग्णवाहिका आहे. ११८ नंबरवर धावणाऱ्या रुग्णवाहिका सुध्दा आहे. परंतु, अपघातात मृत पावल्यास, आत्महत्या केल्यास, आजारपणामुळे मृत्यू झाल्यास शव नेण्याकरता रुग्णवाहिकेचाच वापर होत आहे. बरेच वेळा खासगी रुग्णवाहिका चालकांची रुग्ण वाहुन नेणे, शव वाहुन नेण्यावरुन वाद होतात. कारण रुग्णवाहिकेवरच त्यांची उपजीविका असते. अशावेळी लांब जावयाचे असल्यास बऱ्यापैकी उत्पन्न मिळते. आता शववाहिकाच जिल्ह्यात मिळाल्याने रुग्णवाहिकेचे काम पडणार नाही.

# मनपा शिक्षकांच्या समस्या लवकरच निकाली काढणार :आ. साजिद खान




■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला , दि. २६ :** गत १५ -१६ वर्षांपासून मनपा शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक यांच्या अनेक समस्या प्रलंबित होत्या. सदर समस्यांना घेऊन शिक्षक आमदार धीरज लिंगाडे व आ. साजिद खान पठाण यांनी मनपा आयुक्तांच्या दालनात शिक्षक संघटनांना घेऊन मंगळवारी सकाळी बैठक घेत या सर्व समस्या मांडल्या. यावेळी सर्व समस्या लवकरात लवकर सोडवणार असल्याचे आश्वासन मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी दिले. गेल्या अनेक वर्षांपासून मनपाच्या शिक्षकांच्या विविध समस्या प्रलंबित आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १ जानेवारी २०१६ पासून सातव्या वेतन आयोगापासून शिक्षक अद्यापही वंचित असून त्याची थकबाकी रक्कम देण्यात यावी, पदवीधर शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी लागू करणे बाबत,४० शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणीची थकबाकी रक्कम मिळण्याबाबत, तसेच मुख्याध्यापक पदी नियुक्ती जारी करण्यात आली असली तरी मात्र आर्थिक लाभ देण्यात आला नाही तो देण्यात यावा, सोबतच सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापकांची पदोन्नती देण्यात यावी, आरटीई कायद्यानुसार शिक्षकांचा कार्यालयीन कामकाजाचा पदभार काढण्यात यावा, मनपाची बिंदू नामावली मंजूर नसतानाही इतर जिल्ह्यातील शिक्षकांना मनपा शाळेत नियुक्ती देण्यात आली आहे, ही बाब गंभीर असून याची चौकशी करण्यात यावी तसेच जे बिंदू नामावली नुसार मनपा शाळेत समायोजित झाले आहेत त्यांनाच कायम करण्यात यावे इतर शिक्षकांना त्यांच्या मूळ आस्थापनेवर पाठविण्यात यावे, १० वर्षांपासून जे शिक्षक एकाच शाळेवर कार्यरत आहेत त्यांच्या बदल्या करण्यात याव्या, तसेच मनपाने सातव्या वेतन आयोगाच्या नुसार एरियर्स न देण्याचा जो निर्णय घेतला आहे तो मागे घेत नियमाप्रमाणे सर्व शिक्षकांना देण्यात यावा, सेवानिवृत्त शिक्षकांना पेन्शन मिळण्यास होणारी अडचण दूर करण्यात यावी, शिक्षकांचे जीपीएफ व सेवा पुस्तकांचे अपूर्ण असलेले कार्य पूर्ण करण्यात यावे, मनपा शिक्षक विभागातील प्रशासकीय रिक्त पदे भरण्यात यावी अशा अनेक मागण्या यावेळी शिक्षक संघटनांनी आयोजित बैठकीत मांडल्या.

यावेळी मनपा आयुक्त सुनील लहाने यांनी सदर मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले. यावेळी यावेळी उपआयुक्त गीता ठाकरे, शिक्षणाधिकारी डॉ. शाहीन सुलताना, संजय खराटे यांच्यासह अधिकारी कर्मचारी तसेच प्रदेश महासचिव प्रकाश तायडे, महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, पराग कांबळे, अब्दुल रहीम पेंटर, योगेश कळसकर, तपसू मानकीकर, प्रा. नरेंद्र लाखाडे, पंकज देशमुख, महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे सै. जव्वाद हुसैन, सरदार खान, मजबूर अहमद, सईद खान, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघटनेचे अनिल अघडते, रवींद्र वानखेडे, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे गोकुळ हरणे, श्रीकांत भूतकर, न.पा. शिक्षक संघाचे राजू भिरड, शेख रहेमान, अपंग अधिकारी कर्मचारी संघाचे मो. अब्दुल अजीज, शेर जमा खान, सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे राम शेगोकार, रवींद्र चव्हाण आदी उपस्थित होते. मनपा शाळांची भौतिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे, सोबतच अनेक ठिकाणी पाहणीत आढळून आले की, पावसात शाळेची छत गळते, वर्गामध्ये पाणी साचते, शाळेच्या आवारात सुद्धा मोठ्या प्रमाणात साचलेले पाणी यासह अनेक भौतिक सुविधांचा अभाव आढळून आला आहे. मनपा शाळांची भौतिक अवस्था सुधारण्यात यावी, विद्यार्थ्यांना बसायला डेस्क बेंच उपलब्ध करून देण्यात यावे सोबतच शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी प्रयत्न करण्यात यावे असे निर्देश आ. पठाण यांनी बैठकीत दिले.

# मेघा ठाकरेंचा 'योगरत्न' पुरस्काराने सन्मान

■ महासागर प्रतिनिधी,

**नांदगाव पेठ , दि. २६ :** नक्षलग्रस्त आणि दुर्गम भाग असलेल्या गोंदिया जिल्ह्यात गेली १२ वर्षे निरंतर मोफत योग विद्येचा प्रचार करणाऱ्या, ग्रामीण जीवनात योगाची ज्योत पेटवणाऱ्या अमरावती येथील प्रसिद्ध योग निसर्गोपचार व आहार तज्ज्ञ मेघा लक्ष्मण ठाकरे यांना नुकतेच 'योगरत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, एजीएमए व आयुष विभाग यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे उद्घाटक डॉ. बाळासाहेब पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. नितीन राजे पाटील उपस्थित होते. मेघा ठाकरे यांनी गोंदिया जिल्ह्यातील अनेक आदिवासी व मागास भागांमध्ये जाऊन ३६० पेक्षा अधिक मोफत योग शिबिरे घेतली. केवळ योगाभ्यासच नव्हे तर वृक्षारोपण, जनजागृती रॅली, शालेय योग शिबिरे व बालसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण केली आहे. गेल्या चार वर्षांपासून त्यांनी अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातही योग प्रसाराचे कार्य हाती घेतले असून, त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन 'योगरत्न' या पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला.



समाजात आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि नैतिक मूल्यांची जागृती घडवणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वांचा सन्मान हा संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत असतो. योगसाधना आणि सामाजिक बांधिलकी यांची अभूतपूर्व सांगड घालणाऱ्या मेघा ठाकरे यांचे कार्य हे इतरांसाठीही मार्गदर्शक ठरत असून, त्यांना मिळालेल्या या मानाच्या पुरस्कारामुळे जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भगोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुका हा अति नक्षलग्रस्त भाग होता. येथे काम करताना सुरुवातीला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. धीराने त्या अडचणींवर मात केली. मानसिक त्रासही झाला. मात्र, गावागावांत योगविद्या पोहोचवण्याचा संकल्प असल्याने जिद्दीने त्या ठिकाणी काम केले. महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे नंतर संपूर्ण जिल्ह्यात योगविद्या शिकवण्याचा मार्ग सुकर झाला.



## जिल्ह्याच्या सौर ऊर्जानिर्मितीत ४ मेगावॅटने वाढ

# ३२ गावातील कृषीपंपांना दिवसा विजेची सोय

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. २६ :** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला जिल्ह्यात गती देण्यात आली असून महावितरणच्या कळंब उपविभागातील पाथ्रड येथे सौर प्रकल्प सुरू झाल्यामुळे एकुण सौर ऊर्जानिर्मितीत ४ मेगावॅटने वाढ झाली आहे. या प्रकल्पामुळे ३३ केव्ही कळंब उपकेंद्रातून वीज पुरवठा होणाऱ्या बत्तीस गावातील १ हजार १९३ शेती पंपाला दिवसा आणि शाश्वत विजेची सोय झाली यामुळे शेतकरी आनंदार आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य शासन सातत्याने कार्यरत असून शेतकऱ्यांना दिवसा आणि शाश्वत वीज पुरवठा करण्यासाठी असलेली शासनाची महत्वाकांक्षी योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला ऊर्जा सचिव आभा शुक्ला आणि महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र याच्या मार्गदर्शनात गती देण्यात आली आहे. कळंब तालुक्यात सुरू झालेल्या पाथ्रड सौर प्रकल्पाची क्षमता ४ मेगावॅट एवढी असून हा प्रकल्प २० एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आला आहे. या उपकेंद्रात निर्मिती होणारी सौर ऊर्जा ३३ केव्ही कळंब उपकेंद्राच्या माध्यमातून परिसरातील ३२ गावातील १२०० शेतकऱ्यांसाठी दिवसा विजेची सोय झाली आहे. कळंब तालुक्यात सुरू झालेले महावितरणचे हे दुसरे प्रकल्प असून या अगोदर सावरगाव परसोडी (३ मेगावॅट) येथे सुरू झालेल्या प्रकल्पातून १ हजार ४६ शेती पंपाला दिवसा वीज मिळत आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत १६ मेगावॅट क्षमता असलेले एकूण चार सौर प्रकल्प सुरू झाले. या सौर प्रकल्पातून ६ हजार ४०५ शेती पंपाला दिवसा वीज मिळत असल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण आहे. अवादा एनर्जी प्रा.लि.या विकासकामार्फत पूर्ण करण्यात आलेले पाथ्रड सौर प्रकल्प मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता प्रविण दरोली , तसेच कार्यकारी अभियंता पुरूषोत्तम चव्हाण व शेतकरी यांच्या उपस्थिती सुरू करण्यात आला आहे. बिटरगाव येथे मुख्यमंत्री सौर प्रकल्प कार्यान्वित मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ५ मेगावॅट क्षमता असलेला सौर ऊर्जा प्रकल्प महावितरणच्या ढाणकी उपविभागातील बिटरगाव येथे सुरू झालेला आहे.




# एमएसएमई महोत्सवाचे आयोजन

## नवउद्योजकांसाठी एकाच छताखाली सर्व सुविधा

**अकोला :** द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया (आयसीएआय) अकोला शाखेच्या वतीने पहिल्यांदाच एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'उद्योगाचा सन्मान, एमएसएमईचा अभिमान' या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय हा महोत्सव २६ व २७ जून रोजी आयसीएआय भवन, तोष्णीवाल लेआउट येथे पार पडणार आहे. या महोत्सवात १५ शासकीय, वित्तीय व उद्योग क्षेत्राशी संबंधित संस्थांचे मार्गदर्शन स्टॉल्स नागरिकांसाठी खुल्या असणार आहेत. आयसीएआयच्या आयोजित पत्रकार परिषदेत अध्यक्ष धीरज चांडक, उपाध्यक्ष रोमिल सोजतीया, सचिव श्याम माहेश्वरी, कोषाध्यक्ष विशालकुमार राजपाल व विकास अध्यक्ष प्रतीक मंत्री यांनी ही माहिती दिली. महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी, २६ जून रोजी सकाळी १० वाजता खा. अनुप धोत्रे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उद्योजक अजयप्रकाश रुहाटिया उपस्थितांना मार्गदर्शन करतील. एमएसएमई स्टार्टअप इकोसिस्टीम, टॅक्सेशन, फंडिंग, कायदेशीर सल्ला, कॅपिटल मार्केट, टेक्निकल अडॉप्शन, आणि सबसिडी योजनांवर सखोल सत्र होणार आहेत. २७ जून रोजी विविध विषयांवर तांत्रिक व समारोप सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात असो.च्या वतीने हेल्प डेस्क साकार करण्यात येणार असून यामध्ये उद्योजक बनू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी उद्यम नोंदणी करण्यात येणार आहे. डीआयसीच्या वतीने पीएसआय, सीएमईजीपी, पीएमईजीपी तथा मैत्री पोर्टल नोंदणीची सोय उपलब्ध करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आयकर विभागाच्या वतीने ई पॅन, स्टार्टअप टॅक्स एक्सेप्शन, टीडीएसचे निराकरण, पॅन आधार लिंकिंगचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विविध माहिती देणार मनपाच्या वतीने परवाना शिबिर तर प्रदूषण नियंत्रण बोर्डाच्या वतीने संबंधित विविध मार्गदर्शन होणार आहे. नाबार्डच्या वतीने विविध प्रकारच्या वित्तीय कर्ज योजना व सबसिडी यांची माहिती देण्यात येणार असून जीएसटी विभागाच्या वतीने पीटीआरसी नोंदणी,जीएसटी नोंदणी व नागरिकांच्या शंकांचे समाधान करण्यात येणार आहे. एफएसएसएआय विभागाच्या वतीने मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## मारेगाव तालुक्यात विकास कामाला खीळ



**रस्ते, विजेचा प्रश्न ऐरणीवर?**

**मारेगाव :** तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून रस्ते, सिंचन, क्रीडांगण, बसस्थानक, ग्रामीण रुग्णालयातील ट्रामा सेंटर वीज, पिक कर्जाची समस्या, शिक्षण, उद्योग. जल जीवन मिशन, ग्रामीण भागात आरोग्य केंद्राची मागणी आदी विविध समस्या तालुक्यात आ वासून उभ्या आहेत. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मात्र, या सर्व बाबींकडे पुढाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. तालुक्याला जोडणाऱ्या अनेक गावातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. गाव तिथे रस्ता असे शासनाचे ब्रीद असले तरी अनेक मार्गाचे रस्ते खड्डेमय झाले आहेत. खरीप हंगाम सुरू झाला असताना विज वितरण कंपनीच्या मनमानी कारभाराने तालुक्यातील अनेक गावातील कृषी पंपाला नियमीत वीज पुरवठा मिळत नाही तर हवा आली की विजेचा लपंडाव सुरु असतो. त्यामुळे शेतकरी कमालीचे वैतागले आहेत.

# विद्यापीठात छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. २६ :** छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.

जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रा.डॉ. प्रशांत ठाकरे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम, श्री विलास काकडे तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **DEEPAKKUMAR LAXMANRAO DOHARE.** NOW MY NEW NAME IS **DEEPAK LAXMAN DOHARE.**
**ADD** : PLOT NO 403 OPP SHIV MANDIR CHUNA BHATTI WARDHA ROAD NAGPUR

MY OLD NAME WAS **RAJESAHEB GANPAT JODH.** NOW MY NEW NAME IS **RAJABHAU GANPATRAV JODH.**
**ADD** : PLOT NO 8 PASYDAN DATTAWADI WADI NAGPUR 440023

MYOLD PASSPORT NO. **K6778136**. MY OLD NAME WAS **NILUFAR ABDUL RAFIQ.** NOW MY NEW NAME IS **NILUFAR ABDUL RAFIQ SHEIKH.**
**ADD** : NEAR SWASTIK SCHOOL 587, NAYA NAKASHA LASHKARIBAGH NAGPUR-440017

MY OLD NAME WAS **SHEIKH ASPAK ALIMUDDIN SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **ASHFAQUE ALIMUDDIN SHEIKH.**
**ADD** : P.N.211 JAI HIND NAGAR SADIQABAD ROAD, MANKAPUR, NAGPUR - 440030

MY OLD NAME WAS **SUSHILA DINESH GAIKWAD.** NOW MY NEW NAME IS **SUCHITRA DINESH GAIKWAD.**
**ADD** : H.NO. 463/A/22, BHARAT SADAN SIRASPETH, HANUMAN NAGAR, NAGPUR - 440009

I , **PANKAJ PATEL** MY DAUGHTER OLD NAME IS **RAJESHWI PATEL** MY OLD PASSPORT NO **P3443617**. NOW MY DAUGHTER NEW NAME IS **RAJASWI PATEL.**
**ADD:** P NO 148 AMBEDKAR CHOWK BEHIND PATIDAR SAMAJ WADI NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **NARINDER SINGH SRAW.** NOW MY NEW NAME IS **NARENDRA SINGH SRAW.**
**ADD** : PLOT NO 33 DR AMBEDKAR HOUSING SOCIETY MANKAPUR NAGPUR 440030


# बैलगाडीसह नाल्यात पडल्याने शेतकरी ठार

**राळेगाव:** सध्या शेत शिवारात पेरणीचे कामे सुरु आहेत. अशातच शेतात जात असताना बैलगाडी नाल्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. बुधवारी दि. २५ जून रोजी दुपारी तालुक्यातील दहेगाव येथे ही हृदयद्रावक घटना घडली. यात बैलगाडीला बांधून असलेल्या दोनपैकी एक बैल बचावला.

राजू रोकडे (वय ५५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. गावालगत ये-जाकरणाऱ्या नागरिकांना नाल्यात एक बैल व बैलगाडी पाण्यात तरंगताना आढळली. त्यांनी ही माहिती गावकऱ्यांना व पोलिसांना दिली. गावकरी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक युवकांच्या मदतीने शोधमोहीम राबवण्यात आली. या दरम्यान, बैलगाडी व त्यास बांधलेला एक बैल मृतावस्थेत आढळून आला. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर शेतकरी राजू रोकडे यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. या घटनेचा तपास ठाणेदार सुखदेव भोरखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सुनील कुडमथे, धनंजय येसेकर, प्रविण चौधरी, व होमगार्ड यांच्या पथकाने सुरू केला आहे. मृत राजू रोकडे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सून व नातवंड असा परिवार आहे. पाण्याचा प्रवाह वाढला प्राथमिक अंदाजानुसार रोकडे हे शेतात कामासाठी जात असताना त्यांच्या बैलांना पाणी पिण्यासाठी नाल्यावर नेले गेले असावेत. पाण्याच्या प्रवाहात बैलगाडी अडकल्याने ही दुर्दैवी घटना घडली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. वडकी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी करंजी येथील ग्रामीण रुणालयात पाठवला आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# असमिता

## चटपटीत मंचुरियन

रसगंधा

मे न्यू कार्डमध्ये गोबी मंचुरियन हा पदार्थ हमखास असतो. बऱ्याच जणांना गोबी मंचुरियन आवडतं. चटपटीत, चविष्ट गोबी मंचुरियन खूप छान लागतं. पण हा पदार्थ तुम्ही घरीही बनवू शकता. गोबी मंचुरियनची रेसिपी जाणून घेऊ या.



साहित्य: एक गड्डा फ्लॉवर, अर्धा कप मैदा, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, कांदा, सिमला मिरची, तेल, पाणी.

सॉससाठी: अर्धा कप पाण्यात दोन चमचे कॉर्नफ्लोर मिसळून घ्या. अर्धा कप टोमॅटो प्युरी, सोया सॉस, मीठ आणि पाणी.

कृती: फ्लॉवरचे मोठे तुकडे करून घ्या. कांदा, सिमला मिरचीचे लांब काप करा. आता मैद्यात आलं आणि लसूण पेस्ट घालून मिसळून घ्या. त्यात फ्लॉवरचे तुकडे घाला. सगळ्या तुकड्यांना मैदा नीट लागायला हवा. आता कढईत तेल गरम करा. फ्लॉवरचे तुकडे सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळून घ्या. आता कढईतलं जास्तीचं तेल काढून ठेवा. उरलेल्या तेलात थोडी आलं-लसूण पेस्ट घाला. त्यात कांदा घालून परता. मग सिमला मिरची घाला. सॉससाठीचं सर्व साहित्य एका भांड्यात एकत्र करा. आता हे साहित्य कढईत घाला. आता कढईतलं मिश्रण घट्ट होऊ लागेल. यात फ्लॉवरचे तुकडे घालून मिसळून घ्या. गरमागरम खा.

## डोळ्यांची नियमित तपासणी गरजेची



निरोगी राहा

ए खादी आजारी व्यक्ती डॉक्टरकडे जाते तेव्हा डॉक्टर नाडीसह तिचे डोळे तपासतात. पण यातून डॉक्टरांना नेमके काय समजते, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? होय, डॉक्टर तुमच्या डोळ्यांकडे पाहून आरोग्याशी संबंधित अनेक गोष्टी जाणून घेऊ शकतात. शरीराच्या अनेक आजारांची लक्षणे डोळ्यात दिसू शकतात.

डोळे हा शरीरातील एकमेव असा अवयव आहे ज्यामध्ये आपण रक्तवाहिन्या थेट पाहू शकतो. त्याचप्रमाणे मेंदूचा एक भाग असणारी ऑप्टिक नर्व्ह देखील डोळ्यात दिसते. म्हणूनच डोळ्यांची तपासणी करून शरीरातील अनेक आजार शोधता येतात. ३४ टक्के लोकांना डोळ्यांच्या तपासणीद्वारे मधुमेहाचे पहिले लक्षण आढळत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. डोळ्यांच्या तपासणीद्वारे ३९ टक्के लोकांचा उच्च रक्तदाब ओळखला तर ६२ टक्के लोकांना डोळ्यांच्या तपासणीमुळे उच्च कोलेस्ट्रॉलची पहिली माहिती मिळाली आहे. म्हणूनच डोळ्यांच्या नियमित तपासणीचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे.तुम्हाला अचानक डोळ्यांमध्ये लाल ठिपके किंवा लहान रक्ताचे डाग दिसले तर ते मधुमेहाचे लक्षण असू शकते.

शरीरात साखरेची पातळी वाढते तेव्हा डोळ्यांच्या नाजूक शिरा फुटून रक्तस्राव होऊ शकतो. यावर वेळीच उपचार केले नाहीत तर अंधत्व देखील येऊ शकते.

डोळे लाल होणे, खाज सुटणे आणि सूज येणे याचीही अनेक कारणे असू शकतात. डोळे लालसर दिसत असतील तर तो बुरशीजन्य संसर्ग किंवा ॲलर्जीचा परिणाम असू शकतो. ॲलर्जी ही धूळ, परागकण किंवा पाळीव प्राण्यांची असू शकते. अशा परिस्थितीत अँटीहिस्टामाइन असणारे आय ड्रॉप्स मदत करू शकतात.

## पाठलाग हसऱ्या स्वप्नांचा

मानिनी

ज रना गर्ग या भारतीय-अमेरिकन महिलेने आयुष्यातील सर्व संघर्षांवर मात केली आणि स्वत:ची ओळख निर्माण केली. कुटुंब सांभाळून घरकाम करणाऱ्या आईपासून लोकप्रिय स्टँड-अप कॉमेडियन बनण्यापर्यंतचा एक अनोखा प्रवास तिने केला आहे. जरना मजेदार शैलीसाठी, आपल्या 'आंटी जरना' या पात्रासाठी आणि कौटुंबिक अनुभवांवर आधारित विनोदासाठी जगभरात ओळखली जाते. आज आपण तिच्या प्रेरणादायी कथेबद्दल सविस्तर जाणून घेऊ या.



जरनाचा जन्म मुंबईतला. किशोरावस्थेत तिने अरेंज्ड मॅरेज नाकारले आणि भारत सोडला. पुढे आईचे निधन झाल्यावर तिने एकटीनेच अमेरिकेत स्थिरावण्याचा निर्णय घेतला. याबाबत जरना गर्ग म्हणते की, दुसऱ्याने माझ्यासाठी ठरवलेले जीवन जगायचे नाही हे मी तेव्हाच ठरवले होते. अमेरिकेत तिने एका इमिग्रेशन वकिलाशी लग्न केले आणि नंतर ती एका मुलाची आई बनली. पुढची जवळजवळ १६ वर्षे ती घरी राहून काम करणारी आई होती. पण एके दिवशी तिने स्वत:ला विचारले, माझी स्वत:ची स्वप्ने काय आहेत? ... येथूनच तिचा हसवण्याच्या विश्वातील प्रवास सुरू झाला. जरना चाळिशीनंतर स्टँड-अप कॉमेडी करू लागली. तिने भारतीय काकूंच्या मजेदार कथा, आई-मुलाचे संभाषण, लग्न आणि सांस्कृतिक अंतर आदी विषय आपल्या विनोदी सादरीकरणाचा एक भाग बनवले. तिची सिग्नेचर स्टाईल 'आंटी जरना' आज सोशल मीडियावर खूप प्रसिद्ध आहे.

जरनाने 'धिस अमेरिकन लाइफ', 'अमेझॉन प्राइम स्पेशल' आणि यासारख्या अनेक मोठ्या स्टेज शो मध्ये सादरीकरण केले आहे. जरना गर्गचा 'एनबीसी कॉमेडी शोकेस' आणि 'टॉप इमर्जिंग कॉमेडियन'मध्येही समावेश होता. तिची कथा भारतीय प्रेक्षकांसाठी, विशेषत: महिलांसाठी खूप प्रेरणादायी आहे. जरना एका मुलाखतीत म्हणते की, 'मी एक मुस्लिम मुलगी होते. अमेरिकेत आल्यावर एका हिंदू मुलाशी लग्न केले आणि आता मी एक अमेरिकन कॉमेडियन आहे. मी प्रत्येक सीमा तोडल्या आहेत.'

खेरीज वय, कौटुंबिक पार्श्वभूमी किंवा सामाजिक भूमिका एखाद्याच्या स्वप्नांना थांबवू शकत नाही, हेदेखील तिने सिद्ध केले आहे. आई म्हणूनही तिने तिच्या आवडीचे काम केले तर दुसरीकडे ती लोकांना हसवण्याचे समर्थ माध्यम बनली. थोडक्यात परंपरा आणि दबावाच्या परिस्थितीमध्ये आपली ओळख शोधणाऱ्या लाखो महिलांसाठी जरना एक प्रतीक बनली आहे, यात शंका नाही.

## प्रश्न नक्की सुटतील

मा झ्या लग्नाला १३ वर्षं झाली असून आम्हाला ११ वर्षांचा मुलगा आहे. माझ्या पतीने मुलाला खूप लाडावून ठेवलं आहे. ते त्याला चुकीचं शिकवत आहेत. फारसा अभ्यास न करताही आपल्यासारखा यशस्वी उद्योजक होता येईल, असं त्यांनी मुलाला सांगितलं. तेव्हापासून तो नीट अभ्यास करत नाही. अलिकडेच त्याने मी वडिलांप्रमाणे मद्यपान करू का, असं विचारलं. यामुळे मला धक्का बसला आहे. वडिलांच्या चुकीच्या सवयी त्याच्या अंगवळणी पडत आहेत. याबद्दल मी पतीला समजावलं. पण ते सगळं हसण्यावारी नेतात. मुलावर चुकीचे संस्कार होत असल्याचं त्यांच्या गावीही नाही. यामुळे मी खूप धास्तावले आहे. काय करू? पतीला त्यांच्या जबाबदारीची जाणीव कशी करून देऊ?



मुलांवर पालकांचा प्रभाव पडत असतो. मुलं वडिलांप्रमाणेच आईचंही निरीक्षण करत असतात. आईच्या वागणुकीतूनही ती बरंच काही शिकतात. त्यामुळे तुम्ही निराश होऊ नका. तुम्हाला मुलाला कशा प्रकारे घडवायचं आहे, हे ठरवा. त्याच्यावर कोणते संस्कार व्हायला हवेत याचा आढावा घ्या. यानंतर पतीशी चर्चा करा. मुलाचं भविष्य घडवण्यासाठी आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची ठरते याची जाणीव पतीला करून द्या. मुलाला प्रत्येक गोष्टीच्या दोन्ही बाजू समजावून सांगा. अभ्यास न करता यशस्वी होता येतं, असं मुलाला वाटत असेल तर या मार्गात किती काटे असतात, कोणती आव्हानं असतात, किती संघर्ष करावा लागतो हे सांगा. मुलाला प्रेरणादायी गोष्टी सांगता येतील. या वयात मुलांना बऱ्याच गोष्टींचं कुतूहल असतं. तुमच्या मुलाला मद्यपानाबद्दल आकर्षण वाटतंय. मुलांचं कुतूहल शमवण्याचा प्रयत्न करा. मुलाच्या प्रश्नांना उत्तरं द्या. त्याला टाळू नका. मद्यपानाचे दुष्परिणाम समजावून सांगा. स्वत:च्या वागणुकीद्वारे त्याच्यापुढे आदर्श उभा करा.

काय करू?

## कोणतीही हयगय नको

स्कील डेव्हलपमेंट



का र्यालयीन स्थळी यशस्वी व्हायचं असेल तर आपल्याला काही सवयी बदलाव्या लागतात. दैनंदिन कामकाजात आपण काही गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. ऑफिसमध्ये उशिरा पोहोचतो, कामाचं नियोजन नीट होत नाही. या सगळ्याचा परिणाम कामावर होतो. तेव्हा कार्यालयीन स्थळी आपली छाप पाडायची असेल आणि कारकिर्दीत यशस्वी व्हायचं असेल तर काय करायला हवं याविषयी...

* वक्तशीरपणा हा कोणत्याही कर्मचाऱ्याचा दागिना आहे. कार्यालयीन वेळेत उपस्थित रहाणं गरजेचं असतं. शिवाय महत्त्वाची मिटिंग किंवा इतर प्रसंगी उशिरा पोहचून चालत नाही. त्यामुळे वक्तशीरपणा अंगी बाणवा. कर्मचाऱ्यांच्या वक्तशीरपणाचं कौतुक होतं. वेळेत हजर असणं तुमची कामाप्रतीची जबाबदारी दर्शवतं.
* ऑफिसला जाण्यापूर्वी दिवसभराच्या कामाचं नियोजन करा. यामुळे कामं झटपट होतील. कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. त्यानुसार कामं करा. यामुळे तुम्हाला उशीर होणार नाही.
* जेवण्यात फार वेळ घालवू नका. या वेळेत वायफळ गप्पा मारत बसण्यापेक्षा वेळेचा सदुपयोग करा. सहकाऱ्यांशी कामाशी संबंधित चर्चा करा.
* व्यावसायिक आयुष्यात ई मेलला प्रचंड महत्त्व असतं. बरेच व्यवहार ई मेलवरच होत असतात. म्हणूनच तुमचा ई मेल आयडी नियमित तपासायला हवा. एखादी महत्त्वाची मेल उशिरा बघितल्यामुळे बरंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे मेलच्या बाबतीत कोणतीही हयगय करू नका.
* मिटिंग किंवा सादरीकरणासाठी पूर्ण तयारीत यायला हवं. जाऊ दे, बघू असं म्हणून पूर्वतयारी न करणं तुमची प्रतिमा बिघडवू शकतं. त्यामुळे मिटिंगमध्ये होणाऱ्या चर्चेसाठी नीट तयारी करा.

## झोप का गं येत नाही?

संगोपन

मु लांच्या वाढीमध्ये शांत झोप अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. पण लहान मुलांसाठी झोपण्याची योग्य वेळ कोणती हे अनेक मातांना ठाऊक नसते. चला तर, आज याविषयी जाणून घेऊ या.

बालतज्ज्ञांच्या मते, लहान मुलांना रात्री ९ ते १० च्या दरम्यान झोपवावे. याचे कारण या वेळी त्यांच्या शरीरात सर्वात जास्त प्रमाणात वाढीस कारक असणारी संप्रेरक स्त्रवतात. ती मुलांची उंची वाढवण्यास, स्नायूंना बळकटी देण्यास तसेच रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यास मदत करतात. स्वाभाविकच या वेळी मूल गाढ झोपेत असेल तर वाढ चांगली होते. नऊ वाजेपर्यंत झोपल्याने मुलांना पूर्ण झोप मिळत असल्यामुळे ते निरोगी, तंदुरुस्त आणि आनंदी राहतात. दुसरीकडे, झोप पूर्ण झाली नाही तर मूल चिडचिडे होते. त्यांना थकवा जाणवतो आणि पुढे अभ्यास तसेच शिकण्याच्या क्षमतेवर याचा विपरीत परिणाम होतो.

हे लक्षात घेता सर्वप्रथम लहानग्यांच्या झोपण्याची नियमित दिनचर्या बनवा. झोपण्यापूर्वी मुलाला आंघोळ घाला. नंतर रात्रीचे जेवण भरवा. त्यानंतर कोमट दूध पाजा आणि पुस्तक वाचून दाखवा, गोष्टी सांगत झोपवण्याचा प्रयत्न करा. दररोज ही प्रक्रिया अवलंबल्याने, मुलाचे मन आणि शरीर आता झोपण्याची वेळ झाली आहे... हे जाणून घेते आणि तशी कृती करते.



झोपण्यापूर्वी खोलीतील दिवे बंद करा आणि ती पूर्णपणे अंधारी करा. चांगले आणि जाड पडदे लावा जेणेकरून बाहेरचा प्रकाश आत येऊ नये. यामुळे मुलांना झोपणे सोपे होते. खेरीज झोपतेवेळी खोलीचे तापमान खूप गरम किंवा खूप थंड नसावे. आरामदायी आणि संतुलित तापमानामुळे मुलांची झोप गाढ आणि आरामदायी होते.

झोपेच्या किमान दोन तास आधी मुलांना मोबाईल, टीव्ही किंवा टॅब्लेट वापरण्यापासून रोखा. ही गॅजेट्स मुलांचा मेंदूला सक्रिय करतात आणि झोप लागण्यात त्रास होतो. मुलांनी दिवसातून किमान एक तास बाहेर खेळणे आवश्यक आहे. यामुळे त्यांची ऊर्जा योग्यरित्या खर्च होते आणि थकल्यामुळे लवकर झोपी जातात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे झोपताना हलके आणि आरामदायी संगीत मुलांना शांत करते आणि लवकर झोपायला मदत करते हे जाणून घ्या. झोपताना खोलीत मंद संगीत असेल तर झोपेची गुणवत्ता सुधारते.


## वॉटरप्रूफ मेकअप आवडतो?

सौंदर्यवर्धन

आ जकाल मेकअप फक्त फॅशनचा नाही तर दैनंदिन जीवनाचा एक भाग झाला आहे. विशेषत: महिलांसाठी ऑफिस, पार्टी किंवा प्रवासादरम्यान सुंदर दिसणे महत्त्वाचे असताना त्या वॉटरप्रूफ मेकअप वापरतात. हा मेकअप बराच काळ टिकतो आणि घाम किंवा पाण्याच्या संपर्कातही खराब होत नसल्यामुळे वापर सोयीस्कर असतो. पण हाच मेकअप हार्मोनल बॅलन्स बिघडवू शकतो, हे तुम्हाला माहिती आहे का?

शरीरात एखाद्या हार्मोनचे प्रमाण खूप जास्त किंवा खूप कमी होते तेव्हा त्याला हार्मोन असंतुलन म्हणतात. हा त्रास असेल तर पीसीओएस, थायरॉईड, वजन वाढणे, अनियमित मासिक पाळी, मूड स्विंग, झोपेच्या समस्या आणि त्वचा तसेच केसांच्या समस्या उद्भवू शकतात.

मध्यंतरी हार्वर्ड पब्लिक स्कूलने वॉटरप्रूफ मेकअप उत्पादनांचा अभ्यास केला तेव्हा त्यांना त्यात फ्लोरिनसारखे उच्च रसायन आढळले. हे वा यासारखी घातक रसायने शरीरातील इस्ट्रोजेन आणि टेस्टोस्टेरॉन सारख्या हार्मोन्सवर परिणाम करू शकतात आणि दीर्घकाळ वापरल्यास ते वंध्यत्व, आजार आणि अगदी स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढण्यासही कारक ठरतात.



वॉटरप्रूफ मेकअपमधील फेनोक्सीएथेनॉल हे रसायन प्रसाधने दीर्घकाळ टिकण्यासाठी वापरले जाते. प्रसाधनांमार्फत ते त्वचेद्वारे शरीरात प्रवेश करते आणि इस्ट्रोजेन सारख्या हार्मोन्सची नक्कल करते. त्यामुळे शरीराच्या नैसर्गिक हार्मोनल प्रक्रियेत व्यत्यय येऊ शकतो. ते थायरॉईड ग्रंथीवर देखील परिणाम करू शकते, असे संशोधनातून दिसून आले आहे.

त्याचप्रमाणे पॅराबेन्स नामक रसायन काजळ, लिपस्टिक, फाउंडेशन इत्यादींमध्ये वापरले जाते. यातून ते शरीरात प्रवेश करत इस्ट्रोजेन रिसेप्टर्स सक्रिय करते. यामुळे इस्ट्रोजेनचे प्रमाण वाढते. परिणामस्वरुप महिलांना अनियमित मासिक पाळी, मूड स्विंग, स्तनातील गाठी आणि कर्करोग अशा गंभीर समस्यांचा सामना करावा लागू शकतो. असे धोके लक्षात घेता यास प्रतिबंधित कसा करावा, हे जाणून घ्या. सर्वप्रथम मेकअप उत्पादन खरेदी करण्यापूर्वी लेबल काळजीपूर्वक वाचा आणि त्यामध्ये घातक रसायने नसल्याची खात्री करा. ते असणारी उत्पादने टाळा. महत्त्वाचे म्हणजे शक्य असेल तेव्हा नैसर्गिक मेकअप उत्पादनांचा वापर करा.

हेअर केअर


### वापरा द्राक्षाच्या बियांचं तेल



काळेभोर, लांबसडक केसांमुळे महिलांचं सौंदर्य खुलतं. मात्र सध्याच्या काळात केसांच्या समस्या वाढल्या आहेत. त्यातच केसांवर वाढत्या प्रदूषणाचाही परिणाम होतो. केस निस्तेज दिसू लागतात, कोरडे पडतात. केसांचं सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी बरेच उपाय केले जातात. मात्र काही नैसर्गिक उपायांनी केस चमकदार होऊ शकतात. द्राक्षाच्या बियांचं तेल केसांसाठी लाभदायी ठरतं. या तेलात केसांच्या वाढीसाठी उपयुक्त ठरणारे बरेच पोषक घटक असतात. द्राक्षाच्या बियांचं तेल लावण्याची एक पद्धत आहे. चार चमचे द्राक्षाच्या बियांच्या तेलात थोडं लवेंडर ऑईल घाला. त्यात अंडं घाला. हे मिश्रण संपूर्ण केसांना लावा. साधारण दोन तासांनी धुवून टाका. या उपायाने तुमचे केस सुंदर दिसू लागतील.

मेक अप


### कलर ब्लॉकिंगचा ट्रेंड



डोळ्यांचा मेक अपही खास असतो. डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती आजमावल्या जातात. विविध ट्रेंड्स फॉलो केले जातात. डोळ्यांच्या मेक अपचे लिटर, स्मोकी आय, कॅट आय असे बरेच प्रकार आहेत. तुम्ही या पद्धतीचा मेक अप केलाही असेल. मात्र सध्या कलर ब्लॉकिंगचा ट्रेंड आहे. या मेक अपसाठी कॉंट्रास्ट, मिक्स अँड मॅच आणि सॉलिड कलर्सचा वापर केला जातो. कलर ब्लॉकिंगमुळे डोळेच नाही तर तुमचं व्यक्तिमत्त्व उठावदार दिसतं. त्यामुळे हा ट्रेंड नक्की फॉलो करा.

किचन टिप्स

### कणकेत भेसळ आहे का?



आपण बाहेरून तयार कणीक आणतो. मात्र ती भेसळयुक्त असू शकते. कणकेत बारिक पावडर किंवा मैदा घातला जातो. मात्र कणकेत भेसळ आहे किंवा नाही हे ओळखता येतं. यासाठी एका भांड्यात पाणी घ्या. त्यात चमचाभर कणीक घाला. पाण्यावर काही कण तरंगताना दिसले तर कणकेत भेसळ आहे असं समजावं.

# अभिमान वाटेल असे कार्य घडावे, असा आशिर्वाद द्या...

## अंबानगरीचे सुपूत्र सरन्यायाधीश भूषण गवई यांचे आपल्या माणसांना मागणे

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २६ :

मी अमरावतीत सरन्यायाधीश म्हणून आलो नाही तर आपल्या भूमित आपल्या माणसांचे आशीर्वाद घ्यायला आलो आहे. अमरावतीकर व परिसरातील आपल्या माणसांनी दिलेले प्रेम पाहून भारावून गेलो आहे, या प्रसंगी माझ्याकडे शब्द उरले नाहीत. मी मागील २२ वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेला प्रेरीत राहून न्यायदानाचे कार्य करत आलो आहे, आता उरलेल्या काळातही कार्य करत राहणार आहे. येणाऱ्या काळातही अमरावतीकरांना अभिमान वाटेल, असे कार्य माज्या हातून घडावे, असा आशिर्वाद मला द्या, असे देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले.




जिल्हा वकील संघाकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. स्वामी विवेकानंद प्रेक्षागृहात सायंकाळी आयोजित सत्कार समारंभाला उत्तर देताना ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती नितीन सांबरे होते. या वेळी नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किलोर, न्यायमूर्ती प्रवीण पाटील, जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, भारत बार कौन्सिलचे सदस्य ॲड. आशिष देशमुख, महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. परितोष पांडे, माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा, लंडनहून आलेले ॲड. साजिद अहमद, जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख, सरन्यायाधीश गवई यांच्या मातोश्री डॉ. कमल गवई, पत्नी डॉ. तेजस्विनी गवई आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

आपल्या वकील व न्यायमुर्ती म्हणून झालेल्या प्रवासाच्या आठवणी सांगताना न्यायमूर्ती गवई म्हणाले की, त्यांचे जीवन त्यांच्या आई वडीलांमुळे विशेषतः त्यांच्या वडिलांमुळे सामाजिक समस्यांविषयी जागरूक झाले. स्वतःला आर्कीटेक्ट व्हायचे होते, पण वडील दादासाहेब गवई यांच्या इच्छेवरून त्यांनी वकिलीची वाट निवडली. वडिलांनी त्यांना समजावले की, वकील झाल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक आणि आर्थिक समतेचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळेल.

न्यायमूर्ती गवई पुढे म्हणाले की, न्यायाधीशांनी भारताच्या राज्यघटनेप्रमाणे सद्सद् विवेकबुद्धीने निर्णय देणे अपेक्षित आहे. लोक काय म्हणतील, ही भीती बाळगून जर न्याय निवाडे दिले गेले, तर तो खरा न्याय होऊ शकणार नाही.

# दुचाकी वाहन पूर्वीप्रमाणेच टोल फ्री राहणार!

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची स्पष्टोक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :



महामार्गावर दुचाकी आणि स्कूटर चालकांना कोणत्याही प्रकारचा टोल कर भरावा लागणार नाही. काही माध्यमांमध्ये असा दावा करण्यात आला होता की, १५ जुलैपासून दुचाकी चालकांना राष्ट्रीय महामार्गावरही कर भरावा लागेल. महामार्गावर दुचाकी वाहनांवर टोल कर लावण्याच्या बातम्या खोट्या असल्याचे सरकारने म्हटले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी स्पष्ट केले आहे की, अशा बातम्या पूर्णपणे खोट्या आणि चुकीच्या आहेत. दुचाकी चालकांना पूर्वीप्रमाणेच टोल करातून सूट मिळत राहील.

सरकार आता खाजगी वाहनांसाठी फास्टॅग आधारित वार्षिक पास जारी करणार असल्याची माहिती गडकरींनी बुधवारी ट्विटरद्वारे दिली. या पासची किंमत तीन हजार रुपये असेल. येत्या १५ ऑगस्टपासून ही पास प्रणाली सुरू होईल. या पासमुळे खाजगी वाहन मालकांना राष्ट्रीय महामार्गांवर कमी खर्चात आणि त्रासमुक्त प्रवास करता येणार आहे.

गडकरींनी गुरुवारी पुन्हा एकदा एक ट्विट करत महत्त्वाची माहिती जाहीर केली आहे. यात त्यांनी दुचाकी वाहनांवर पथकर लागणार की नाही?, याबाबत सविस्तर सांगितले आहे.

राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करताना टोल प्लाझावर टोल टॅक्स भरणे आवश्यक आहे. टोल टॅक्स वसूल करून सरकार राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामात झालेल्या खर्चाची भरपाई करते. याशिवाय राष्ट्रीय महामार्गाच्या देखभाल-दुरुस्तीचा खर्चही टोल टॅक्समधून केला जातो. याचाच भाग म्हणून नवीन योजना जाहीर करण्यात आली असून १५ ऑगस्ट पासून ३००० रुपयांचा फास्टॅग आधारित वार्षिक पास सुरू केला जात आहे.

हा पास सक्रिय झाल्याच्या तारखेपासून एक वषार्साठी किंवा २०० प्रवासांपर्यंत (जे आधी होईल ते) वैध असेल. हा पास विशेषतः गैर व्यावसायिक खाजगी वाहनांसाठी (कार, जीप, व्हॅन इ.) डिझाइन केला आहे आणि देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवर अखंड प्रवास करण्यासाठी सक्षम असेल.

गडकरी म्हणाले की, काही प्रसार माध्यमांमधून दुचाकी वाहनांवर पथकर लावण्यात येणार असल्याच्या खोट्या बातम्या चालवल्या जात आहेत. असा कुठलाही निर्णय प्रस्तावित नाही. दुचाकी वाहनांना पथकरापासून पूर्णपणे मुक्ती आहे. त्यांना कुठलाही कर लागणार नाही. अशा खोट्या बातम्या बसरवणे चुकीचे असल्यचेही गडकरी म्हणाले.

# ..तर दंड ठोठावला असता



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :

न्यायालयात हिम्मत असती तर त्यांनी दंड लावला असता, अशा शब्दात वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक संदर्भातील फेटाळलेल्या याचिकेवर प्रतिक्रिया दिली आहे. या याचिकेमुळे न्यायालयाचा वेळ वाया गेला असून आम्ही दंड लावत नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते. मात्र. यावर प्रकाश आंबेडकर यांनी वरील पद्धतीने प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

न्यायालयाने मूळ याचिका सोडून छोट्या मोठ्या चुकांवर निकाल दिला असल्याचा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. या विरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणारच आहोत. मात्र, त्याचबरोबर बार कौन्सिल कडे जाणार आहोत. हे प्रकरण पब्लिक डोमेन मध्ये जायला हवे, असा आमचा प्रयत्न असेल, असे देखील प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

आम्ही वेळ वाया घालवला असे कोर्टाचे जर म्हणणे आहे तर तुम्ही आमचे काय एक्झामिन केले का? जर निवडणूक आयोग स्वतःहून म्हणत आहे की, ७६ लाख मतदान झाले आहे. इलेक्शन कमिशन स्वतःहून आमच्याकडे रेकॉर्ड नाही, असे म्हणत आहे. त्यामुळे केवळ न्यायालयाला उलट तपासणी करण्याचा अधिकार आहे. इतर कोणालाही असा अधिकार दिलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# सूर्या केमिकल कंपनीत छत कोसळून तरूणी ठार : ६ कामगार जखमी

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २६ :

झरी तालुक्यातील गणेशपूर येथे सूर्या केमिकल्स या कंपनीचे छत कोसळून सहा कामगार त्याखाली दबले. यात एका तरूणीचा मृत्यू झाला असून, सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. गंगा कंवर (२०), रा. राजनांदगाव, छत्तीसगड असे मृत तरूणीचे नाव आहे. जखमी झालेले सर्व कामगार हे छत्तीसगडमधील आहेत. ही घटना गुरूवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली.

गणेशपूर येथील सूर्या केमिकल कंपनी व्हाईट वॉश व बांधकाम साहित्याचे उत्पादन करते. या कंपनीत परप्रांतीय मजूर कामगार काम करतात. सकाळी नेहमीप्रमाणे मजूर कंपनीत काम करत असताना कंपनीच्या इमारतीचे एक छत अचानपणे कोसळले. यात मजूर दबल्या गेले. घटना घटनेची माहिती झरी पोलिसांना देण्यात आली. कंपनीतील इतर कर्मचाऱ्यांनी बचावकार्य सुरू करीत मलब्याखाली दबलेल्या मजुरांना बाहेर काढून जखमींना वणी येथे उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले.

मात्र उपचार मिळण्यापूर्वीच गंगा कंवर या मजूर तरूणीचा मृत्यू झाला. इतर जखमी मजुरांवर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. मृत व जखमी मजूर छत्तीसगड राज्यातील असल्याने त्यांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली आहे. सूर्या केमिकल कंपनीचा मालक आंध्रप्रदेशातील असल्याची माहिती आहे.

झरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या खनिजांमुळे येथे सिमेंट आदी उद्योग स्थिरावले आहे. बहुतांश कंपनी सिमेंट, चुनखडी आदींचे उत्पादन घेतात. या कंपन्यांमध्ये स्थानिकांपेक्षा परप्रांतीय मजुंराचा भरणा अधिक असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले. कंपनीत परप्रांतीय मजुरांना मोठ्या प्रमाणात राबवून घेतले जात असल्याचा आरोपही या घटनेनंतर अनेक कामगारांनी केला आहे.

दोन महिन्यांपूर्वी एप्रिल महिन्यात यवतमाळ येथील लोहारा एमआयडीसी परिसरात असलेल्या मनोरमा दालमिलमध्ये डाळ साठवणुकीचा डोम कोसळून तीन कामगार ठार झाले, तर दोघेजण गंभीर जखमी झाले होते. याच घटनेची पुनरावृत्ती झरी येथील सूर्या केमिकल कंपनीत झाल्याची चर्चा आहे.

# राज्यात हिंदीची नव्हे केवळ मराठीची सक्ती

## शेलारांनी स्पष्ट केली भाजपची भूमिका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील हिंदीच्या सक्तीविरोधात ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढण्याची हाक दिली आहे. भाजप नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांनी या प्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट करत राज्यात हिंदीचे नव्हे तर केवळ मराठीची सक्ती असल्याचे स्पष्ट केले.

राज्यात हिंदीची सक्ती असा शब्द वारंवार वापरला जातो. पण राज्यात प्राथमिक शिक्षणात केवळ हिंदी भाषेची सक्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची नाही, असे ते म्हणालेत. शेलार म्हणाले, राज्यातील शिक्षणात हिंदीची सक्ती ही भाजपची भूमिका नाही. पर्यायी भाषा म्हणून विद्यार्थ्यांच्या इच्छेसाठी जेवढ्या भाषा आहेत, त्यात हिंदी असावी असे आमचे मत आहे.

# बाल संरक्षण पथकाने कामठीत थांबविला बाल विवाह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :




कामठी मतदारसंघात बालविवाहाच्या घटना वाढल्याचे समोर आले आहे. येथे होणारा एक बालविवाह पोलिस आणि बाल संरक्षण पथकाने वेळीच केलेल्या कारवाईमुळे टाळता आला.

मुलांचे आधार कार्ड घेतल्याशिवाय व मुलांची वय निश्चिती झाल्यानुसार मुलगी व मुलगा अल्पवयीन असणार नाही याची खात्री पटल्यानंतरच बुकिंग डेकोरेशनवाल्यांनी, हॉलवाल्यांनी, लग्न लावून दिले जाणार नाही याची काळजी घ्यावी. पोलिस निरीक्षक महेश आंधळे हे कामठी पोलिस स्टेशन अंतर्गत बैठक घेणार आहे.

कामठी येथे एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह होत असल्याबाबतची माहिती कामठी नवीन पोलिस स्टेशन येथील पोलिस निरीक्षक महेश आंधळे यांना मिळाली. त्यांनी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांना याबाबतची माहिती दिली.

जिल्हा महिला बालविकास अधिकारी रंजीत कुरे यांनी तातडीने एक पथक स्थापन करून कामठीत पाठवले आणि पोलिसांच्या सहकार्याने बालविवाह थांबवला.

संबंधितांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून बंधपत्र लिहून घेण्यात आले व अल्पवयीन मुलीला रेस्क्यू करून पोलिसांच्या सहकार्याने बाल कल्याण समिती समक्ष हजर करून बालगृहात दाखल करण्यात आले.

कामठीत गेल्या काही महिन्यापासून बालविवाह तक्रारी वाढल्या असून येथील मंगल कार्यालय, डेकोरेशन वाले, कॅटरिंगवाले व लग्न लावून देणारे या सर्वांना पोलिस नोटीस बजावणार आहे व बालविवाहाकामठी विभागात जनजागृती करणार आहे. बालविवाह कसे रोखता येईल व अल्पवयीन मुलींची सुरक्षा कशी करता येईल, याबाबत पोलिस विभाग व महिला व बालविकास विभाग पाऊल उचलणार आहे.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, पोलिस निरीक्षक महेश आंधळे, संरक्षण अधिकारी साधना हटवार, दीप्ती मोडघरे, रुक्मिणी जंगलवार, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टच्या वैष्णवी बावणे यांनी बालविवाह थांबविण्याची ही कारवाई पार पाडली.

: सिनेरंग :

# येरे येरे पैसा ४ मध्ये काम करण्याची सलमानची इच्छा

येरे येरे पैसा आणि येरे येरे पैसा २ या यशस्वी चित्रपटांनंतर आता प्रेक्षकांच्या मनोरंजनाची ट्रिपल डोस घेऊन येरे येरे पैसा ३ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

या बहुप्रतीक्षित चित्रपटाचे टायटल साँग नुकतेच एक भव्य सोहळ्यात लाँच करण्यात आले. विशेष म्हणजे या सोहळ्याला बॉलिवूडचा दबंग अभिनेता सलमान खान आणि महेश मांजरेकर याची विशेष उपस्थिती होती, ज्यामुळे कार्यक्रमाचे आकर्षण अधिकच वाढले. या वेळी सलमान खान याने गाण्याचे कौतुक करत चित्रपटाच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या.



लोकरंजन

या जबरदस्त गाण्यात वैशाली सामंत आणि आदर्श शिंदे यांच्या दमदार आवाजाने अधिकच रंगत आणली असून अमितराज यांनी संगीताला उर्जा आणि झिंग दिली आहे. या चित्रपटातील इतर गाण्यांना पंकज पडघन यांचे संगीत लाभले आहे. तर हे गाणे सचिन पाठक यांनी लिहिले आहे.

'येरे येरे पैसा ३' या गाण्यातील सर्व कलाकारांची एनर्जी पाहून यंदाचा भाग आणखीन धमाल आणि मनोरंजनाने भरलेला असणार, याबद्दल कोणतीही शंका नाही.

या गाण्याबद्दल आणि चित्रपटाबद्दल सलमान खान म्हणतो, ह्यह्न हे गाणे अप्रतिम झाले आहे. गाण्यावरूनच चित्रपट काय जबरदस्त असेल याचा अंदाज येतोय. चित्रपटाची संपूर्ण टीम जबरदस्त आहे. या सगळ्यांना माज्याकडून खूप शुभेच्छा आणि या चित्रपटाच्या चौथ्या भागात मला सहभागी व्हायला नक्कीच आवडेल.

■ ■ ■

# शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित सजना सिनेमाचा हृदयस्पर्शी ट्रेलर प्रदर्शित



प्रेमाच्या गंधाने सुरू झालेली एक सुंदर गोष्ट, जेव्हा नात्यांमध्ये गुंतते तेव्हा त्या निरागस प्रेमातूनच जन्म होतो एक आगीत भडकणारा सुड! मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळीच लाट घेऊन येत आहे सजना चित्रपटाचा हा ट्रेलर. जो नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे ट्रेलर हा केवळ एक साधा रिलीज नसून, तो एक खास प्रसंग ठरला आहे. या ट्रेलरचे थेट प्रक्षेपण मराठीतील विविध मनोरंजनशी संबंधित चॅनेलच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर लाईव्ह स्ट्रीम करण्यात आला.

म्हणजेच सजना चित्रपटाचा ट्रेलर मराठी एंटरटेनमेंट डिजिटल मीडिया नेटवर्कवर एकत्रितपणे थेट प्रक्षेपित करण्यात आला. ह्या ट्रेलर मध्ये सुंदर प्रेमाची सुरुवात, विचारसरणीतील अंतर, भावनिक संघर्ष, सुडाची भावना आणि प्रत्येक वळणावर धक्कादायक ट्विस्ट आपण पाहू शकतो.

शशिकांत धोत्रे आर्ट निर्मित आणि प्रस्तुत सजना सिनेमातील ह्या ट्रेलर मध्ये नायक आणि नायिकेच्या आयुष्यात येतात अनेक संघर्ष. मैत्रीचं प्रेमात रूपांतर, प्रेमाचं तुटणं आणि त्यातून उगम पावणारा सुड हे सगळं अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आलं आहे. प्रत्येक वळणावर गोष्ट बदलते, पात्रांचे रंग बदलतात आणि कथा एका अनपेक्षित शेवटाकडे प्रवास करते. शेवट अकल्पनीय आहे.

जेव्हा प्रेक्षकांना वाटतं की सर्व काही संपलं, तेव्हाच ही कथा घेते एक अनपेक्षित वळण, जे तुमचं मन सुन्न करतं. त्यामुळे एक विलक्षण सिनेमॅटिक अनुभव सिनेप्रेमींना ह्या चित्रपटाच्या माध्यमातून मिळणार आहे. 'सजना' या चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. छायाचित्रण रणजित माने ह्यांनी केलं आहे. संगीत ओंकारस्वरूप ह्यांचं असून सिनेमातील रोमान्टिक गाणी भुंगा म्युझिकच्या बॅनरखाली बनले आहेत. सजना हा सिनेमा आपल्या जवळच्या चित्रपटगृहात २७ जून २०२५ पासून प्रदर्शित होणार आहे !!

■ ■ ■



## सन मराठी वाहिनीवर मंतरणार प्रेमाची जादू 'तुझ्यासाठी तुझ्यासंगं'

'सन मराठी' वाहिनीवर लवकरच तुझ्यासाठी तुझ्यासंगं या नव्या मालिकेतून एका नव्या प्रेमकथेचा रोमांचक प्रवास सुरु होतोय.

पहिल्या नजरेतल्या प्रेमाची नाजूक, निरागस आणि मनाला स्पर्श करणारी एक अनोखी कहाणी या मालिकेतून आपल्या भेटीस येणार आहे. नुकताच या मालिकेचा प्रोमो प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांनी या प्रोमोला भरभरून, उत्स्फूर्त, सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तेजा (अभिनेता अशोक फळदेसाई) आणि वैदेही (अभिनेत्री अनुष्का गीते) ही जोडी अनुक्रमे नायक नायिकेच्या रुपात या मालिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे.

पहिल्या नजरेतलं प्रेम खूप वेगळंच असतं. जिच्यावर प्रेम जडलंय तिला अंदाजही नसताना त्या व्यक्तीसाठी झुरत राहण्यात देखील मन आनंदी असतं. तेजाचं सुद्धा असंच काहीसं झालेलं आहे. तो पहिल्या नजरेत वैदेहीच्या प्रेमात पडला पण वैदेहीला या गोष्टीची अजिबात कल्पना नाही.

तेजाच्या प्रेम व्यक्त करण्याच्या रांगड्या आणि अनोख्या पद्धतीमुळे वैदेहीच्या मनात गैरसमज निर्माण होतो पण मालिका पाहणारी तरूण मात्र नक्कीच फिदा होईल.

जिद्दी, प्रेमळ, बंडखोर पण मनाने अत्यंत सच्चा अशा विरोधाभासाने भरलेला तेजा आणि ठाम, आत्मविश्वासू आणि बेधडक वैदेही असा प्रेमाचा हा सामना रंगणार आहे.प्रोमोमध्ये तेजाचं रांगडं व्यक्तिमत्त्व, आणि वैदेहीच्या प्रेमासाठी त्याची धडपड पाहून प्रेक्षक मालिका पाहण्यासाठी उत्सुक झाले आहेत.लवकरच प्रेक्षकांना प्रेमाची नवीन परिभाषा 'तुझ्यासाठी तुझ्यासंग' मालिकेतून पाहायला मिळणार आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मनपा निवडणुका एकोप्याने लढण्यावर अधिक भर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :



महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मात्र, नाशिक आणि रायगड येथील पालकमंत्री पदाचा तिढा सुटला नाही. यावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी भाष्य केले आहे.

तटकरे म्हणाले, मला इतर पक्षांची गरज आज संभावत नाही. शेकाप आणि त्यांच्या पक्षातील कोणत्याच नेत्याशी संवाद देखील नाही. आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका करताना युतीमध्ये सामंजस्य कसे राहील. तसेच या निवडणुका एकोप्याने कशा लढता येतील या संदर्भात चर्चा झाल्याची माहिती सुनील तटकरे यांनी दिली आहे.

महाराष्ट्रातील कोल्हापूर, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, राज्यात अनेक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महायुती करत आहे. त्यामुळे अटल सेतू, हार्बर लिंक, कोस्टल हायवे, मुंबई पुणे हायवे, वसई विरार कॉरिडॉर, समृद्धी महामार्ग असे मोठे प्रोजेक्ट करत असताना सरकारला कर्ज घ्यावेच लागते. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाला जरी कोल्हापूर आणि सांगली मधील शेतकऱ्यांचा विरोध असेल तरी त्याबाबत समन्वयाची भूमिका राज्य शासन घेईल.

लाडकी बहीण योजनेमुळे इतर विभागांना निधी पुरवला जात नसल्याची टीका विरोधकांकडून केली जात होती. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, निर्धारित वेळेत त्या त्या विभागाला निधी मिळेल. ३० जूनला होणाऱ्या अधिवेशनात याबाबतीत तिढा सोडविण्यात येईल. तसेच कर्जबामाफी, विद्युत माफीवर वित्त विभाग मान्यता देऊ शकत नाही, असे ते म्हणाले.

# सर्वपक्षीय नेत्यांकडून लोणीकरांचा समाचार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. २६ :

नरेंद्र मोदींनी तुझ्या बापाला पेरणीला सहा हजार रुपये दिले आहेत. तुझ्या अंगावरचे कपडे, आणि पायातील बुट चप्पल सुद्धा सरकारमुळेच आहे. असे वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर भाजप आमदार बबनराव लोणीकर यांच्यावर राज्यभरातील नेत्यांनी टीका केली आहे. इतकेच नाही तर आता लोणीकर यांना राज्यात फिरु देणार नसल्याचा इशारा देखील काँग्रेसने दिला आहे.

भाजप आमदार बबनराव लोणीकर यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे विरोधकांना आयते कोलीत मिळाले आहे. काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार यांच्यासह ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, अंबादास दानवे, सुषमा अंधारे यांनी देखील लोणीकरांचा समाचार घेतला आहे.

**मानसिक-वैचारिक दिवाळखोरी आणि नीतिमत्तेचा अभाव - सपकाळ**

मानसिक दिवाळखोरी, वैचारिक दिवाळखोरी आणि नीतिमत्तेचा अभाव या साऱ्यांचे प्रतिबिंब लोणीकर यांच्या एकंदर वक्तव्यातून स्पष्टपणे दिसून येत असल्याचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. लोणीकर यांना महाराष्ट्रात फिरु देणार नसल्याचा इशारा देखील काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

**लोणीकर महाराष्ट्रातील नागरिकांना लाचार समजतात - संजय राऊत**

बबनराव लोणीकर यांच्यासारखे लोक भाजपमध्ये आहेत. हे महाराष्ट्राने समजून घ्यायला हवे. ते लोक महाराष्ट्रातील नागरिकांना लाचार समजतात, जनता स्वाभिमानी आहे, लाचार नाही, हे लोणीकरांना समजले नाही. असे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

**त्यांना महाराष्ट्राने जागा दाखवायलाच हवी - विजय वडेट्टीवार**

शेतकऱ्यांचे कपडे, चपला, मोबाईल आमच्या पैशातून चालतात' ! भाजप मंत्र्यांचा हा उद्धटपणा आणि भाषा म्हणजे सत्तेची आलेली मस्ती आणि भाजपचा शेतकऱ्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन काय हे स्पष्ट करतो. माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी केलेले वक्तव्य म्हणजे शेतकऱ्यांचा अपमान आहे. त्यांना महाराष्ट्राने जागा दाखवायलाच हवी, अशा शब्दात काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी हल्ला चढवला.

सरकारी योजना या भाजपने स्वतःच्या खिशातून पैसे काढून दिल्यागत सांगणं ही महाराष्ट्रातील जनतेची थट्टा आहे. हे पैसे जनतेचे आहेत, त्यात महायुतीच्या मंत्र्यांच कर्तृत्व म्हणजे धनादेश वाटताना फोटो काढून घेणं! सत्ताधाऱ्यांनो लक्षात ठेवा तुम्ही आज सत्तेत आहात ते शेतकरी आणि जनतेच्या मतांमुळे, आणि तोच शेतकरी गरज पडल्यास तुमचं मूल्यही शून्यावर आणू शकतो, असेही वडेट्टीवार म्हणाले.

**आमच्या मतावर तू व तुझा बाप पण निवडून येतो - कडू**

'प्रहार'चे नेते बच्चू कडू यांनी अतिशय शेलक्या शब्दांत बबनराव लोणीकर यांचा समाचार घेतला आहे. ते आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हणतात, 'आमच्या घामाच्या पैशावर देश चालतो, अन्नधान्य आम्ही पिकवतो, आमच्या मतावर तू व तुझा बाप पण निवडून येतो. अन आमचा बाप काढतो, जगाचा बाप शेतकरी आहे, अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी नोंदविली.

**यांचे बोल मतदारांनी लक्षात ठेवावे - अंबादास दानवे**

उद्धव ठाकरे गटाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी देखील लोणीकर यांच्यावर टीका केली आहे. तुमचे कपडे, बूट, विधानसभेतील स्थान देखील जनतेमुळे असल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर निवडणूक येत आहेत, त्यामुळे यांचे हे बोल मतदारांनी लक्ष्यात ठेवावे, असे आवाहनही दानवे यांनी केले आहे.

**पाठीचा कणा हरवलेले लोणीकरांसारखे कळपाने सापडतील - सुषमा अंधारे**

बबनराव हे वागणं बरं नव्हं.. तुमचा आत्मसन्मान खुशाल गहाण ठेवा. जनतेचा आत्मसन्मान मात्र शाबूत आहे. जनता कष्टाने कमवून खाते तुम्ही भ्रष्टाचार करून खाता. सत्ताधाऱ्यांना कुर्निसात करताना खुशमस्करे नेत्यांची संख्या वाढत चाललीय. पाठीचा कणा हरवलेले लोणीकरांसारखे कळपाने सापडतील, अशा कठोर शब्दात उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी बबनराव लोणीकरांचा समाचार घेतला आहे.

नागपूर महासागर वृत्तसागर

■ शुक्रवार, दि. २७, जून २०२५ ■

# ओरियन स्पा मधील देहव्यापारावर धाड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखा (एसएसबी)ने प्रतापनगर ठाण्यांतर्गत त्रिमूर्तीनगर परिसरातील ओरियन स्पामध्ये धाड टाकून देहव्यापाराचा पदार्फाश केला. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे, तर महिला आरोपी फरार असून पोलिस तिचा शोध घेत आहेत. तौसिफ करीम शेख (26) रा. बंगाली पंजा, मस्कासाथ असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पार्वती उर्फ पिंकी थापा असे फरार महिलेचे नाव आहे.

त्रिमूर्तीनगरच्या मुस्कान वर्षा अपार्टमेंटमधील ओरियन स्पा सेंटरमध्ये देहव्यापार सुरू असल्याची माहिती एसएसबीला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंटरला ग्राहक बनवून तेथे पाठवले. तेथे पंटर ग्राहकाला 2 तरुणी दाखविण्यात आल्या. सौदा ठरताच पंटरने पोलिसांना इशारा दिला. दबा धरून असलेल्या पथकाने इशारा मिळताच स्पामध्ये धाड टाकली. तौसिफ पोलिसांच्या हाती लागला. चौकशीत त्याने पिंकी थापासोबत मिळून कुंटणखाना चालवत असल्याची माहिती दिली.

दोन्ही पीडित तरुणींना पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपी तौसिफकडून दोन मोबाईल फोन, रोख 4,500, डीव्हीआर आणि इतर साहित्यासह 37,590 रुपये किंमतीचा माल जप्त केला.

आरोपींविरुद्ध प्रतापनगर ठाण्यत पीटा ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फरार पिंकीचा शोध सुरू आहे. आरोपीला पुढील चौकशीसाठी प्रतापनगर पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे. ही कारवाई पोनि गजानन गुल्हाने आणि त्यांच्या पथकाने केली.

## २७ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांमुळे मनपाच्या आरोग्यसेवेत भर

# 3 लाख ६९ हजार रुग्णांनी घेतला लाभ

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २६ :

आरोग्य म्हणजे संपत्ती आहे. आपले चांगले आरोग्य ही आपल्या जीवनाची खरी संपत्ती आहे, जी आपल्याला चांगले शरीर आणि मन देते आणि सर्व आव्हाने हाताळून आपल्याला संपूर्ण जीवनाचा आनंद घेण्यास सक्षम करते. चांगले आरोग्य, चांगले मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्य वाढवते. अशात नागपूर महानगरपालिका ही संपूर्ण नागपूर शहरात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहे.




मनपा अंतर्गत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आता २७ आयुष्मान आरोग्य मंदिरांची भर पडली आहे. या केंद्रांचे लोकार्पण राज्याचे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

नागपूर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत सर्वसामान्य जनतेला उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यास तत्पर आहे. यात केंद्र शासनाकडून १५ वित्त आयोग निधी अंतर्गत नागपूर शहराकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकूण ११३ आयुष्मान आरोग्य मंदिर अर्थात आरोग्यवर्धिनी केंद्राची मान्यता प्राप्त आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये ३ लाख ६९ हजार ५६६ रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला आहे. नागरिकांना मोठ्या संख्येत या आरोग्य सुविधांचे लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महानगरपालिका अंतर्गत एकूण ५२ आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू आहेत. यात आता २७ आयुष्मान आरोग्य मंदिरे, आशीनगर झोन अंतर्गत पंचशील नगर, एसआरए वंजारा, शेंडे नगर व-HWC, सुदाम नगर, सहयोग नगर, नारी रोड. धंतोली झोन अंतर्गत भीम नगर, सुयोग नगर/संत साईकृपा सोसायटी, धरमपेठ झोन अंतर्गत बुटी, अंबर कॉलनी, दाभा रोड. हनुमान नगर झोन अंतर्गत सिद्धेश्वर टोली/माँ दुर्गा नगर, साई नगर. लकडगंज झोन अंतर्गत वाजपेयी नगर,चिखली,नवकन्या नगर, ओम साई नगर, जुना कामठी रोड, शास्त्रीनगर, लक्ष्मीनगर झोन अंतर्गत एकात्मता नगर, मंगळवारी झोन अंतर्गत जाफर नगर, एसआरए मार्टिन नगर, नेहरूनगर अंतर्गत जुनी सुकरावरी, हसनबाग, जय दुर्गा नगर, सतरंजीपुरा झोन अंतर्गत व्ही एच बी कॉलनी, शांती नगर, बंगाली पंजा, अण्णाभाऊ साठे, के.जी. नगर, वैशाली नगर जनसामान्यांपर्यंत प्राथमिक आरोग्य सेवा पुरवतील.

आयुष्मान आरोग्य मंदिरांत सर्व सेवा मोफत दिली जात आहे. जसे की, प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनात्मक आणि उपचारात्मक सेवा, सर्वेक्षण, बाह्यरुग्ण सेवा, गरोदरपण आणि बाळंतपणातील काळजी, नवजात शिशु आणि बाळांच्या आरोग्य सेवा, बालपण आणि किशोरवयीन आरोग्यसेवा, कुटुंब नियोजन गर्भनिरोधक सेवा आणि इतर रिप्रोडक्टिव आरोग्यसेवा, सामान्य संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन आणि बाह्य रुग्ण, तीव्र साध्य आजारांसाठी आणि किरकोळ आजारांसाठी काळजी, असंसर्गजन्य रोगांची तपासणी प्रतिबंध नियंत्रण आणि व्यवस्थापन, सामान्य नेत्ररोग आणि इ.एन.टी. समस्यांसाठी काळजी, मूलभूत मौखिक आरोग्य सेवा, वृद्ध आणि उपशामक आरोग्य सेवा,भाजने आणि अपघात यासह आपत्कालीन वैद्यकीय सेवा, मानसिक आरोग्य आजारांची तपासणी आणि मूलभूत व्यवस्थापन, योग आणि वेलनेस सेवा दिली जाते. यासोबतच आवश्यक निवडक रक्त तपासणी ही HLL मार्फत केली जाईल.

महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, अति.आयुक्त श्रीमती वासुमना पंत, यांचे मार्गदर्शनाखाली वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर व अति. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांनी आरोग्य विभाग द्वारे आरोग्य केंद्र सुरु करून नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्याबाबत कार्य केले आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कक्ष यांनी याकरिता कामकाज केले.

# मंदिर परिसरातील विहीर गेली चोरीला

■ महासागर प्रतिनिधी,

काटोल, दि. २६ :

शहरातील पुरुषोत्तम महाराज मंदिर परिसरातील जुन्या सार्वजनिक विहिरीवर खासगी व्यक्तीने कब्जा केल्याच्या निषेधार्थ परिसरातील नागरिकांनी बुधवारी मूक आंदोलन करून नगरपालिकेकडे विहीर मोकळी करण्याची मागणी केली.



लहानपणापासून आम्ही ही विहीर सार्वजनिक म्हणून पाहत आलो आहोत. नगर पालिकेच्या रेकॉर्डमध्येही ती मालकी असल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे तिच्यावर झालेले अतिक्रमण पालिकेने ने दूर करून ती सर्वसामान्य नागरिकांसाठी खुली करणे आवश्यक आहे.
**जितेंद्र तुपकर, माजी उपाध्यक्ष, न. प. काटोल**

काटोल शहरातील सिटी सर्व्हे क्र. ८८८ ही जागा १९७१च्या अभिलेखानुसार काटोल नगरपरिषद मालकीची आहे. या सर्व्हे क्रमांकात असलेली विहीर अनेक वर्षांपासून सार्वजनिक वापरात होती. मात्र, २०१५ साली स्थानिक उपअधीक्षकांनी योग्य मौका चौकशी न करता आणि तत्कालीन जिल्हा उपाध्यक्षांच्या आदेशाची अवहेलना करत, सदर जागा शेजारील अरुण साठोणे यांच्या मालकीची असल्याचे नोंदविले.

त्यामुळे ही जागा आणि विहीर साठोणे यांच्या खासगी मालकीत गेली. त्यानंतर त्यांनी विहिरीवर ताबा घेत ती खासगी घोषित केली. या परिसरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात धार्मिक उत्सव होतात. याशिवाय घनदाट लोकवस्तीमुळे पाण्याची टंचाईही जाणवते. अशा वेळी ही सार्वजनिक विहीर वापरासाठी खुली ठेवण्याची गरज आहे.

त्यामुळे नागरिकांनी काटोल नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत विहीर मोकळी करून सार्वजनिक वापरासाठी खुली करण्याची मागणी केली.

नागरिकांच्या तक्रारीनंतर नगरपालिकेने भूमी अभिलेख कार्यालयाकडे अर्ज केला होता. बुधवारी संबंधित जागेची मोजणी नागरिक, गैरअर्जदार व पोलिस प्रशासनाच्या उपस्थितीत पार पडली. भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी मोजणीचे पॉइंट्स घेतले असून, लवकरच आखिव पत्रिका उपलब्ध होणार आहे. त्यानंतर ही जागा कोणाच्या मालकीची आहे, हे स्पष्ट होईल व त्यानुसार नगरपालिका आवश्यक कारवाई करणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

# अश्लील फोटो, व्हीडीओ पाठवून ४९ लाखांनी लुटले

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २६ :

दहावी अनुत्तीर्ण परंतु फसवणूक करण्यात पारंगत असलेल्या ठकबाजाने एका मुलीचा अश्लिल व्हीडीओ पाठवून नागपुरातील युवकाची 49 लाखांनी फसवणूक केली. सायबर पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने आरोपी निष्पन्न करून बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातून त्याला अटक केली आहे. सुंदरकुमार कुंदनकुमार (19) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला 28 पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक लुट करणारी टोळी देशभरात सक्रीय असून या टोळीत आणखी किती लोक आहेत, या दिशेने पोलिस तपास करीत आहेत.

सोनेगाव ठाण्याच्या हद्दीतील फिर्यादी विवेक (काल्पनिक नाव)याचे बीएसस्सीपर्यंत शिक्षण झाले आहे. त्याची आर्थिक स्थिती भक्कम आहे. तो एका खाजगी कंपनीत कामाला होता. अलिकडेच म्हणजे एप्रिल महिन्यात इंस्टाग्रामवर त्याला एक फ्रेन्ड रिक्वेस्ट आली. ती एका तरुणीची होती. सुंदर फोटो पाहून विवेकने फ्रेन्ड रिक्वेस्ट स्वीकारली. अश्लील चॅटिंग आणि संभाषणामुळे विवेक हा आरोपीच्या जाळ्यात अडकत गेला. आरोपीने त्याला न्यूड व्हीडीओ पाठवले. तसेच विवेकनेही स्वतःचे न्यूड फोटो पाठवले. विवेक जाळ्यात अडकताच आरोपीने ते व्हायरल करण्याची धमकी देऊन वेगवेगळ्या बँक खात्यात तब्बल 49 लाख रुपये ट्रांसफर करून घेतले. विवेकने बदनामी होण्याच्या भीतीने फोटो, व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देत होता. शेवटी कंटाळून विवेकने सोनेगाव पोलिसात तक्रार दाखल केली.

### सायबर पोलिसांचे प्रयत्न

या प्रकरणाचा तपास सायबर पोलिसांकडे देण्यात आला. पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, उपायुक्त लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलिस निरीक्षक बळीराम सुतार आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक तपास करून आरोपी निष्पन्न केले. सायबरच्या पथकाने पूर्णियाला जावून आरोपीला अटक केली. एकूण 17 बँकातील 15 लाखांची रक्कम गोठविण्यात आली. तसेच ज्यांच्या बँक खात्यात रक्कम पाठविण्यात आली, अशा काही युवकांनी 10 लाख रुपये देण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे विवेकला जवळपास 25 लाख रुपये परत मिळतील.

**आरोपी बोलायचा मुलीच्या आवाजात**

आरोपी सुंदरकुमारने स्वतःच्या मोबाईलवर एका सुंदर युवतीचा डीपी लावला. त्यामोबाईलवरुन विवेकला मैत्रीसाठी रिक्वेस्ट पाठविली. विवेकसोबत त्याने अश्लील चॅटिंग आणि संभाषण सुरू केले. तो अगदी मुलीच्या आवाजात विवेकशी बोलत होता. मात्र मधूर आवाजात हॅलो म्हणणारी ती नसून तो असल्याचे विवेकला कळलेच नाही. त्याला वाटायचे की चॅटिंग करणारी आणि व्हीडीओ पाठविणारी मुलगीच आहे.

# देयकांच्या वेळेत निपटारा करण्यासाठी महालेखाकार कार्यालयाशी सुसंवाद महत्त्वाचा : सुहासिनी गोतमारे

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २६ :

महालेखाकार कार्यालयाशी निगडीत विविध शासकीय आस्थापनाकडून जी देयके सादर केली जातात त्या देयकांचा निपटारा वेळेत होण्यासाठी त्यात असलेल्या त्रूटी वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. यासाठी सुसंवादावर अधिक भर देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महालेखाकार सुहासिनी गोतमारे यांनी केले. महालेखाकार कार्यालय आणि सहसंचालक, लेखा व कोषागारे नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रलंबित संक्षिप्त देयकांचे तपशीलवार देयके आणि उपयोगिता प्रमाणपत्राची संख्या कमी करण्यासाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

डिजीटलायजेशन ऑफ सर्व्हिसचा वापर करुन लोकभिमुख सेवा देण्यास मोलाची मदत झाली आहे. शासनाच्या विविध कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी व कोषागार कार्यालयांनी महालेखाकार कार्यालयाशी योग्य संवाद ठेवला पाहिजे. प्रलंबित संक्षिप्त देयकांबाबत शासकीय नियमानुकुलता तपासतांना या संवादातून असलेल्या त्रृटी तात्काळ मार्गी लागतील. तपशीलवार देयके आणि उपयोगिता प्रमाणपत्राची संख्या यातून प्रलंबित राहणार नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महालेखाकार कार्यालयात प्रस्तावित असलेले बदल व त्यानुषंगाने महालेखाकार कार्यालयाची बदलत्या भुमिकेबद्दल श्रीमती गोतमारे यांनी माहिती दिली.

या कार्यशाळेला वरिष्ठ उपमहालेखापाल जितेंद्र गुप्ता, लेखा व कोषागारे विभागाच्या सहसंचालक ज्योती भोंडे, वरिष्ठ कोषागार अधिकारी मोनाली भोयर, सहायक संचालक गजानन हिरुळकर, अपर कोषागार अधिकारी प्रदीप कनेरे आणि नागपूर विभागातील सर्व कोषागार अधिकारी आणि आहरण संवितरण अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेत प्रारंभी महालेखाकार सुहासिनी गोतमारे यांचे स्वागत सहसंचालक ज्योती भोंडे यांनी केले.

# सरन्यायाधीश गवई यांचा आज डीबीएतर्फे सत्कार

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २६ :



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा उद्या शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता जिल्हा वकील संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. जिल्हा न्यायालय परिसरात हा कार्यक्रम होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिपांकर गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे, न्यायमूर्ती अतुल चांदुरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध्ये, वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी गवई यांच्या हस्ते नवीन विस्तारित इमारतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण, संविधान उद्देशिकेचे उदघाटन, नुतनीकरण संगणकीकृत ग्रंथालय व कार्यालयाचे उदघाटन करण्यात येईल.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे आणि सहसचिव ॲड. मनिष रणदिवे यांनी केले आहे.

## ५१८५ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 5,185 वाहन चालकांवर कारवाई करून 4,27,150 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 4 प्रकरणात 4 आरोपींवर कारवाई करून 92,290 रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये 1 प्रकरणात 2 आरोपींवर कारवाई करून 1,000 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

## अवैध हत्यार बाळगणाऱ्या युवकास अटक

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान , दि. २६ :

कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने टेकाडी पुला लगत चायनीसचे दुकाना जवळ अवैध हत्यार बाळगणाऱ्या युवकास अटक करुन गुन्हा दाखल केला आहे. बुधवार (दि.२५) जुन रोजी सायंकाळी चार वाजता पोलीस डीबी पथक पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि टेकाडी पुलालगत सार्वजनीक ठिकाणी हातात चाकु घेवुन फिरत आहे. अशा माहिती वरुन पोलीसांनी चायनीसच्या दुकाना जवळ जाऊन पाहणी केली असता एक युवक दिसुन आला. पोलीसांनी रामकृष्णा नत्थु कठाने (३३) रा.गोंडेगांव याची अंगझडती घेतली. त्याचा कमरेत एक मोठा चाकु सारखे लोखंडी हत्यार ज्याला एका बाजुनी धार असलेला मिळुन आला. युवकाला हत्यार बाळगण्या बाबत परवाना विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितल्याने पोलीसांनी युवकाला अटक करुन त्याचा जवळुन हत्यार जप्त केला.

## अनुकंपा नियुक्तीत झालेला भ्रष्टाचार बाहेर काढा

# विमाशि संघाचे शिक्षण उपसंचालकांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी

वाडी, दि. २६ :



नागपूर विभागात अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेत झालेल्या कथित भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याच्या मागणीचे निवेदन शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर यांना विमाशि संघाचे नागपूर महानगर कार्यवाह अविनाश बडे यांच्या नेतृत्वात कार्याध्यक्ष अरुण कराळे, कोषाध्यक्ष गंगाधर पराते, उपाध्यक्ष यशवंत कातरे, रामचंद्र उमाठे, पी. ढेपे, विलास कांबळे, जिवक वाघमारे यांनी गुरुवार २६ जुन रोजी दिले. एस.एम.आर. हिंदी भाषिक संघ हायस्कूल, कॉटन मार्केट, नागपूर येथे शिपाई पदावर कार्यरत असलेले रवी देवराव पडोळे यांचे दिनांक २ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात वारस असलेल्या अभिलाष रवी पडोळे यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू होते.

सदर संस्थेच्या चार शाळांमध्ये (लक्ष्मीदेवी धिरन कन्या विद्यालय, मदन गोपाल अग्रवाल हायस्कूल, सुवतीदेवी झुनझुनवाला हायस्कूल आणि एस.एम.आर. हिंदी भाषिक संघ हायस्कूल) लिपिक पद रिक्त असतानाही, त्यांना या संस्थेमध्ये न घेता राष्ट्रीय माध्यमिक हिंदी विद्यालय, अंबाझरी, डिफेन्स येथे लिपिक पदावर नियुक्त करण्यात आले. विशेष म्हणजे, ही शाळा दुसऱ्याच संस्थेच्या अखत्यारीत आहे.

संस्थेतील पद रिक्त असताना देखील, संस्थाचालक अनिल अग्रवाल व तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रविंद्र काटोलकर यांनी संगनमत करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास येत आहे.विशेषतः एम.एम.आर. हिंदी भाषिक संघ हायस्कूल ही शाळा ३१ जुलै २०२३ रोजी बंद करण्यात आली असून, तेथील कनिष्ठ लिपिक पद ३० ऑक्टोबर २०१६ पासून रिक्त होते, हे लक्षात घेता प्रश्न अधिक गंभीर ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर, ऑगस्ट २०२१ ते मार्च २०२४ या काळात तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी अनुकंपा तत्वावर दिलेल्या सर्व नियुक्त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच, लक्ष्मीदेवी धिरन कन्या विद्यालय सोसायटीसारख्या अल्पसंख्यांक संस्थेच्या कारभाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

या प्रकरणामुळे शैक्षणिक व्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, लवकरात लवकर चौकशी करून न्याय मिळावा, अशी संबंधित कुटुंबीयांची व नागरीकांची अपेक्षा आहे. निवेदनाची प्रतिलिपी शिक्षण आयुक्त (पूणे) यांना देण्यात देण्यात आली.

## आ. समीर मेघे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)च्या

# जिल्हा परिषद सदस्य रश्मी कोटगुले यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी

हिंगणा/वाडी, दि. २६ :



हिंगणा तालुक्यातील डिगडोह (देवी) येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) च्या माजी जिल्हा परिषद सदस्य रश्मी धनराज कोटगुले, माजी ग्रापं सदस्य प्रदीप कोटगुले, माजी ग्रा पं सदस्य राहुल पांडे, माजी ग्रा पं सदस्य मंगला रडके, माजी ग्रा पं सदस्य हर्षलता मेश्राम, ग्रा पं सदस्य चंद्रमती चतुर्वेदी, ग्रा पं सदस्य गीता चतुर्वेदी, नरेश कोटगुले यांचा भाजप मध्ये पक्षप्रवेश झाला.

त्यांच्या सोबत प्रवेश घेणाऱ्या मध्ये रीना सिंह, सरोज तिवारी, सचलता पांडे, इन्दु पांडे, मोना पांडे, झारिया कोशल्या, सैफिया तिवारी, पिंकी सिंह, रीता सिंह, पूनम तिवारी, नीलम बिछवाहरी, मीनल तिवारी, उषा तिवारी, सबा तिवारी, चांदनी शर्मा, हेमा गिरी, मीना पांडे, पायल पटले, कविता बोई, वीणा वाघ, ममता पटले, पमिला अंडो, नेहा कोटगुले, मन्या खालरे, प्राची कोटगुले, सुनिता शाक्य, सुलभा राठोड, मल्लिका भारती, कंचन प्रजापती, ज्योती सिंह, मृदुली शर्मा, चिन्ता तिवारी, ऋतुजा भुंडरे, हर्षलता मसराम, क्रितीना भुसाटे, के. के. मसराम, स्वप्निता पांडे, सुरभी तिवारी. परेश सिंह, मयंक सिंह, सत्यप्रकाश तिवारी, गोपाल तिवारी, प्रवीण कुमार, अमित चनोडे, गोपाल राठोड, निखिल पांडे, स्वप्निल यादव, प्रकाश सिंह, गौतम कांबळे, सुशिल तिवारी, राजकुमार इंगळे, अभी घोंडले. नितेश राठोड, पंकज यादव, जैन पांडे, सुरेन्द्र पांडे, मिराज चतुर्वेदी, रफान यादव, अजय मौर्य, रविन्द्र कामती, बासमतताई, अमन शेख, कृष्णकांत तिवारी, राहुल, भुषण शर्मा, विपिन शर्मा, मनोज तिवारी, संजय कंबळे, मयंक कोटगुले, राहुल चौधरी, निखिल सिंह, नितेश तिवारी, विनीत यादव, दीपक मिश्रा, परवेज कोटगुले, सुनील शर्मा, राजीव झा, संदीप मिश्रा, फैजल शेख, शुभम शर्मा, अभिषेक चतुर्वेदी, आदित्य चतुर्वेदी, यशवंत कोटगुले या सर्व कार्यकर्ते यांनी प्रवेश घेतला.

तेव्हा सर्वांचे यावेळी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी संध्या गोतमारे, उज्वला बोढारे, अर्चना गिरी, सुचिता ठाकरे, अंबादास उके, सुरेश काळबांडे, विनोद ठाकरे, महेश लोखंडे, कैलाश गिरी, चेतनलाल पांडे, सतीश शाहाकार, कृपाशंकर गुप्ता, आदर्श पटले, विवेक झा, लिलाधर पटले, ॲड. जिवन शुक्ला, हबलु चतुर्वेदी, राजेश बोरकर, नितीन काळे, नितीन साखळे, डॉ. हरिणखेडे, लिलाधर पटले, अजय घवघवे सौरभ झा आदी उपस्थित होते.

## सूक्ष्म सिंचन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २६ :

कृषि विभागामार्फत नागपूर जिल्ह्यात राष्ट्रीय कृषि विकास योजना सन २०२५ - २६ साठी राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन या बाबीखाली तुषार संच, ठिबक संच, रेनगन, सेमी परमनंट इरिगेशन सिस्टीम यांचा समावेश आहे. तालुका स्तरावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवगार्तील लाभार्थी करिता १५ ते ३० जून या पंधरवड्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

तरी इच्छूक शेतकऱ्यांनी आपले फार्मर आयडी, ७/१२ नमुना, ८अ, जातीचे दाखला, आधार क्रमांक (मोबाईल क्रमांक ला लिंक केलेले मोबाईल क्रमांक), बँक पासबुकसह तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कार्यालयाशी किंवा कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र मनोहरे यांनी शेतकऱ्यांना केले आहे. या लिंक वर जाऊन अर्जदार अर्ज करून शकतात.

# वाडीच्या समस्यांसंदर्भात भाजपा वाडी मंडळाकडून मुख्याधिकारी ऋचा धाबर्डे यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २६ :

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाडी परिसरातील विविध नागरी समस्या लक्षात घेता सोमवार २३ जुन रोजी सकाळी ११ वाजता भाजपा वाडी मंडळातर्फे नगर परिषद वाडीच्या मुख्याधिकारी डॉ.ऋचा धाबर्डे यांना निवेदन देण्यात आले.

वाडी परिसरातील मंगलधाम सोसायटी, स्मृती लेआऊट, रामकृष्ण नगर, दौलतवाडी, वैष्णवमाता नगर, सत्यसाईबाबा सोसायटी, विकास नगर, शुभारंभ सोसायटी, शाहू लेआउट, कोहळे लेआउट आणि समर्थ गजानन सोसायटी अशा अनेक वस्त्यांमध्ये नाल्यांवरील चेंबरची झाकणे तुटलेली आहेत. पावसाळ्यात नाल्यांत पाणी तुडुंब भरते आणि त्यामुळे लहान मुले व वृद्ध नागरिक यांना अपघाताचा धोका निर्माण होतो. त्यामुळे संबंधित दुरुस्ती कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी करण्यात आली.

तसेच अमरावती रोड, दत्तवाडी ते रामकृष्ण हॉल ते खडगाव रोड या मार्गावर सीसी रोड, पेव्हिंग ब्लॉक, भूमिगत नालीचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले. पावसाळ्यात साप, विंचू रस्त्यावर येतात, तर अनेक ठिकाणी रस्त्यांवर दिवे बंद असतात किंवा खांबावर दिवेच नाहीत. त्यामुळे बंद लाईट दुरुस्त करणे व नवीन लाईट बसविण्याची मागणीही करण्यात आली.

या निवेदनावर मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांनी आठवड्याभरात कामे पूर्ण करण्याचे मौखिक आश्वासन दिले. या वेळी माजी उपसरपंच आनंदबाबू कदम, अभिजीत जोशी, राजुताई भोले, भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष कैलाश मंथापुरवार, कल्पना सगदेव, ज्योती भोरकर, अक्षय तिडके, योगेश शेंडे, ज्ञानेश्वर गावंडे, दत्ता बाबर, लिलाधर भोयर, राहुल तायडे, जयंत वैद्य, मंगला पडोळे, संदीप लांजेवार तसेच भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विज्युक्टातर्फे डॉ. सावरकर आणि पटवे यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. २६ :

नव्यानेच रूजू झालेल्या नागपूर विभागाच्या शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर आणि नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एन. पटवे यांचा विदर्भ ज्युनियर कॉलेज टीचर्स असोसिएशनच्या वतीने (विज्युक्टा) सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विज्युक्टाचे महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर यांच्या उपस्थितीत डॉ. सावरकर आणि डॉ. पटवे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तुमसर (जि. भंडारा) येथील नगरपरिषद कनिष्ठ महाविद्यालय येथील शिक्षकांना मागील चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांना लवकरात लवकर वेतन देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात विभागीय उपसंचालक डॉ. सावरकर यांना निवेदन देण्यात आले. याशिवाय नागपूर शिक्षण मंडळाचे सहसचिव रवींद्र काटोलकर यांची यवतमाळचे जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून निवड झाल्याने त्यांनाही शुभेच्छा देण्यात आल्या.

# न्यायमूर्ती गवई यांच्या विद्यापीठ भूषण प्रात्यक्षिकाचे उद्घाटन २९ जून रोजी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. २६ :

आम्हाला तुम्हाला कळवण्यास आनंद होत आहे की भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई हे इतर अनेक मान्यवरांसह २९ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे.

कायद्याचे भविष्य घडवणे - सरन्यायाधीशांच्या हस्ते एमएनएलयू नागपूरच्या प्रशासन ब्लॉकचे उद्घाटन भारताचे मुख्य न्यायाधीश आणि विद्यापीठाचे कुलपती न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांनी २९ जून २०२५ (रविवार) सकाळी १०:३० वाजता भारत सरकारचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी; महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती दीपांकर दत्ता; सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उज्जल भुयान; सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती प्रसन्न भालचंद्र वराळे; सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर; मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि विद्यापीठाचे प्र-कुलपती चंद्रशेखर बावनकुळे, कॅबिनेट मंत्री (महसूल), महाराष्ट्र सरकार यांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यास संमती दिली आहे.

न्यायमूर्ती नितीन डब्लू. सांबरे, प्रशासकीय न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ; आणि न्यायमूर्ती अनिल एस किलोर, न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ आणि विद्यापीठाच्या इमारत समितीचे अध्यक्ष; ॲड. तुषार मेहता, भारताचे सॉलिसिटर जनरल, प्रा.(डॉ.) विजेंदर कुमार, कुलगुरू आणि डॉ. रागिणी पी. खुबाळकर, रजिस्ट्रार विद्यापीठाची प्रशासकीय इमारत ही आधुनिक वास्तुकलेचा एक सुंदर आविष्कार आहे.

या इमारतीत कुलगुरू, कुलसचिव, उपकुलसचिव, परीक्षा विभाग, प्रॉक्टर, मुख्य वॉर्डन, अंतर्गत गुणवत्ता आणि हमी कक्ष, कायदा संग्रहालय, वित्त अधिकारी, अभियांत्रिकी विभाग, विद्यापीठ प्रेस आणि विद्यापीठाच्या इतर कार्यालयांचे बांधकाम जागतिक दर्जाचे आहे. ते नवीनतम तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत.

उच्च दर्जाच्या आणि पर्यावरणपूरक असलेल्या या इमारतीचे बांधकाम विद्यापीठाच्या प्रवर्तकांच्या दृष्टिकोनानुसार आहे आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यात वाढ करण्यासाठी खूप मदत करेल. आर्किटेक्चर पॅराडाइम, बंगळुरू येथील आर्किटेक्चर मनोज लद्दाड आणि आर्किटेक्चर पॅराडाइम, आर्किटेक्चर संदीप जे हे इमारतीचे शिल्पकार आहेत.

ही इमारत सुपर कन्स्ट्रक्शन कंपनी जेव्हीचे सुरेश पटेल यांनी सार्वजनिक बांधकाम क्षेत्र, नागपूरचे मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्या देखरेखीखाली बांधली आहे; सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूरचे अधीक्षक अभियंता जे.एच. भानुसे; सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूरचे अधीक्षक अभियंता (विद्युत); सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूरचे अधीक्षक अभियंता हेमंत पाटील; सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूरचे कार्यकारी अभियंता मनीष पाटील; लक्ष्मीकांत रौलकर, कार्यकारी अभियंता, विभाग-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर; आणि प्रशांत शंकरपुरे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर; न्यायमूर्ती अनिल एस. किलोर न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय आणि विद्यापीठ आणि महाराष्ट्र सरकारच्या इतर अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एमएनएलयू नागपूरची इमारत समिती.

# बेलदा येथे धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत शिबिराचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २६ :

रामटेक तालुका उपविभागिय महसूल विभागाच्या वतीने बेलदा येथे नुकतेच शिवाजी महाराज महाराजस्व आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ३१७ नागरिकांनी सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेतला.

अध्यक्षस्थानी रामटेक उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन होते. मुख्य मार्गदर्शक म्हणून रामटेक तहसीलदार रमेश कोळपे तर प्रमुख अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्या शांता कुमरे, जि.प.सदस्य सतीश डोंगरे, बेलदा ग्रा.पं. चे सरपंच स्नेहा उमेश भांडारकर, सरिता खंडाते, प्राचार्य सतीश छपाने उपस्थित होते. यावेळी ९० जणांना महसूल, ५५ जणांना पंचायत समिती, २३ जणांना कृषी विभाग, आठ जणांना भूमी अभिलेख, दोघांना महिला व बालविकास तसेच एकाला इतर विभागाचा लाभदेण्यात आला.

११२ नागरिकांच्या आरोग्याची मोफत तपासणी व चाचण्या करण्यात आल्या असून, १५ नागरिकांची आधार क्रमांक नोंदणी करण्यात आली.

याप्रसंगी उपविभागिय अधिकारी प्रियेश महाजन,तहसीलदार रमेश कोळपे, नायब तहसीलदार भोजराज बडवाईक,पुरवठा अधिकारी संदेश हलमारे, भुजाडे, राहुल काकडे, मुनेश बांगर, दिलीप रांचे, प्रशांत बेलसरे, प्रतीक बागडे, मनीष श्रीवास यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलिस पाटील व इतर कर्मचारी तसेच बेलदा, हिवराबाजार, खनोरा, टांगला, पिंडकापार, लोधा, सालई, वरघाट, पुसदा पुनर्वसन या गावांमधील नागरिक उपस्थित होते.

# मनपातर्फे परवाना धारकांना दिलासा

**नागपूर:** नागपूर महानगरपालिकेने बाजार विभागांतर्गत येणाऱ्या परवानाधारकांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत व चालू वापर शुल्क एकत्रित भरणाऱ्या मनपाच्या परवानाधारकांना शास्ती / दंड/व्याज रक्कमची ८० टक्के सूट दिली जाणार आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या यांच्या आदेशानुसार, शहरातील मनपाच्या परवानाधारकांना १६ जून ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत थकीत आणि चालू वषार्चे वापर शुल्क एकरकमी भरल्यास, संबंधित परवानाधारकांना शास्ती/ दंड/व्याज रकमेमध्ये ८० टक्के सूट दिली जाणार आहे. मनपाचे उपायुक्त मिलिंद मेश्राम आणि बाजार अधीक्षकांनी यासंबंधीचे आदेश जारी केले आहेत. मनपाच्या बाजार विभाग अंतर्गत येणारी दुकाने, ओटे किंवा इतर जागांच्या वापरासाठी महानगरपालिकेकडून वापर शुल्क आकारले जाते.

# ज्येष्ठ साहित्यिक, पद्मश्री मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. २६ :

अरण्य ऋषी, निसर्ग साहित्यिक पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाच्या वतीने आज दिनांक 27 जून रोजी सायंकाळी पाच वाजता श्रद्धांजली सभेचे विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात आयोजन करण्यात आले आहे. या सभेच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते हे असणार आहेत. या श्रद्धांजली सभेला साहित्यप्रेमींनी उपस्थित रहावे आणि मारुती चितमपल्ली यांना आदरांजली अर्पण करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कै बळीरामजी देवतळे हायस्कूल आष्टा येथे मुलांनी घेतला गोड जेवणाचा आस्वाद

■ महासागर प्रतिनिधी, बेला, दि. २६ :

जवळच्या कै बळीरामजी देवतळे हायस्कूलमध्ये प्रवेशोत्सवाचे निमित्ताने शालेय मुला मुलींना स्वादिष्ट गोड जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा आस्वाद विद्यार्थ्यांनी घेतला. पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक सतीश माटे, शिक्षक मनोज कोचे, प्रकाश पिडकलवार, स्वप्निल कापसे, ताराचंद अलाम, नेहा मेहर, मोहिनी झगडे,रामचंद्र ठाकरे, कर्मचारी दशरथ अतकर, संघर्ष बनकर, पाल प्रतिनिधी जनार्दन सुरकार, सुखदेव मसराम, जयश्री हरडे, फिरोज पठाण ( सोनेगाव लोधी) आदी मान्यवर उपस्थित होते. रंगरंगोटी करून शाळेचा कायापालट करण्यात आला. मुख्याध्यापकांनी प्रवेशोत्सव निमित्ताने विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

# कलावंतांसाठी पाच हजार रुपये मानधन योजना

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २६ :

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार सन्मान योजनेंतर्गत राज्यातील ज्येष्ठ कलावंत व साहित्यिकांना दरमहा ५ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. यासाठी पात्र लाभार्थींनी १ जुलै ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा लागणार आहे. कलावंताना मानधन मिळण्यासाठी जेष्ठ कलावंतांना विनवणी करावी लागत होती. आता ऑनलाईन अर्ज करावा लागणार असल्यामुळे खऱ्या कलावंताना न्याय मिळणार आहे. ही योजना कला व साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या व प्रत्यक्ष उपजीविका केवळ कलेवर अवलंबून असलेल्या कलाकारांसाठी आहे. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा कमी असावे. त्याचबरोबर अर्जदार कोणत्याही सरकारी मासिक पेन्शन योजनेचा लाभार्थी नसावा.

दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत शिथिलता देण्यात आली आहे. सर्वसामान्य कलाकारांसाठी वयोमयार्दा ५० वर्षे, तर दिव्यांग कलाकारांसाठी ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. तसेच, विधवा, परित्यक्ता, दिव्यांग व वयोवृद्ध कलाकारांना प्राधान्य दिले जाणार आहे. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

# आदर्श चौरसिया लेडीज क्लब तर्फे योग दिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. २६ :

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आदर्श चौरसिया लेडीज क्लब नागपूरने योग दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लेडीज क्लब नागपूरच्या अध्यक्षा मीरा राकेश चौरसिया यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थापक अध्यक्षा सरिता विजय चौरसिया, माजी अध्यक्षा शर्मिला गगन आणि अनुराधा अनुराधा नरेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत योग दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. बुक साईड योग प्रशिक्षक सोनिया अग्रवाल यांनी सर्वांना योगासने खूप चांगल्या प्रकारे करायला लावली आणि त्याचे महत्त्वही सविस्तरपणे सांगितले. कीर्ती यांनी सर्वांना सोनियाजींच्या परिचयाची माहिती दिली.

क्लबच्या वतीने अध्यक्षा मीरा चौरसिया यांनी कृतज्ञता व्यक्त केली. नेहा मुकेश यांनी स्वादिष्ट आणि निरोगी नाश्ता आणि फळांची व्यवस्था केली. योग दिनानिमित्त हा कार्यक्रम आनंदाने संपन्न झाला. मोठ्या संख्येने बहिणींनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

# भाजपा वाडी मंडळातर्फे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :

भारतीय जनसंघाचे संस्थापक, राष्ट्रभक्त विचारवंत, आणि 'एक देश-एक विधान' या ब्रीदवाक्याने देशासाठी बलिदान देणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त भाजपा वाडी मंडळातर्फे विशेष अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात आमदार समीर मेघे यांचे वाडी येथील संपर्क कार्यालयात डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पुष्प अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. 'जहां हुए बलिदान मुखर्जी, वह काश्मीर हमारा है' अशा घोषणांनी परिसर राष्ट्रभक्तीने न्हालून गेला. डॉ. मुखर्जी यांनी राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेसाठी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले. 'एक देश में दो विधान, दो प्रधान, दो निशान नहीं चलेंगे' या त्याच्या घोषणा आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात स्फूर्ती निर्माण करतात.

या अभिवादन कार्यक्रमाला भाजपा वाडी मंडळाचे अध्यक्ष कैलाश मंथापुरवार यांच्या नेतृत्वात अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी उपसरपंच आनंदबाबू कदम, अभिजीत जोशी, राजुताई भोले, कल्पना सगदेव, ज्योती भोरकर, मंगला पडोळे, अक्षय तिडके, योगेश शेंडे, ज्ञानेश्वर गावंडे, दत्ता बाबर, लिलाधर भोयर, राहुल तायडे, जयंत वैद्य, संदीप लांजेवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता देशभक्तिपूर्ण घोषणांनी झाली.

# पोलिस स्टेशनमधील बेवारस वाहने मोकळी होणार : पी.आय. आंधळे

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २६ :

नागपुर शहर परिमंडळ ५ अतंर्गत येणाऱ्या नविन कामठी पोलिस स्टेशन मधील विवीध कारणांमुळे बेवारस अवस्थेत असलेल्या वाहनांची संख्या ३२ च्या आसपास असल्याचे कळते. अशा बेवारस वाहनांची सुटका होणार असल्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक महेश आंधळे यांनी सांगितले.

येथिल काही वाहने अपघातग्रस्त तर काही वाहनांच्या मालकांनी न भरल्याने पोलिस स्टेशनच्या आवारात आहेत. तसेच चोरीच्या घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांचाही समावेश आहे. या पार्श्वभुमीवर ज्या नागरिकांची वाहने नवी कामठी पोलिस स्टेशन मधे जमा असतील त्यांनी त्वरीत आपल्या वाहनांची ओळख करुन संपुर्ण कागदपत्रासह पोलिस स्टेशनला हजर रहावे असे आवाहन पी आय महेश आंधळे केले आहे.

तसेच गुप्त विभागाचे अखिलेश ठाकुर यांनीही आवाहन केले. आवश्यक प्रक्रिया पुर्ण केल्यावर संबधीत नागरिकांना त्यांची वाहने सुरक्षीतपणे परत केली जातील. याकरिता आवश्यक कागद पत्रा ची पूर्तता करावी असे कळविण्यात आले आहे.


## सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १९/२०२५**

पेशी दिनांक: २८-०७-२०२५
प्रोसेस क्रं. ६४८/२०२५
दिनांक : २५-०६-२०२५

अर्जदार : १. श्रीमती पुस्तकला किसन मेश्राम, वय ७७ वर्षे,
२. वेदिका विलास मेश्राम, वय ०९ वर्षे, ३. मंथन विलास मेश्राम, वय १३ महिने,
सर्व रा. पो. धानला. तह. मौदा, जि. नागपूर
----- विरुध्द -----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : किसन कारू मेश्राम व विलास किसन मेश्राम

सदरहू अर्जदारांनी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII1827 अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. किसन कारू मेश्राम व विलास किसन मेश्राम, हे मौजा-धानला, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार किसन कारू मेश्राम व विलास किसन मेश्राम हयांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. किसन कारू मेश्राम यांचा मृत्यु दि. १७.०३.२०२३ रोजी व विलास किसन मेश्राम यांचा मृत्यु दि.१५.०९.२०१८ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर. मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक २८.०७.२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या पब्लिक /जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. २५-०६-२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
मौदा, जि. नागपूर

## सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. २०/२०२५**

पेशी दिनांक: २८-०७-२०२५
प्रोसेस क्रं. ६४७/२०२५
दिनांक : २५-०६-२०२५

अर्जदार : १. रामेश्वर जैरामजी ठवकर, वय ५९ वर्षे, मु. पो. धानला, तह, मौदा, जि. नागपूर
२. कल्पना प्रशांत तलेले, वय ४६ वर्षे, मु. ४६१-२७०१, गुज हाउसिंग बोर्ड, ब्लॉक नं. ४५३ ते ४६४, घंटी बस स्टॅण्ड, बापुनगर, अहमदाबाद, गुजरात
----- विरुध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : लक्ष्मीबाई जैरामजी ठवकर

सदरहू अर्जदारांनी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII1827 अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. लक्ष्मीबाई जैरामजी ठवकर, ह्या मौजा-धानला, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होत्या. अर्जदारांनी मयतदार लक्ष्मीबाई जैरामजी ठवकर हिचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. लक्ष्मीबाई जैरामजी ठवकर हिचा मृत्यु दि. २८.०९.२०२३ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर. मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक २८.०७.२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत या उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. २५-०६-२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
मौदा, जि. नागपूर


# भिवापूरचे फुफूस गावतलाव प्रदुषीत

भिवापूर हे जुने शहर असून प्राचीन तेची साक्ष देणारे पुरावे ठिकठिकाणी आजही दृष्टिक्षेपास येत आहे. असाच एक गावाच्या सौंदर्यात भर टाकणारा गावतलाव शहराच्या दक्षिण भागात आहे. हा तलाव म्हणजे गावाच फुफूसच आहे. कारण की या तलावा वरून जी हवा वाहते ती शुद्ध होवून आपसूकच हा गाव तलाव म्हणजे भिवापूर चे फु फूस म्हणून ओळखले जात आहे. मागील १५ दिवसा पुर्वी या मालगुजारी गाव तलावातील पाणी कमी करून मासे मारण्यात आले मेलेल्या मासे सडल्याने भिवापूर वासियांचा उग्र वासामुळे जीव गुदमरण्याचा प्रसंग नागरीकां वर आला होता. तलावा लगतच्या काही नागरीकांनी घर सोडत काही दिवस इतरत्र आश्रय घेण्याची वेळ त्याचेवर आली होती.

तलावा लगत राहत असलेले नागरीक चांगलेच बेचैन झाले होते. काहीनां उलट्या होवून तापही काढला. सदरचे प्रकरण स्थानिक वृत्तपत्रांनी उचलून धरले तेव्हाच ठेकेदार व नगरपंचायत प्रशासन जागे झाले. याबाबतची दखल आमदार संजय मेश्राम, उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण, तहसिलदार कल्याण कुमार डहाट यांनीही घटनास्थळी जावून दखल घेतली.

नगरपंचायत प्रशासन व ठेकेदाराला योग्य उपाययोजना करण्याची सुचना दिली. एका ठेकेदार ने शिंगाडा व मासेमारी करण्यासाठी हा तलाव तीन वर्षा करीता ठेक्याने घेतला. या तलावातील असलेली कल्पी प्रजातीचे मासे शिंगाड्याच्या वेलीला फस्त करीत मागील तीन वषार्पासून त्याचे कमालीचे नुकसान करीत होते. त्यामुळे यावर्षी गेडाम नामक ठेकेदाराला ठेका दिला. त्याने योग्य पद्धतीने नियोजन करून मासे मारायला पाहिजे होते. परंतु तसे न करता संपूर्ण पाणी इतरत्र सोडले. त्यामुळे हजारो च्या संख्येने असलेल्या कल्पी मासे सडले. त्यांचा त्रास तलावा वरून जोराने हवा वाहणाऱ्या लगत असलेल्यांना तसेच उत्तर भागात राहणाऱ्यांना झाला.

**शेतकरी बहादुरे यांची बहादुरी !**

नवेगाव देशमुख येथील सेवानिवृत्त क्लास वन अधिकारी यांनी मुंबई सारख्या शहरात उर्वरीत जिवन व्यतित न करता त्यानी गावाकडील शेतीकडे वळले आणि नाविण्य पूर्ण प्रयोग ते शेतात करून नावाप्रमणे शेतात राबु लागले. शेतकरी सम्राट बहादूरे यांनी आपल्या १५ एकर शेतात रासायनिक खताचा वापर न करता नैसर्गिकरीत्या व



**भिवापूर तालुका वार्तापत्र**
**राजु जांभुळे**

जैविक शेती प्राध्यान्य देत असून शेतात खजुर, संत्रा व मोसंबी, ड्रॅगन फुडची लागवड केली आहे. मागील तीन वर्षापुर्वी खजुराचे २५० झाडे लावली होती. शेतात ५०० संत्रा व ५०० मौसंबी या झाडाची लागवड करण्यात आली आहे. त्यांनी मित्राच्या मदतीने अरब अमिरात येथून आजवा जातीच्या खजुराच्या बिया मागवून त्याचे रोपटे तयार करून त्यांच्या कलमाची लागवड शेतात केली. खजुराच्या २५ झाडाला खजुराचे पिवळ्या व लाल गर्द रंगांचे खजुराचे फळ हाती आले असून याचा स्वाद चवदार व चविष्ट आहे. पुढील वर्षी या खजुराच्या झाडाला मोठया प्रमाणात उत्पादन होणार असून याबाबतची मार्केटिंग करण्यात येणार असल्याचे शेतकरी बहादुरे यांनी सांगितले. भिवापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालया मार्फत स्वर्गीय भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचा लाभ घेतला असून त्यांना कृषी यात्रीकरण योजने लाभ ते घेत आहे.

**नवा गडी नवा राज**

येत्या चार पाच महिन्यात जिल्हा परिषद , पंचायत समिती व भिवापूर नगरपंचायतीच्या निवडणूका होणार आहे. त्यामुळे आतापासून सर्व राजकीय पक्ष व नेत मंडळी कामाला लागले आहे. भारतीय जनता पक्षाने तालुकाध्यक्ष म्हणून श्रावण वराडे हा नविन चेहरा दिला आहे. त्यामुळे भाजपा शहराध्यक्ष पदी कुणाची वर्णी लागते याकडे सर्वाच्या नजरा लागल्या होत्या.

अखेर दि. २० जुनला आयोजीत कार्यक्रमात शहराध्यक्ष म्हणून अनिल समर्थ म्हणून याचे नाव घोषित करण्यात आले. तस हे नाव माजी आमदर सुधीर पारवे व माजी आमदार व भाजपा उपाध्यक्ष राजु पारवे यांनी संभाव्य नगरपंचायत निवडणूका समोर ठेवून फायनल केल्याचे बोलले जाते. ते मागील ७ वषार्पासून भाजपचे सक्रीय सदस्य असून भिवापूर शहर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कोरोना काळात चांगले काम केले होते.

# पर्यटन, संस्कृती आणि इतिहासाचा संगम

## पसायदान परिसर नव्या स्वरूपात सज्ज



■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. २६ :

निसर्गाच्या सान्निध्यात, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला पसायदान परिसर हा एक आगळावेगळा आध्यात्मिक व शैक्षणिक पर्यटनस्थळ म्हणून पर्यटकां करता सज्ज झाला आहे. नागपूरपासून केवळ ४० कि.मी. अंतरावर वडगाव येथील रामा डॅमजवळ मुंडले एज्युकेशनल ट्रस्टच्या पुढाकारातून साकारलेला हा परिसर आता विदर्भाच्या पर्यटन नकाशावर उठून दिसत आहे.

१२ एकर परिसरात उभारलेल्या पसायदान प्रकल्पातील २० फूट उंचीच्या ध्यानमंडपावरील भव्य ४० फूट उंचीची ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. छत्रपती शिवरायांच्या पुतळ्या समोर शिवनेरी, सिंहगड, रायगड, तोरणा, राजगड, सिंधुदुर्ग यांसारख्या छत्रपती शिवरायांच्या ऐतिहासिक किल्ल्यांच्या सुंदर प्रतिकृती,आणि मूर्ती स्वरूपात किल्ल्यांवर घडलेले विविध प्रसंग प्रख्यात कलाकार प्रफुल्ल माटेगावकर यांनी साकारल्या आहेत.

या परिसरात २०१९ साली विविध क्रांतिकारक आणि समाजसुधारकांचे म्युरल्स देखील सकरण्यात आले आहेत. ज्या मध्ये झाशीची राणी, बाजीराव पेशवे, संत रामदास स्वामी आणि तुकाराम महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. हेडगेवार, गुरूजी गोळवलकर, आणि स्वा. विर विनायक दामोदर सावरकर यांचा समावेश आहे. क्युआर कोड स्कॅन करा व जाणा किल्ल्याचा इतिहास परिसरात क्युआर कोड स्कॅन करून प्रत्येक किल्ल्याचा इतिहास ऑडिओद्वारे ऐकता येतो.

प्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले, विनय आपटे, राहुल सोलापूरकर आदींच्या आवाजात हे माहितीपूर्ण ओडिओ तयार केले गेले आहे. या प्रकल्पाचे लोकार्पण नव्याने १९ जानेवारी २०२० रोजी श्रद्धेय बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते आणि अमृत वक्ता विवेकजी घळसासी ह्यांच्या उपस्थितीत झाले होते.

प्रफुल्ल माटेगांवकर ह्यांनीच साकारलेली अयोध्येतील राम मंदिराची भव्य प्रतिकृती व रामायणातील प्रसंगांचे सादरीकरणही येथे करण्यात आले असून, हा परिसर विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीशी जोडणारा, विचारप्रवृत्त करणारा आहे.

विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी इथून आपल्या इतिहासाची ओळख घेऊन जावी, हेच पसायदान प्रकल्पामागील सुरवातीपासून प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे, असे प्रफुल्ल माटेगावकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. तसेच, नागपूरकर आणि परिसरातील शाळा, महाविद्यालयांनी शैक्षणिक सहलीसाठी पसायदान परिसराला भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आवश्यकते नुसार शुल्क घेऊन जेवणाची तसेच येण्या जाण्याची देखील येथे व्यवस्था करून देण्यात येईल.

या प्रकल्पाची संकल्पना कै. भय्यासाहेब मुंडले आणि अनुराधाताई मुंडले यांची असून, आर्किटेक्ट गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आली.

# श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये ऑपरेशन थंडरची जनजागृती



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :

येथील श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात ऑपरेशन थंडरची जनजागृती व प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.या सत्कार समारंभासाठी एमआयडीसी पोलिस निरीक्षक मिराशी ,सहाय्यक पोलिस निरिक्षक विजय धुमाळ उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून श्री मिराशी यांनी विद्यार्थ्यांना शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी कसे वागावे.याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच ऑपरेशन थंडर या अभिनव उपक्रमाबाबत पोलीस निरीक्षक यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. एमआयडीसी पोलीस उपनिरीक्षक श्री धुमाळ यांनी शालेय जीवनातील त्यांचा स्वतःचा अनुभव सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक राजेश बिडवाइक यांनी विद्यार्थ्यांची जडण घडण शालेय परिसरात कशी होते याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शाळेचे पर्यवेक्षक राजू वालदे उपस्थित होते.

संचालन संदीप उपासे यांनी केले. आयोजनासाठी शिक्षिका इंदिरा मोहतकर ,चव्हाण, विजया बोरकुटे, आखरे, खुशी गणवीर, किर्ती चौके, शिक्षक जयकिशोर जैस्वाल, सतीश जैस्वाल, विजय जैस्वाल, उमेश दडमल, स्वप्नील जैस्वाल, अशोक जांभळे, विवेक चौधरी, प्रा. अशोक डोंगरकर, प्रा. सुधाकर लडके, प्रा. बलदेव राठोड, दिलीप तळहांडे यांनी सहकार्य केले.

# संत गाडगेबाबा हायस्कूलमध्ये नवागतांचे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २६ :



बसवेश्वर एज्युकेशन सोसायटी, नागपूर द्वारा संचालित संत गाडगेबाबा हायस्कूल येथे नवगतांचे स्वागत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष मुख्याध्यापक प्रेमदास उरकुडकर सर तर प्रमुख अतिथी मनोज नेहारे सर मीनाक्षी मते मॅडम मनीषा वाडीभस्मे मॅडम निलेश ठाणेकर सर प्रामुख्याने उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या पूजनाने झाली.

त्यानंतर इयत्ता आठवी मध्ये नवीन प्रवेश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्पगुच्छ देऊन पुस्तक वाटप व गणवेश वितरण करण्यात आले. याप्रसंगी सन्माननीय मुख्याध्यापक सरांनी विद्यार्थ्यांना नव सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेतला शेवटी कार्यक्रमाला गोड वाटप करण्यात आले या कार्यक्रमातच्या यशस्वीतेसाठी महेंद्र ठाणेकर रवी बोबडे विजय इंगोले ज्ञानेश्वर पवार प्रमोद मसराम यांचे विशेष सहकार्य लाभले कार्यक्रमाच्या संचालन मनोज नेहारे सर यांनी केले आभार प्रदर्शन मनीषा वाडीभस्मे यांनी केले.

# छिंदवाडाचे ३ तरुण ड्रग्जसह गजाआड

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २६ :

कपिलनगर पोलिसांनी गस्तीदरम्यान छिंदवाडा येथील तीन तरुणांना अंमली पदार्थासह पकडले. त्यांच्याकडून मोबाईल आणि कारसह एकूण 10 लाख रुपये किंमतीचा माल जप्त केला. प्रियांशू अनिल शुक्ला (23) रा. खजेरी, अंश विरेंद्र पुरिया (22) रा. एसआरटी कॉलनी आणि अभिषेक अशोक भवरकर (25) रा. गुरया अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

बुधवारी सकाळी 6 वाजताच्या सुमारास कपिलनगर पोलिसांचे पथक पॉवर ग्रीड चौकाजवळ गस्त घालत होते. या दरम्यान एमपी-28/सीबी-5652 क्रमांकाची कार गुज्जर लॉनकडे संशयास्पदरित्या जाताना दिसली. पोलिसांनी कार अडवली असता त्यात वरील आरोपी बसलेले होते. पंचासमोर पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता 4.25 ग्रॅम एमडी मिळाली. पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक करून एमडी, 4 मोबाईल आणि एक कार जप्त केली. आरोपींविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी नागपूरच्या पेडलरकडून माल खरेदी करण्यासाठी आले असल्याचा संशय पोलिसांना आहे. छिंदवाडा येथीलच एका तरुणाच्या माध्यमातून तिघेही नागपुरात आले होते.

# मनपातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना विनम्र अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :



आरक्षणाचे जनक, सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते थोर समाजसुधारक, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित कार्यक्रमात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनपाच्या उपायुक्त विजया बनकर, साप्रविचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, कार्यकारी अभियंता कमलेश चव्हाण, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, नरेंद्र रामटेके शैलेश जांभूळकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दिव्यांगाच्या प्रश्नांबाबत प्रहार आक्रमक

## जलालखेडा ग्रामपंचायतीवर दिव्यांगासह प्रहार धडकली




■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. २६ :

जलालखेडा येथील दिव्यांग बांधवांच्या समस्या संदर्भात आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह शेकडो दिव्यांग बांधव जलालखेडा ग्राम पंचायतीवर धडकलेत.

प्रहार जनशक्ती पक्षाचे काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर, प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन समिती काटोल तालुका प्रमुख अजय पांडे यांच्या नेतृत्वात शेकडो दिव्यांग बांधव ग्राम पंचायत मध्ये धडकलेत, यावेळी ग्राम पंचायतच्या सभागृहात सरपंच पांडुरंग निकोसे, उपसरपंच मयुर सोनोने, सदस्य मयुर दंढारे, सचिव मनिषा मोरे आदी उपस्थित होते. प्रहार पदाधिकाऱ्यांनी ग्राम पंचायतीच्या एकुण उत्पन्नापैकी दिव्यांगाना देण्यात येणारा अनुशेषासह ५% राखीव निधी, घरकुल वाटपात दिव्यांगांना प्राधान्य, मालमत्ता आकारणीत दिव्यांगांना सवलत, दिव्यांग कायद्याची प्रभावी अंमलबजावणी अश्या अनेक प्रश्नांचा पाढाच यावेळी ग्राम पंचायत प्रशासनासमोर वाचला.

प्रशासनाच्या वतीने सचिव मनिषा मोरे यांनी ग्राम पंचायत प्रशासनाला थोडा अवधी देण्याची विनंती केली, दिव्यांगांच्या सर्व प्रश्नांना ग्राम पंचायत प्रशासनाच्या वतीने योग्य न्याय देण्यात येईल असे ही सांगितले, उपसरपंच मयुर सोनोने आणि सदस्य मयुर दंढारे यांनी यावेळी दिव्यांगांच्या समस्या समजून घेऊन त्या तातडीने सोडविण्यावर जोर दिला.

यावेळी सुनंदा इंगळे, शांता अखंड, महादेव कनेरे, गोविंदा कुवारे, दिलीप सोलंकी, चेतन कळंबे, कोमल निमावत, निलेश चारपे, शरद मडावी, तुषार नाडेकर, यश दंढारे, चित्रा हेडाऊ, केतन नाडेकर आदींसह शेकडो दिव्यांग बांधव उपस्थीत होते.

# नागपूर तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी घोषित

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २६ :




दत्तवाडी येथील नागपूर तालुका पत्रकार संघाच्या मुख्य कार्यालयात, मुंबई मराठी पत्रकार परिषद तथा नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न नागपूर ग्रामीण तालुका पत्रकार संघाची वार्षिक बैठक संघाचे जेष्ठ मार्गदर्शक सुरेश फलके यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मार्गदर्शक अरुण कराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

सभेत विविध महत्त्वाच्या विषयावर साधक बाधक चर्चा होऊन सन २०२५ ते २०२७ करिता नवीन कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी सौरभ पाटील, महासचिव दिलीप तराळेकर, कार्याध्यक्ष समाधान चौरपगार, उपाध्यक्ष शुभम राऊत, कोषाध्यक्ष राहुल शेंडे तर जिल्हा प्रतिनिधी म्हणून नटवर अबोटी यांची सर्व संमतीने निवड करण्यात आली. यावेळी अजय तायवाडे, गजानन तुमडाम, लोकपाल चापले, लोकेश पांडे, उषा फलके, माधुरी तायवाडे, पूर्वेश चोरपगार उपस्थित होते.

# ३.२९ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २६ :

बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाचे घरफोडून अज्ञात आरोपीने 3.29 लाख रुपये किंमतीच्या दागिन्यांवर डल्ला मारला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी अनूप भगवान वाघमारे (34) रा. गणेश हाऊसिंग सोसायटी, नागेश्वरनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत शनिवारच्या सायंकाळी अनूप घराला कुलूप लावून कुटुंबासह पुलगाव येथे गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात चोरांनी स्क्रू काढून दरवाजाच वेगळे करीत त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 1 हजार आणि सोन्याचे दागिने चोरून नेले.

रविवारी सकाळी शेजाऱ्यांना वाघमारे यांच्या घराला दारच नसल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ त्यांना माहिती दिली. त्यांनी नागपूरला परतून पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# आईसीएआई एमएसएमई महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २६ :

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आईसीएआई ) नागपूर शाखा आणि आईसीएआईच्या एमएसएमई आणि स्टार्टअप समितीच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक २७ जून रोजी "आईसीएआय एमएसएमई महोत्सव" या राष्ट्रीय स्तरावरील विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. हा कार्यक्रम नागपूर येथील आईसीएआय भवन, धंतोली येथे दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पार पडणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला सशक्त करणे असून, यामध्ये धोरणात्मक दृष्टीकोन, शासकीय योजनांची माहिती, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व आर्थिक समावेशन यावर भर देण्यात येणार आहे. कार्यक्रमात देशभरातून मान्यवर वक्ते, वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच विविध विषयांचे तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. ते एमएसएमई विकास, क्षमता निर्माण, स्टार्टअप संधी आणि वित्तपुरवठा यांसारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर विचार मांडतील. एमएसएमई महोत्सवाच्या माध्यमातून सामूहिक ज्ञानवृद्धी, संवाद व सहकार्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमात सर्व व्यावसायिक संघटना, व्यापारिक संस्था, व्यवसायीक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी या ज्ञानमूल्य कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आईसीएआई नागपूर शाखेचे अध्यक्ष सीए दिनेश राठी यांनी केले आहे.

# राजर्षी शाहु महाराज यांना महावितरणचे अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २६ :




सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित, अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावणा-या तसेच राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम करतांना जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देण्यास प्राधान्य देणाऱ्या, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून देणा-या राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे. त्यांना अभिवादन करण्यात आले.

महावितरणच्या काटोल मार्गवरील विद्युत भवन कार्यालयात झालेल्या या जयंती कार्यक्रमाच्यावेळी महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी राजर्षी शाहु महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता अंकुर जोशी, अधीक्षक अभियंता किशोर सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता सतीश भामसे, महावितरणचे अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव. कार्यकारी अभियंता विजय तिवारी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरण व महानिर्मितीचे अधिकारी व कर्मचारी यांनी देखील राजर्षी शाहु महाराज यांना अभिवादन केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ६४ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २६ :



नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. (ता.26) गुरुवार रोजी शोध पथकाने 59 प्रकरणांची नोंद करून 43,100/- रुपयाचा दंड वसूल केला.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 14 प्रकरणांची नोंद करून 5,600/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 400/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 1,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 03 प्रकरणांची नोंद करून 6,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 9 प्रकरणांची नोंद करून 10,500/- रुपयांची वसुली करण्यात आली.

चिकन सेंटर, मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/ साठवणे या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 4,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 27 प्रकरणांची नोंद करून 5,400/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 9 प्रकरणांची नोंद करून रु. 9,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. साफल्य एन्क्लेव यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. तसेच अमित ढगे यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल 5,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. कलेक्टिव कॉफी हाऊस यांनी हॉटेलचा कचरा रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आले. हनुमान नगर झोन अंतर्गत मे. तिरुपती बिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत मे. डायमंड शेयर मार्केट क्लासेस यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. प्रशांत किराणा स्टोअर्स व मे. सुरभी किराणा स्टोअर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल प्रत्येकी रु. 5,000/- प्रमाणे असे एकुण रु. 10,000/- चे दंड वसुल करण्यात आले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. चौरसीया किराणा स्टोअर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. मंगळवारी झोन अंतर्गत मे. ताजदार कंस्ट्रक्शन कंपनी यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले.

# मिलेनिअल ब्युटी अँड बिजनेस अवॉर्ड शो सीजन थ्री चे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २६ :

सिम्बॉयसिस सेंटर फॉर स्किल डेव्हलपमेंट वाठोडा नागपूर येथे 28 जून 2025 ला सकाळी 11 वाजता मेघाज मेकओवर च्या सौजन्याने मिलेनिअल ब्युटी अँड बिझनेस अवॉर्ड शो सीजन थ्री चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मंचाद्वारा सौंदर्य, व्यवसाय आणि त्यासारख्या इतर कार्याकरिता प्रोत्साहित करण्यात येणार आहे ज्याद्वारे समाजात आत्मनिर्भरता व सशक्तिकरण स्थापित केल्या जाईल. या भव्य आयोजनामध्ये मेक ओव्हर, नेल आर्टिस्ट व बॅक स्टेज अशा तीन कॅटेगिरी मध्ये कॉम्पिटिशन घेण्यात येणार असून या कार्यक्रमात प्रसिद्ध सेलिब्रिटी व डान्स कोरिओग्राफर टेरेंस लुईस, मिसेस युनिव्हर्स 2022 थर्ड रनर अप जोया शेख तसेच बीटीपी ग्रुपचे फाउंडर सिराज शेख उपस्थित राहणार आहे.

## आकाशवाणीचे लोकप्रिय कार्यक्रम डिजिटल माध्यमातून घरोघरी पोचतात

# आकाशवाणी कृषि आणि गृह विभागाची बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

आकाशवाणी नागपूर आपल्या दैनंदिन कार्यक्रमाच्या माध्यमातून घराघरात पोहचण्याचा प्रयत्न करीत आहे. डिजिटल युगाच्या माध्यमात आजही आकाशवाणीने आपले स्थान टिकवून ठेवले आहे. आता news onair अँपच्या माध्यमातून जगभर आकशवाणी पोचली असल्याचे प्रतिपादन आकाशवाणी नागपूर केंद्राचे उप महानिदेशक (अभियांत्रिकी) रमेश घरडे यांनी केले.



आकाशवाणी नागपुरच्या कृषी आणि गृह बिभाग तर्फे ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीची त्रैमासिक सत्र जुलै ऑगस्ट सप्टेंबर २०२५ ची बैठक काल आकाशवाणी नागपूर केंद्राच्या सभागृहात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

आकाशवाणी कृषि विभागाचे कार्यक्रम अधिकाधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने निरंतर प्रयत्न करीत असल्याचे प्रियदर्शनी राऊत, कार्यक्रम प्रमुख आकाशवाणी नागपूर यांनी सांगितले.

बैठकीच्या सुरुवातीला सध्या सुरु असलेल्या तिमाहीतील महत्वाच्या कार्यक्रमाचा आढावा तसेच जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2025 या त्रैमासिकात प्रसारित होणारे कृषि आणि गृह विभागाच्या कार्यक्रमाचे पूर्वावलोकन कृषि कार्यक्रम अधिकारी सचिन लाडोले यांनी केले.

या तिमाहील प्रसारित होणारे कार्यक्रमाचे वाचन नैमीतिक उद्घोषक श्यामली राऊत, निहास लोखंडे,शंतनू ठेंगडी आणि रोहिणी सूर्यवंशी यांनी केले. या बैठकीला गजानन खडसे, मुख्य वैज्ञानिक निरी, अश्विनी नीलकंठ टेकाम, मत्स्य व्यवसाय अधिकारी, राकेश जोशी, रेशीम संचालनालय नागपुर, आदेश एस. वाघमारे, रेशीम संचालनालय नागपुर, उषा आर. डोंगरवार, वरिष्ठ वैज्ञानिक एवं प्रमुख के.व्ही. के. कृषी विज्ञान केंद्र साकोली, श्री राजेश एम मेश्राम, प्रसिद्धी शाखा वन विभाग वन भवन नागपूर, डॉ. दत्तात्रय येले, कृषी उपसंचालक जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी नागपूर, अश्विनी टेकाम, मत्स्य व्यवसाय अधिकारी, श्री अजिंक्य घाटेकर, विभागीय व्यवस्थापक, एफ डी सी एम भवन नागपूर, डॉ. उल्हास गळकाटे एस.एम.एस.के.वी.के.,आई.सी.ए. आर, सी.आई.सी.आर. नागपूर, निलय भोगे, विभागीय वन अधिकारी वन भवन सिव्हिल लाइन्स नागपूर, सागर कांबले, वन अधिकारी, डी एस ए ओ नागपुर, डॉ. हर्षा मेंढे कृषी महाविद्यालय नागपूर यांची उपस्थिती होती.

# पोलीस उपनिरीक्षक देविदास बंड यांना राष्ट्रपती पदक



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २६ :

बालाजी नगर डिंगडोह येथील रहिवासी व राज्य राखीव बल नागपूर गट ४ चे पोलीस महानिरीक्षक यांचे रीडर या पदावर कार्यरत पोलीस उपनिरीक्षक देविदास गंगाधर बंड यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रपती पदक देण्यात आले आहे.

मुंबई येथे आज एका समारोहात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते देविदास बंड यांना राष्ट्रपती पदक देऊन सन्मान करण्यात आला. या अगोदर त्यांना पोलीस महासंचालकयांचे हस्ते त्यांना "पोलीस सन्मान पदक" सुद्धा प्राप्त झाले आहे. देविदास बंड हे सध्या संभाजीनगर येथे पोलीस उपनिरीक्षक पदावर असून प्रतिनियुक्तीवर नागपूर येथील राज्य राखीव पोलीस गट ४ येथे पोलीस महानिरीक्षक यांचे रीडर म्हणून काम करीत आहेत.

त्यांना मिळालेल्या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब वाघमारे, विजय सराड, त्यांचे बंधू सुनील बंड,काशिनाथ मापारी,बंटी भांगे, अभय राय, प्रमोद उईके,विष्णु बानाईत, बबन ठाकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## इन्शुरन्स कंपनीचा अधिकारी असल्याचे सांगुन

# १3 लाख ४0 हजार रुपयांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २६ :

पीएनबी मेटलाइफ इन्शुरन्स कंपनीचा अधिकारी असल्याचे सांगुन अज्ञात इसमाने ब्लॉक डायमंड सोसायटी डब्लुसीएल कामठी येथुन सेवानिवृत्त कर्मचा?याला मेल, व्हाट्सएप वर खोटी माहिती पाठवुन १३ लाख ४० हजार ४३३ रुपयांची फसवणुक केल्याने पोलीसांनी अज्ञात इसमा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अरविंद किसन कडुकर (६५) रा. कन्हान यांनी २०२१ मध्ये कन्हानच्या एजंट सावरकर कडुन पीएन बी मेटलाइफ इन्शुरन्स पॉलिसी घेतली होती. पॉलिसी चा वार्षिक प्रीमियम एक लाख रुपये होता . ५ वर्षे ती भरल्यानंतर त्याला १० वर्षात ८ लाख रुपये मिळणार होते. अरविंद यांनी सलग चार वर्षे पॉलिसीचा प्रीमिय म भरला. सोमवार (दि.१५) एप्रिल २०२४ ला त्याना मोबाइल क्र. ७८३८७९६८३१ यावरून एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला. त्याने आपला परिचय पीएनबी मेटलाइफ इंन्सुरन्स पॉलीसी मधुन नवीन दीक्षित बोलतो असे सांगितले.

त्यानंतर त्याने अरविंदचा पीएनबी मेटलाइफ इंन्सुरन्स पॉलीसी क्र.२३५०३५५ याबद्दल संपुर्ण बरोबर माहिती दिली. तो ऑफीस चा माणुस आहे असे अरविंद समजले. अज्ञात इसमाने अरविंदला पालीसीमधुन एका महिन्याचे आत पैसे काढायचे आहे तर पाचवी कीस्त भरावी लागेल असे म्हटले. आणि त्याने अरविंदचा ई मेल आय.डी.वर गुरुवार (दि.१८) एप्रिल ला मेल केरून त्यात त्याचे अकाउंट ची डीटेल होती . यावर एक लाख रुपये पाठवायला सांगितले.

त्या अकाउंट नं. ७६६१४२७८२६ नाव मेट लाईफ इंन्सुरन्स को. लीमी असे होते. अरविंद यांनी स्टेट बैंक आफ इंडिया येथुन अकांउट चे १,००,००० रुपये चेक याद्वारे ७६६१४२७८२६ अकांउट मध्ये आर.टी.जी.एस. केले. दोन, तीन दिवसांनी अरविंद च्या मोबाईल वर नवीन दिक्षीत याने फोन केला व म्हटले की २,००,००० रुपये भरले तर तिन सरवाईकल बोनस मिळेल असे म्हणाला. अरविंद नी बुधवार (दि.२४) एप्रिल ला अकांउट मध्ये ९९ ,१३१ रु. चे दोन वेगवेगळे चेकद्वारे ७६६१४२७८२६ अकांउट मध्ये पैसे आर.टी.जी.एस.केले. त्यांनी अरविंद ला जि.एस.टी, टॅक्स, ड्युचे पैसे भरावे लागणार तेव्हा तुमची पालीसी मॅच्युअर होणार असे वेगवेगळे कारणे सांगितले व अरविंद ला वेगवेगळे बँकेचे वेगवेगळे अकांउट डीटेल त्यांचा व्हाट्सएप, मेलवर पाठविले व त्यामध्ये पैसे भरावयास सांगितले.

अरविंद यांनी वेगवेगळ्या रक्कमा गुरुवार (दि.१८) एप्रिल २०२४ ते गुरुवार (दि.६) मार्च २०२५ पर्यंत एकुण १३,४०,४३३ रुपये वेगवेगळे पेमेंट मोड नी पाठविले. इसमाने एक महीन्याने भेटतील, दोन महीन्याने भेटतील असे म्हणुन तारखा देत गेला परंतु अरविंद यांचे पैसे परत दिले नाही व मोबाईल बंद करून ठेवला आहे.

कोणीतरी अज्ञात इसमाने पीएनबी मेटलाइफ इन्शुरन्स कंपनीचा अधिकारी असल्याचे सांगुन अरविंद यांचा मेल, व्हाट्सएप वर खोटे कागदपत्रे पाठवुन १३,४०,४३३ रुपयांची फसवणुक केल्याने पोलीसांनी अरविंद कडुकर यांचा तक्रारी वरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

## १६१ स्कूल व्हॅन, बसवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

सोमवारपासून शाळांना सुरुवात झाली आहे. अनेक विद्यार्थी स्कूल व्हॅन, बस आणि ऑटोतून शाळेत ये-जा करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेत वाहतूक पोलिस सक्रीय झाले आहेत. जनजागृती सोबतच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या स्कूल वाहन चालकांवर कारवाई सुरू केली आहे.

मंगळवारी वाहतूक पोलिसांकडून शालेय वाहनांची आकस्मिक तपासणी मोहीम राबविण्यात आली. दिवसभर चाललेल्या या मोहिमेंतर्गत नियम धाब्यावर बसवणाऱ्या 161 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. स्कूल बस, व्हॅन आणि ऑटो चालकांकडून नियम मोडण्याच्या अनेक प्रकार पुढे येतात. त्यामुळे पोलिसांनी सुरुवातीपासून सक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे.

गणवेश नसलेल्या आणि सीट बेल्ट न लावणाऱ्या वाहन चालकांसोबतच ओव्हरसीट आणि सिग्नल जम्प करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली. एसीपी वाहतूक माधुरी बाविस्कर यांनी सांगितले की, कारवाईचा उद्देश शालेय वाहनांच्या चालकांकडून नियमांचे पालन करून घेणे आहे. शालेय वाहन चालकांकडून अधिक सतर्क राहून नियमांचे पालन केले पाहिजे. वाहनांमध्ये असलेल्या चिमुकल्यांच्या सुरक्षेची जबाबदारी त्यांच्यावरच असते. सर्वांनी नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे. या पुढेही पोलिस कारवाई सुरूच राहिल.

वाहन चालकांसोबतच पोलिस विद्यार्थ्यांनाही वाहतूक नियमांची माहिती देत आहेत. विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन मुलांमध्ये जागृती करीत आहेत.

# गैरहजर राहिलेल्या सफाई कामगारांवर मनपाची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

लक्ष्मीनगर झोनमधील प्रभाग क्रमांक १६ मधील सोमलवाडा हजेरी स्टँडवर गैरहजर आढळून आलेल्या ५ सफाई कामगारांवर कारवाई करण्याचे निर्देश महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी दिले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सफाई कामगारांनी सजग राहावे, यासाठी शहरातील विविध हजेरी स्टँडची आकस्मिक पाहणी वसुमना पंत यांच्यातर्फे केली जात आहे. सोमलवाडा हजेरी स्टँडवर एकूण सफाई कामगारांची संख्या २१ असून, या आकस्मिक पाहणीत १६ कामगार कर्तव्यावर होते. परंतु, ५ सफाई कामगार कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर असल्याचे आढळून आले.

याबद्दल वसुमना पंत यांनी नाराजी व्यक्त केली. या कामगारांना २४ तासाच्या आत कारणे दाखवा नोटीसचे उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. या नोटीसचे उत्तर न आल्यास कारवाई करण्यात यावी, असे निर्देश श्रीमती वसुमना पंत यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांना दिले.

### विवाह करणाऱ्या दाम्पत्यांकरीता

## कन्यादान योजना

नागपूर : सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांकरीता कन्यादान योजना सन २००३ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेतर्गत सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या वधूच्या पालकास २५ हजार व संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे चार हजार रुपये अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत २०२५-२६ वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांनी सहाययक आयुक्त समाज कल्याण नागपूर कार्यालयाकडे सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या संस्थेमार्फत आवश्यक कागदपत्रांसह ३० जूनपर्यंत अर्ज सादर करावे.

# मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. अटी व शर्तीप्रमाणे मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी पात्र ठरलेल्या बचत गटांना वाटप करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. मिनी व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मयार्दा ३.५० लाख रुपये इतकी राहील. स्वयंसहायता बचत गटांनी वरील कमाल मयार्देच्या रक्कमेच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर ९० टक्के (कमाल ३.१५ लाख रुपये) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

सन २०२५-२६ या आर्थिक वषार्तील बचत गटांची निवड केल्यानंतर लाभार्थी बचत गटाने किमान ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करावी. परंतु जे लाभार्थी बचत गट मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अधिक अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करु इच्छित असतील, अशा पात्र ठरलेल्या बचत गटांना ते खरेदी करता येतील. या योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्वावर देऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत त्याला मिनी टॅक्ट्रर विकता येणार नाही अथवा सावकार किंवा अन्य व्यक्तीकडे गहाण ठेवता येणार नाही.ज्या लाभार्थ्यांना पावर टिलरचा लाभ दिला आहे त्या लाभार्थीर्ना या योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही.सन २०१४-१५ ते २४-२५ मध्ये ज्या बचत गटांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आलेले आहे त्यांना सन २०२५-२६ करीता अर्ज करता येणार नाही.

# 'चित्रमूल्य : वास्तव आणि संभ्रम' यावर तीन व्याख्याने

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नामवंत चित्रकारांची चित्रे आजकाल करोडो रुपयात विकली जातात. चित्रकाराच्या प्रतिभेचे हे मूल्य कसे ठरते आणि ती चित्रे अफाट किमतीत कशी विकली जातात, याचे सर्वसामान्य रसिकाला आणि प्रत्यक्ष कलाक्षेत्राला देखील नेहमी कुतूहल वाटते. याच विषयावर "चित्रमूल्य : वास्तव आणि संभ्रम" या शीर्षकाखाली तीन लघुव्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भ साहित्य संघ आणि सर्जना निर्माण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्र -शिल्प रसग्रहण मालिकेतील हा २७ वा कार्यक्रम शनिवार, २८ जून रोजी सायंकाळी ६.१५ वाजता विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलातील अमेय दालनात होईल.

एम. एफ हुसेन यांच्या ११८ कोटी रुपयांना विकल्या गेलेल्या 'ग्रामयात्रा' या चित्रावर चित्रकला महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. विश्वनाथ साबळे भाष्य करतील तर तैय्यब मेहता यांच्या अंदाजे ६२ कोटी रुपयांना विकल्या गेलेल्या 'ट्रस्ड बुल' या चित्रावर चित्रकार आणि चित्रसंग्राहक मिलिंद लिंबेकर बोलतील. अमृता शेरगिल यांच्या अंदाजे ६२ कोटी रुपयांना विकल्या गेलेल्या 'स्टोरी टेलर' या चित्राविषयी प्रा. चंद्रकांत चन्ने मनोगत व्यक्त करतील. या कार्यक्रमास साहित्य-चित्र रसिकांनी या कार्यक्रमास अवश्य यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ओगावा सोसायटीने बांधकाम खात्याच्या सूचनेनुसार कार्य करावे : चंद्रशेखर बावणकुळे

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २६ :

कामठी शहरातील ड्रैगन पेलेस परीसरातील जागेची उपलब्धता बदलण्याबाबत ओगावा सोसायटीने प्रस्ताव सादर केला आहे. या ठिकाणी झालेल्या बांधकामाची तपासणी करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले होते. त्याऐवजी ओगावा सोसायटीनेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार काम करावे याबाबत सुचना पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ओगावा सोसायटीच्या नवीन बांधकाम प्रस्तावाबाबत मंत्रालयात बावनकुळे यांच्या दालनात बैठक पार पडली.

यावेळेस माजी राज्य मंत्री सुलेखा ताई कुंभारे आणि महसूल विभागाचे अधिकारी उपस्थीत होते. यावेळी बावणकुळे साहेब म्हणाले. ओगावा सोसायटीने ड्रैगन पेलेस परिसर विकसित करण्याचा प्रस्ताव केला आहे.



त्याठिकाणी झालेल्या बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला तपासणी करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. परंतू येथिल बांधकाम विभागाला अडचणी आहेत. त्यामुळे ओगावा सोसायटीनेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन बांधकाम करावे.

याठिकाणी बांधण्यात येणाऱ्या इमारतीच्या ऊपयोगीता बदलण्याचा प्रस्तावही देण्यात आला असुन नागपूर जिल्हाधिकारी यांनी तातडीने तयार करुन पाठवावा. याठिकाणी प्रादेशिक आयुक्त आणि सोसायटी यांनी शासन निर्णयाप्रमाणे काम करावे अशा सुचना बावनकुळे यांनी दिल्या.

## अट्टल चोर भांजाचा साथीदारही गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

हुडकेश्वर ठाण्यांतर्गत दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या घरफोडी प्रकरणात गुन्हे शाखा युनिट 5च्या पथकाने एका आरोपीला अटक केली. आकाश दुगार्लाल गौतम (23) रा. शिवशंभूनगर, कळमना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. चौकशीत त्याने चर्चित चोर सागर उर्फ भांजा अशोक वर्मा याच्यासोबत मिळून घरफोडीच्या दोन गुन्ह्यांची कबुली दिली. गुन्हे शाखेच्या वाहन चोरी विरोधी पथकाने तीन दिवसांपूर्वीच सागरला अटक करून 3 गुन्हे उघडकीस आणले होते.

पिपळा रोडवर वैष्णवीनगरात राहणारे फियार्दी मंगेश रमेश सोनकुसरे (42) हे गत 13 जूनच्या दुपारी घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने घरफोडी करून सोन्याचांदीचे दागिने आणि रोकड चोरून नेली. सोनकुसरे यांच्या तक्रारीवरून हुडकेश्वर पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास युनिट 5 चे पथकही करीत होते. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर पोलिसांना आकाशचा सुगावा लागला.

# योजनांचा लाभ घेण्यासाठी डीबीटी नोंदणी व आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

महाराष्ट्र शासनाव्दारे विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या वैयक्तीक लाभाच्या योजना नागपूर शहर मनपा क्षेत्रामध्ये राबविण्यात येत आहे. तरी नागपुर शहरातील ज्या लाभार्थ्यांना उपरोक्त योजनांचा लाभ सुरु आहे अशा लाभार्थ्यांना सुचित करण्यात येते की, यापूढे मिळणारे अनुदान हे फक्त डीबिटी प्रणालीव्दारेच पाठविण्याबाबतचे शासनाने कळविले आहे. यापूर्वी नागपूर महानगरपालिका येथे शिबीर आयोजीत करण्यात आले होते. तरीदेखील काही लाभार्थ्यांनी आजपावेतो कार्यवाही केलेली नाही त्यामुळे त्यांचे अनुदान थांबलेले आहे.

तरी संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी तत्काळ बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे कार्यालयीन वेळेत आवश्यक कागदपत्रासह मंजुरी आदेश टोकन, आधार कार्ड, बँक पास बुक, मोबाईल क्रमांक, पतीचे मृत्यु प्रमाणपत्र व दिव्यांग लाभार्थी प्रमाणपत्र इत्यादी) हजर राहुन डीबिटी नोंदणी व आधार प्रमाणीकरणाबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.

## महाबोधी विहारासाठी तहसील कार्यालयावर मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी खापरखेडा, दि. २६:

बुद्ध गया येथील महाबोधी विहार बौद्ध अनुयायांच्या ताब्यात देण्यात यावे आणि बीटी कायदा १९४९ रद्द करण्यात यावा या मागणीसाठी भीम योद्धाच्या वतीने सावनेर तहसील कार्यालयावर मोर्चा काढून धरणे देण्यात आली.

हिंदूच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी मागील काही दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. परंतु, शासनाच्या उदासिन धोरणामुळे या मागणीवर तोडगा काढण्यात आला नाही. त्यामुळे बौद्ध अनुयायांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. याच मागणीसाठी भीम योद्धाच्या वतीने सावनेर तहसील कार्यालयावर मोर्चा काढून दिवसभर धरणे देण्यात आली. मोर्चा येणार असल्याची माहिती समजताच तहसील कार्यालयातील संबंधित अधिकारी दिवसभर कार्यालयात आले नव्हते. त्यामुळे मोर्चेकऱ्यांनी सावनेरचे ठाणेदार उमेश पाटील आणि नायब तहसीलदार गोबिंदवार यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

भंते करुणानिधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात सुषमा



ठाणेदार उमेश पाटील यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देताना मोर्चेकरी

तभाणे, रुचिका मानकर, अक्षय भोयर, सुशील ब्रम्हराक्षसे, नंदन मडके, मयूर फुलझेले, स्वप्निल पाचभावे, नितीन गोलाईत, चंदन गोडबोले, निलेश बागडे, आशिष गजभिये, विजय कापसे, सुशील रंगारी, आशिष मंडपे आणि दादाराव लांजेवार यांचा प्रामुख्याने सहभाग होता.

# महासागर प्रभाग वार्ता

## बाल क्रीडा विहार उद्घाटीत



क्रोमा कोवचे उदघाटन करताना प्रमुख पाहुणे सदाशिव

■ प्रमोद जांभुळकर नागपूर, दि. २६:

प्रभाग क्र. २३ वर्धमाननगर स्थित सेंटर पॉईट शाळेच्या प्रांगणात आयोजित क्रोमा कोवचे उदघाटन एलएचएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सदाशिव यांच्या हस्ते पार पडले.

बाल क्रीडा विहारात विद्यार्थी खेळीमेळीच्या वातावरणात आनंददायी शिक्षण घेऊ शकतील. त्यामुळे शिक्षकांना शिक्षण देताना आणि विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना दोघांनाही मजा येथील असे प्रतिपादन सदाशिव यांनी केले. प्रारंभी सीपीएस समूहच्या प्राचार्या शिल्पी गांगुली आणि कविता चोप्रा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मंचावर प्राचार्या कांचन उके, प्रवीण कासद, उपप्राचार्य दीपा चक्रवर्ती, कल्पना धारेश्वर, मोनिका खुराणा, रोहनप्रकाश कुंभारे, चंदा दास, हेमंत भट, मोनू बुर्रेवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी अमित आर्य, रोशन चौधरी, मनोज रक्षक, निशांत श्रीवास्तव, कुशल बाळबुधे, रश्मी बैस, स्वप्निल समर्थ, विनोद डहारे, भाग्यश्री नन्नावरे, हरीश सहारे यांनी परिश्रम घेतले.

## ऑटोचालकांना कोण आवरणार?

■ दीपक नामपल्लीवार नागपूर, दि. २६:



शहरात ऑटोचालकांची मनमानी वाढली असून ऑटोचालकांवर अंकुश लावण्यात वाहतूक पोलिसांना पुर्णत: अपयश आल्याने ऑटोचालकांची मुजोरी वाढली आहे.

ऑटोचालकांची समस्या ही शहरासाठी काही नवीन नाही. अनेक वर्षांपासून ही समस्या कायम आहे. जसजसे शहर वाढत आहेत तसतसे ऑटोचालकांमध्ये भर पडत आहे. अतिशय वेगात ऑटो चालविणे, चौकात इकडून तिकडे ऑटो फिरविणे असे प्रकार होत असतात. रस्त्यावर कुणी उभे दिसले की, अचानक त्यांच्यापुढे ऑटो उभे करतात. प्रवासी घेण्यासाठी कसलेही निर्देश न देता दुसया वाहनासमोर अचानक आपले ऑटो उभे करतात. त्यामुळे मागून येणाया वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. कधी कधी अपघात देखील होऊ शकतो. गर्दीच्या ठिकाणी या समस्या प्रामुख्याने दिसून येतात.

वाहतूक पोलिस वसुलीत व्यस्त असल्याने त्यांचे या ऑटोचालकांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे ऑटोचालकां-चीमनमानी वाढली आहे. वाहतूक पोलिसांनी या ऑटोचालकांवर वेळीच अंकुश आणावा अशी सर्वसामान्य लोकांची मागणी आहे.

## कॉटन मार्केट मेट्रो स्थानकासमोर वाहतुकीची कोंडी

■ किरण मेश्राम नागपूर, दि. २६

कॉटन मार्केट मेट्रो स्थानकासमोर सायंकाळच्या वेळी वाहतुकीची कोंडी होत असल्याने पादचारी आणि वाहनचालकांना अतोनात त्रास सहन करावा लागतो.

कॉटन मार्केट मेट्रो स्थानकासमोर अतिशय अरुंद असा रस्ता आहे. दिवसभर येथे वाहनांची वर्दळ असते. याच मार्गावर नागपूर रेल्वेस्थानकाचे पूर्व दिशेचे प्रवेशद्वार आहे. प्रवासी गाडी आली की, याच प्रवेशद्वारातून बाहेर येतात. या स्थानकाच्या आजूबाजूला फळ विक्रेते आपले हातठेले घेऊन गर्दी करतात. सोबतच ऑटोचालक देखील प्रवासी घेण्यासाठी इकडून तिकडे भटकत असतात. त्यामुळे गर्दीत भर पडते. विशेषत: सायंकाळी या मार्गावर वाहतुकीची कोंडी होते. दुचाकी, कारसोबतच एखादे अवजड वाहन आले की, पुढे सरकायला बराच वेळ लागतो. या रस्त्यावर इतकी गर्दी असते की, कधी कधी वाहनचालकांचे संतूलन बिघडून ते दुचाकीसह खाली पडतात.

या मार्गावर वाहतूक शाखेचे कार्यालय आहे. परंतु, वाहतूक पोलिसांच्या दुर्लक्षपणामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. मेट्रो स्थानक परिसरातील फळ विक्रेत्यांना आणि ऑटोचालकांवर अंकुश लावून या मार्गावरील वाहतुकीची कोंडी सोडवावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.